# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

एम. ए. भाग–२ : राज्यशास्त्र

# भारतातील पक्षीय व्यवस्था

**(Party System in India)**

**सत्र ४ : पेपर DSE-42**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रथमावृत्ती :** २०२२

एम. ए. (राज्यशास्त्र) भाग-२ पेपर DSE-42 (ऐच्छिक)

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** २००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN-978-93-92887-39-0

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**■ अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र ■**

अध्यक्ष - **डॉ. रविंद्र पांडुरंग भणगे**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. प्रकाश रामचंद्र पवार**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. अरुण मारुतीराव चव्हाण**
  भोगावती महाविद्यालय, कुरुकली, जि. कोल्हापूर
- **डॉ. शिरीषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, ता. कराड,
  जि. सातारा
- **डॉ. सचिन महादेव पाटील**
  श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. विक्रमराव एन. पाटील**
  शंकरराव जगताप जगताप आर्टस कॉलेज, वाघोली,
  जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मेघा संजय पाटील**
  कै. मालती व. पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. संतोष केशव खडसे**
  कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर,
  ता. वाळवा, जि. सांगली
- **डॉ. श्रद्धा विनोद कोठावळे**
  सहकारभूषण मा. एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड,
  ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
- **डॉ. राहुल दत्ता मांडणीकर**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, २९६८, 'सी',
  दसरा चौक, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. बाळ अनंत कांबळे**
  धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा
- **डॉ. वासंती प्रतापचंद्र रासम**
  घरोंदा ३८४/३८५ आर. के. नगर सोसायटी नं. ५,
  मोरेवाडी, कोल्हापूर
- **डॉ. अनिल देवगौडा पाटील**
  आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. सिकंदर आप्पासाहेब जमादार**
  राजहंस हौसिंग कार्पोरेशन प्लॉट नं. ०९, विजय नगर,
  इस्ट सांगली मिरज रोड, सांगली
- **डॉ. रमेश दिनकर डुबल**
  किसन वीर महाविद्यालय वाई, जि. सातारा

# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली  याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' या शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूरशिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक एम. ए. भाग दोन च्या राज्यशास्त्र विषयाच्या ऐच्छिक पेपर क्रमांक DSE-42 सत्र चार साठी 'भारतातील पक्षीय व्यवस्था' हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

भारतातील पक्षीय व्यवस्था यामध्ये काँग्रेस एक प्रबळ पक्षपद्धती (व्यवस्था), बहुपक्षपद्धती, आघाडीची सरकारे आणि भारतीय पक्षपद्धती, भारतीय जनता पार्टीची भारतातील एक पक्षीय व्यवस्था या घटकांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. रविंद्र भणगे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. त्याचप्रमाणे राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, ज्येष्ठ अभ्यासक डॉ. अशोक चौसाळकर, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे मी आभार मानते.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे, केंद्रातील सर्व सहकारी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**

राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## अभ्यास घटकांचे लेखक


| लेखक | घटक क्रमांक |
| --- | --- |
| **प्रा. डॉ. सुरेश गंगाराम कुंभार**<br>राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय, औंध, ता. खटाव, जि. सातारा | १ |
| **डॉ. सचिन भोसले**<br>दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १ |
| **डॉ. नामदेव रघुनाथ गवळी**<br>म्हैसाळ महाविद्यालय, म्हैसाळ | २ |
| **डॉ. सुर्यकांत गायकवाड**<br>दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | २ |
| **प्रा. डॉ. विक्रमराव नारायणराव पाटील**<br>शंकरराव जगताप आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, वाघोली,<br>ता. कोरेगाव, जि. सातारा | ३ |
| **प्रा. मदन जहाँगीर पाडवी**<br>राज्यशास्त्र विभाग, मुधोजी महाविद्यालय, फलटण, जि. सातारा. | ४ |

**■ संपादक ■**

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**

राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | काँग्रेस एक प्रबळ पक्षपद्धती (व्यवस्था) | १ |
| २. | बहुपक्षपद्धती | २५ |
| ३. | आघाडीची सरकारे आणि भारतीय पक्षपद्धती | ४७ |
| ४. | भारतीय जनता पार्टीची भारतातील एक पक्षीय व्यवस्था | ६४ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२३-२४ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## घटक १

## आघाडीची सरकारे आणि भारतीय पक्षपद्धती

अनुक्रमणिका

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

- १.२.१ लोकशाही आणि राजकीय पक्ष
- १.२.२ काँग्रेस एकप्रबळ पक्षपद्धती (वर्चस्व व्यवस्था - १९५२-७७)
- १.२.३ काँग्रेस व्यवस्थेचा ऱ्हास पहिला टप्पा (१९७७-१९८०, १९८९ पर्यंत)
- १.२.४ काँग्रेस व्यवस्थेचे बदलते स्वरूप (१९८० ते १९८९)
- १.२.५ काँग्रेस ऱ्हासाचा दुसरा टप्पा

१.३ पारिभाषिक शब्द

१.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

### १.० उद्दिष्ट्ये :

- १९५२ ते १९७७ या काळातील काँग्रेस पक्षाच्या वर्चस्व व्यवस्थेचा अभ्यास करता येईल.
- १९७७ ते १९८०, १९८९ काँग्रेस वर्चस्व व्यवस्थेच्या ऱ्हासाची कारणमीमांसा करता येईल.
- १९८० ते १९८९ या काळातील काँग्रेस व्यवस्थेचे बदलते स्वरूप समजून घेता येईल.
- काँग्रेस पक्षाच्या वाटचालीचा अभ्यास करणे.
- १९७७ ते १९८९ पर्यंत काँग्रेस पक्षाच्या ऱ्हासाचा आढावा घेणे.
- १९८० ते १९८९ पर्यंत काँग्रेस पक्षाचे बदलते स्वरूप अभ्यासने.

## १.१ प्रस्तावना :

### १.२.१ लोकशाही आणि राजकीय पक्ष :

आधुनिक काळामध्ये समाजरचना अधिकाधिक जटील झाली आहे. समाजातील विविध घटकांमध्ये शासनसंस्थेकडून अनेक प्रकारच्या गरजा/अपेक्षा बाळगल्या जातात. या सर्व घटकांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक, भाषिक व इतर क्षेत्रांमधील मागण्या पूर्ण करून घेण्यासाठी समाजामध्ये अनेक गट निर्माण होतात. या गटांतील सत्ता स्पर्धेतून राजकीय पक्षांची निर्मिती व वाढ होत असते. एडमंड बर्क यांच्या मते, ''विस्तृत राष्ट्रीय हितसंबंधाची जोपासणा करणारी आणि लोकशाही मार्गाने सरकार बनवून आपली योजना किंवा ध्येये प्रत्यक्षात राबवू पाहणाऱ्या व्यक्तींचा समूह किंवा संघटना म्हणजे राजकीय पक्ष होय.'' राजकीय प्रश्नासंबंधी कोणताही दृष्टिकोन घेतला तरी आधुनिक लोकशाही राजकीय व्यवस्थेमध्ये त्यांना फार महत्त्वाचे स्थान आहे. समाजातील अनेक प्रकारच्या मागण्या आणि समस्या यांच्यामध्ये सुसूत्रता आणण्याचे महत्त्वाचे कार्य राजकीय पक्षांना पार पाडावे लागते. सामाजिक, आर्थिक आणि राष्ट्रीय मुख्य प्रश्नासंबंधी सारासार विचार करून निश्चित मत व्यक्त करणे व त्याबाबत प्रभावी जनमत निर्माण करण्याचे काम राजकीय पक्षांना लोकशाही व्यवस्थेमध्ये करावे लागते लोकशाही व्यवस्थामध्ये शांततामय बदल घडवून आणणे आवश्यक तेव्हा सत्तेवर येऊन सरकार स्थापन करणे तसेच जनता व शासनव्यवस्था यामध्ये समन्वय प्रस्थापित करणे हे राजकीय पक्षाचे मुख्य काम आहे. मात्र राजकीय पक्षांच्या कार्यपद्धतीमध्ये कोणत्याही प्रकारची सुसूत्रता, सातत्य आढळत नाही. यासंबंधी रिचर्ड एस. पार्क यांनी आशियासंबंधी असे म्हणतात की, स्वातंत्र्य चळवळ एकूण पाश्चात्य धरतीच्या पक्षपद्धतीला जन्म देण्यास प्रतिकूल ठरते. साम्राज्यवादी सत्ताधीशाला विरोध करण्यासाठी व स्वातंत्र्य मिळवण्यासाठी सगळे गट कटिबद्ध होऊन एका संघटनेत जमतात, पुन्हा स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते फुटतात. त्यातून लहान लहान राजकीय वर्तुळे निर्माण होतात. म्हणूनच पुढे रुसो, जॉर्ज वॉशिंग्टन पासून आधुनिक राजकीय विचारवंतांनी तसेच मानवेंद्रनाथ रॉय, जयप्रकाश नारायण या विभूतींनी तसेच गांधीजींनी ग्रामराज्य कल्पनाही पक्षविरहित आहे या माध्यमातून पक्षविरहित राज्यव्यवस्थाच भारतासाठी उपयुक्त आहे. कारण राजकीय पक्षामुळे स्वार्थी शुद्र व संकूचित प्रवृत्ती तसेच समाजात दुहीही निर्माण होते. व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच होऊन व्यक्तीला प्रसंगी सद्सद्विवेकबुद्धी विरोधी वागावे लागते. यामुळे पक्षविरहित लोकशाही व्यवस्थेचा पुरस्कार केला जातो. मात्र राजकीय पक्षाच्या माध्यमातून राजकीय नेतृत्त्वाची उभारणी व समाजाला स्थैर्य प्राप्त करून देणे अशा प्रकारची महत्त्वपूर्ण भूमिका राजकीय पक्षाला लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये पार पाडावी लागते. त्यामुळेच भारतीय लोकशाही व्यवस्थेमध्ये राजकीय पक्षाला अनन्य साधारण महत्त्व आहे.

राजकीय पक्षाचे अस्तित्व आधुनिक राजकिय व्यवस्थेमध्ये अटळ आहे. पक्ष राजकिय व्यवस्थेमध्ये फार महत्त्वाची भूमिका बजावतात. कारण राजकीय पक्षांच्या माध्यमातून लोकमत संघटितरित्या व्यक्त होते. मात्र भारतीय पद्धतीचे विशिष्ट प्रकारात वर्गीकरण करणे अत्यंत अवघड आहे. कारण पाश्चिमात्त्य देशांत आढळणाऱ्या पक्षांच्या चौकटीत इथली पक्षव्यवस्था बसू शकत नाही. कारण ज्या समाजात राजकिय

व्यवस्था उत्क्रांत होत जाते त्या समाजाच्या विचारसरणीतून पक्ष आकाराला येतात. तसे भारतात घडले नाही. भारतात राष्ट्रीय चळवळीचे रूपांतर राजकीय पक्षात झाले आहे.

भारतात पक्षपद्धतीचे स्वरूप हे बहुपक्षपद्धतीचे असल्याने राष्ट्रीय व प्रादेशिक स्तरावर अनेक राजकीय पक्ष निर्माण झाले. तरीही देशात एकपक्ष प्रबळ बहुपक्ष पद्धतीचे स्वरूप जाणवते.

**काँग्रेस पक्ष :**

काँग्रेस पक्षाचे संघटन व पक्षनिर्मिती प्रक्रियेचे स्वरूप खालीलप्रमाणे विशद केलेले आहे.

**क्राँग्रेस पक्षाचे संघटन (पक्षरचना) :**

(अ) अखिल भारतीय काँग्रेस समिती (AICC)

(ब) प्रदेश काँग्रेस समिती

(क) जिल्हा काँग्रेस समिती

(ड) तालुका काँग्रेस समिती (मंडळ समिती)

**काँग्रेस पक्षाचे सभासदत्त्व (Membership of Congress) :**

(१) प्राथमिक सभासद - ज्याने वयाची १८ वर्षे पूर्ण केलेली आहेत अशा कोणत्याही व्यक्तीला काँग्रेसचे प्राथमिक सभासदत्त्व मिळते.

(२) क्रियाशील सभासद - वयाची २१ वर्षे पूर्ण व किमान दोन वर्षे प्राथमिक सभासद असणाऱ्या क्रियाशील सभासदत्त्व मिळते.

(३) स्वीकृत - इतर राजकीय पक्षातून काही नेते व त्यांचे अनुयायी काँग्रेस पक्षात प्रवेश करतात त्यांनाही काँग्रसचे सभासदत्त्व देण्यात येते. सभासदत्त्व स्वीकारल्यावर ठराविक फी नियमित भरावी लागते.

**काँग्रेसची ध्येयधोरण :**

स्वातंत्र्य लढ्याची ऐतिहासिक परंपरा असणारा काँग्रेस हा देशातील महत्त्वाचा राष्ट्रीय पक्ष आहे. आजपर्यंतच्या पक्षाच्या वाटचालीतून पुढील काही ध्येयधोरणे व कार्यक्रम स्पष्ट होतात.

**(१) मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार :** पं. नेहरूंवर समाजवादी विचारसरणीचा विशेष प्रभाव होता. १९५५ च्या आवडी अधिवेशनात लोकशाही समाजवादाचा स्वीकार करण्यात आला. देशातील आर्थिक विषमता दूर करून दारिद्र्य कमी करण्यासाठी काँग्रेसने मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली. भांडवलशाहीवर नियंत्रण व गरीब जनतेला आर्थिक न्याय देताना महत्त्वाच्या उद्योगांचे राष्ट्रीयकरण व दुय्यम व्यवसायात खाजगी मालकी व त्यावर नियंत्रण तसेच जातीय व वर्गीय मतभेद मिटवून सर्वांना विकासात समान संधी तत्त्वाचा स्वीकार केला.

**(२) औद्योगिक विकास :** राष्ट्रीय साधनसंपत्तीचा जास्तीत जास्त वापर करून औद्योगिक उत्पादन वाढविणे, आर्थिक शोषण, वेठबिगारी, नफा, मक्तेदारीवर नियंत्रण, उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण, संपत्तीची न्याय वाटणी, दारिद्र्य, बेकारी कमी करताना दरडोई उत्पन्न वाढविणे. रोजगार निर्मिती करणे इ. समाजवादी धोरणांचा अवलंब, पंचवार्षिक योजना व नियोजन मंडळाच्या माध्यमातून वापर करण्याचा प्रयत्न केला.

**(३) शिक्षण विकास :** सर्वांना शिक्षण, तंत्रज्ञानाची सोय, प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत, व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणावर भर तसेच देशातील निरक्षरता कमी करण्याचा प्रयत्न काँग्रसने केलेला दिसतो.

**(४) शेती विकास :** भारत हा शेतीप्रधान देश असल्याने ग्रामीण पुनर्रचनेसाठी काँग्रेसने शेती विकासावर भर दिला. शेतीसाठी भांडवल, खते, पाणीपुरवठा, आधुनिक तंत्रज्ञान, औषधे, बी-बियाणे, पारंपरिक शेतीऐवजी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करण्यावर व शेतीपूरक सहकार क्षेत्राच्या विकासावर काँग्रेसने भर दिलेला आहे.

**(५) रोजगाराची उपलब्धता :** देशातील गरिबी व बेकारी दूर करण्यासाठी काँग्रेसने समाजवादी धोरणाचा अवलंब करून लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी रस्तेबांधणी, पाटबंधारे, सार्वजनिक बांधकाम इ. प्राधान्य दिले. रोजगार व स्वयंरोजगाराची नवी क्षेत्रे निर्माण केली. बेकार भत्ते, संजय गांधी निराधार योजना याद्वारे दारिद्र्य रेषेखालील लोकांच्या विकासासाठी प्रयत्न केलेले दिसतात.

**(६) परराष्ट्रीय धोरण :** परराष्ट्र धोरणाची सुरुवात काँग्रेस राजवटीत झाली. अलिप्ततावाद, परराष्ट्राशी मैत्री, आंतरराष्ट्रीय शांतता, नि:शस्त्रीकरण, पंचशील, परस्पर सहकार्य, विश्वबंधुत्त्व याबरोबरच गटराजकारण, वर्गविद्‌वेष, साम्राज्यवाद, नवसाम्राज्यवाद, दहशतवाद इ. ना विरोध करून जागतिक स्तरावर शांततामय सहजीवनाला महत्त्व दिले.

**(७) धर्मनिरपेक्ष राज्याचा पुरस्कार :** काँग्रेसने ४२ वी घटना दुरुस्ती करून समाजवादाबरोबर धर्मनिरपेक्ष राज्याचा पुरस्कार केला. प्रत्येक व्यक्तीला आपल्या धर्मानुसार आचरण करता येईल. मात्र धर्माचा राजकारणात हस्तक्षेप होणार नाही. शासन व राज्याचा कोणत्याही धर्माला विशेष पाठिंबा राहणार नाही. सर्वधर्मियांचे समान स्थान राहिल. याबरोबरच गरिबी हटाव, २० कलमी कार्यक्रम, साक्षरता, रोजगार योजना, पंचवार्षिक योजना इ. द्वारे आपली ध्येयधोरणे जनतेसमोर सतत मांडली.

**स्वयंअध्ययन प्रश्न – १ :**

**रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा व वाक्य पुन्हा लिहा.**

१) काँग्रेस पक्षाच्या क्रियाशील सभासदासाठी वयाची मर्यादा .............. वर्षे आहे.

२) काँग्रेसने ............... साली लोकशाही समाजवादाचा स्वीकार केला.

३) काँग्रेसने ............... घटना दुरुस्तीने धर्मनिरपेक्ष राज्याचा पुरस्कार केला.

**स्वातंत्र्यपूर्व काळातील राष्ट्रीय काँग्रेस (निर्मिती) :**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हा भारतातील सर्वांत जुना पक्ष होय. या पक्षाची स्थापना मुंबई येथे २७ डिसेंबर १८८५ रोजी झाली. पण प्रत्यक्ष काँग्रेस पक्षाला जन्म देण्याचे श्रेय उदारमतवादी इंग्रज अधिकाऱ्याकडे जाते ते म्हणजे मि. सर ॲलन ह्यूम यांनी काँग्रेस स्थापनेच्या कामी पुढाकार घेतला. काँग्रेस निर्मितीपूर्वी १८५१ मध्ये 'ब्रिटिश इंडियन असोसिएशन' म्हणून संस्था बंगालमध्ये उदयाला आली. मुंबईची बॉम्बे असोसिएशन, पुण्याची सार्वजनिक सभा, बंगालची इंडियन असोसिएशन या संस्थांचा उदय काँग्रेसच्या अगोदर झाला. काँग्रेसचा उदय होण्याची ही प्रसाद चिन्हे होती. स्वातंत्र्यपूर्व काँग्रेसचे स्वरूप हे चळवळीचे होते. साम्राज्यशाहीशी लढा देऊ इच्छिणारे भिन्न विचारसरणीचे गट काँग्रेसमध्ये समाविष्ट होते.

काँग्रेसच्या स्थापनेत सर ॲलन ह्यूम, दादाभाई नौरोजी, न्या. रानडे, फिरोजशहा मेहता, सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांची भूमिका महत्त्वाची होती. १८८५ ते १९२० हा काँग्रेसच्या इतिहासाचा पहिला कालखंड होता. या काळात काँग्रेसमध्ये जहाल व मवाळ असे दोन गट निर्माण झाले. कारण स्वराज्य चळवळ कोणत्या दिशेने चालवयाची यातील मतभिन्नतेचे, मवाळ गट फिरोजशहा मेहता, दादाभाई नौरोजी, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, गोपाळकृष्ण गोखले इ. नेते होते तर जहाल गटात लो. टिळक, बिपिनचंद्र पाल, लाला लजपतराय इत्यादी नेते होते.. इंडियन नॅशनल काँग्रेस १९१९ पर्यंत दबावगटाच्या स्वरूपातच कार्यरत होती. लोकमान्य टिळकांच्या नेतृत्त्वाखाली पूर्वीपेक्षा तिचा पाया अधिक भक्कम झाला असला तरी म. गांधीजींच्या नेतृत्त्वाच्या उदयापर्यंत ती खऱ्या अर्थाने लोकाभिमुख झाली नव्हती. १९२० पासून गांधी युगाचा उदय झाला. गांधीजींच्या नेतृत्त्वाखाली काँग्रेस ही मूठभर सुशिक्षितांची चळवळ न राहता ती सामान्य जनतेची चळवळ बनली. काँग्रेसच्या स्वरूपात अमूलाग्र बदल झाला. गांधीजींनी काँग्रेसला नवा कार्यक्रम दिला. असहकार, सविनय कायदेभंग, भारत छोडो आंदोलन अशा राजकीय कार्यक्रमाबरोबरच खादी प्रसार, अस्पृश्यता निवारण असे सामाजिक विधायक कार्यक्रम हाती घेतले. स्वातंत्र्य चळवळीत इतरही गट कार्यरत होते. साम्यवादी (१९२०), हिंदू महासभा, मुस्लीम लीग (१९०६) इ. पण काँग्रेसची चळवळ हाच मुख्य प्रवाह राहिला. या काळात पं. जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, राजगोपालचारी, सुभाषचंद्र बोस, राजेंद्रप्रसाद, जयप्रकाश नारायण, राम मनोहर लोहिया हे काँग्रेसचे धुरिण नेते होते.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्त्व काँग्रेसेकडे असल्याने एक संघटना म्हणून काँग्रेसचा विकास जास्त झाला. १९३५ च्या कायद्याने मताधिकाराचा विस्तार झाल्याने प्रांतिक सरकारचे अधिकार वाढले. त्यामुळे पक्षीय राजकारणाचा उदय झाला. मुस्लिम लीग, हिंदू महासभा, कम्युनिस्ट व स्वतंत्र मजूर पक्ष असे वेगवेगळे पक्ष उदयाला आले. मुस्लीम लीग व हिंदू महासभा यांना काँग्रेसची राष्ट्राविषयीची भूमिका अमान्य होती. त्यामुळे त्यांचे धोरण काँग्रेस विरोधी राहिले. तर कम्युनिस्टांना काँग्रेसची 'वर्गसमन्यायाची' भूमिका मान्य नसल्याने ते काँग्रेसच्या भांडवलशाही राष्ट्रवादाच्या विरोधी होते. डॉ. आंबेडकर व दक्षिणेत पेरियार यांना काँग्रेस पक्ष हा उच्च जातीच्या वर्चस्वाचे समर्थन करतो किंवा निदान त्याकडे दुर्लक्ष करतो, असे वाटत होते. जातीच्या प्रश्नावर त्यांना काँग्रेसची भूमिका अपूर्ण वाटल्यामुळे या दोन्ही चळवळी काँग्रेसला प्रतिकूल राहिल्या.

काँग्रेस पक्षाच्या मध्यवर्ती स्थानामुळे इतर पक्ष व गट हे काँग्रेसविरोधी राहिले. १९३५ नंतर अनेक प्रांतात काँग्रेसची सरकारे स्थापन झाली. पुढे १९४६ ला काँग्रेस पक्ष हंगामी सरकारचा मुख्य घटक बनला.

स्वातंत्र्यानंतर (१९४७) मुस्लीम लीग व हिंदु महासभा या दोन्ही शक्ती संपुष्टात आल्या. पुढे राज्यघटना निर्मितीचे काम सुरू झाले. १९४७ ते १९५० या टप्प्यावर काँग्रेसने कोणतीही ठाम वैचारिक भूमिका घेण्याचे टाळले. लोकशाही, राष्ट्रवाद व सार्वजनिक कल्याण हे तीनच मुद्दे राजकारण आणि शासन व्यवहाराचे मुख्य आधार बनले. त्यामुळे काँग्रेसच्या विरोधात राजकारण करणे इतर पक्षांना मुश्किल झाले.

### १.२.२ काँग्रेस एकप्रबळ पक्षपद्धती (वर्चस्व व्यवस्था – १९५२–७७) : (Congress Dominance 1952-77) :

स्वातंत्र्योत्तर काळात अखंड तीस वर्षे पर्यंत भारतातील काँग्रेस पक्षाचे स्थान केवळ देशातच नव्हे तर एकंदरीत जगाच्या पक्षपद्धतीत अद्वितीय झाले होते. इतर देशातील काही साम्यवादी पक्षाचा अपवाद वगळता हा कदाचित जगातील सर्वांत मोठा पक्ष ठरावा. कृष्ण मेनन मायकेल ब्रेशरशी बोलताना एकदा म्हणाले होते, ''काँग्रेस पक्षाचे सर्वात मोठे सामर्थ्य यात आहे की, त्याला जनतेच्या ह्रदयात स्थान आहे. त्याची जागा कोणताच राजकीय पक्ष घेऊ शकत नाही. त्याच्याभोवती एक प्रकारचे गूढ वलय आहे.''

**१९५२ ते १९७७ या काळातील काँग्रेस व्यवस्थाचे निवडणुकीतील यश आणि राज्याराज्यातील प्रादेशिक पक्षांची कामगिरी :**

१९५२ मधील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांमुळे पंडीत जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्त्वाखाली काँग्रेस पक्षाला ४५% मते मिळाली तरी लोकसंख्येच्या ७४.४% प्रमाणातील मतदारांपैकी जागा ४८९ पैकी ३६४ जागा मिळाल्या. या निवडणूकांमध्ये विरोधी पक्षाची जागा मिळविलेल्या भारतीय कम्युनिस्ट पक्षाला ५.०५% मते म्हणजे फक्त २६ जागा मिळाल्या. समाजवादी पक्षाला १०.०५% मते मिळवूनही निवडणुकांतही काँग्रेस पक्षाला ओरिसा आणि त्या वेळी अस्तित्वात असणारी पेप्सु, त्रावणकोर व कोचीन ही राज्ये वगळून इतर सर्व राज्यात निर्विवाद बहुमत मिळाले.

१९५७ व १९६२ च्या निवडणुकीतील कामगिरी सातत्याने चालू होती. १९५७ मधील निवडणुकीत काँग्रेस पक्षाला लोकसभेत ४७.७८% मते ७५.१% जागा म्हणजेच ४९० जागांपैकी पैकी ३७१ जागा मिळाल्या. केरळ राज्याचा उपवाद वगळता सर्व राज्यात काँग्रेस पक्षाला बहुमत प्राप्त झाले. १९६२ मधील सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस पक्षाला लोकसभेत ४९४ पैकी ३६१ जागा मिळाल्या. घटकराज्यांच्या निवडणुकांत काँग्रेसला अनेक ठिकाणी स्पर्धात्मक आव्हानाला अनेक पक्षाकडून मिळाले. मात्र काँग्रेसला जम्मू आणि काश्मीरमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत बहुमत मिळाले.

चौथ्या म्हणजेच १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस पक्षाला ५२० जागांपैकी २८३ जागा मिळाल्या, म्हणजेच एकूण जागेच्या ५४.४२% मते मिळाली. त्यांच्या मतांची टक्केवारी ४०.७३% पर्यंत कमी झाली. इतर विरोधी पक्षांनी अनेक ठिकाणी युती करून सरळ लढत केल्याने काँग्रेसला कमी–अधिक

बहुमताच्या आधारे सरकार स्थापन करता आले. उत्तर प्रदेश, केरळ, मद्रास, ओरिसा, पंजाब, राजस्थान, बिहार व पं. बंगाल इ. राज्यामध्ये पुरेसे बहुमत न मिळाल्याने प्रादेशिक पक्षांची मंत्रिमंडळे स्थापन झाली. देशातील प्रादेशिक पक्षांना लक्षणीय यश मिळाले. पुढे १९६९ मध्ये काँग्रेस पक्षामध्ये फूट पडल्यानंतर काँग्रेस पक्षामध्ये अस्थिरता निर्माण झाली होती, अशा परिस्थितीमध्ये इंदिरा गांधीजी यांनी 'लोकानुरंजन' धोरणाच्या माध्यमातून यामध्ये 'गरिबी हटावो, बँकांचे राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तनखे रद्द करणे इ. घोषणा दिल्यामुळे काँग्रेस पक्षाला १९७१ मध्ये लोकसभेची मुदत संपण्यापूर्वी घेतलेल्या पाचव्या सार्वत्रिक निवडणुकांत लोकसभेच्या एकूण ५१८ जागांपैकी ३५२ जागा मिळाल्या. पुढे सत्तारूढ काँग्रेसचे रूपांतर इंदिरा काँग्रेसमध्ये होऊन लवकरच निर्वाचन आयोगाच्या निर्णयाप्रमाणेच हाच पक्ष भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष ठरला.

१९७२ मध्ये प्रथमच इंदिरा गांधी यांनी घेतलेल्या निर्णयाप्रमाणे विधानसभेच्या व लोकसभेच्या निवडणुकात या दोहोंमध्ये फारकत न करता मेघालय, मणिपूर, गोवा या संघराज्यात लहान घटकराज्यांचा अपवाद वगळता इंदिरा काँग्रेसची सरकारे सर्वत्र बहुमतांनी निवडून येवून स्थापन झाली. उदा. १९७२ मध्ये काँग्रेसचे मंत्रिमंडळ पंजाबमध्ये सत्तारूढ झाले. पुढे इंदिरा गांधीजी आणि काँग्रेस पक्षाला विरोधी पक्षांकडून संघटीत विरोध होवू लागला. यामध्ये जयप्रकाश नारायण यांनी गुजरात व बिहार या दोन राज्यातील १९७४ साली विद्यार्थ्यांनी भ्रष्टाचारविरोधी आंदोलन केले. याचे नेतृत्त्व अनुक्रमे त्यांनी केले. अविश्वास आणि तणावाचे वातावरण निर्माण झालेल्या परिस्थितीमध्ये १८ जानेवारी १९७७ रोजी लोकसभेच्या विसर्जनाची घोषणा करण्यात आली. मार्च १९७७ मध्ये सहाव्या सार्वत्रिक निवडणूकीत काँग्रेस पक्षाचा मोठा पराभव झाला. काँग्रेसला लोकसभेत ५४२ जागांपैकी केवळ १५४ (२८.४%) जागा जिंकता आल्या. नव्याने स्थापन झालेल्या जनता पक्षाला म्हणजेच समाजवादी पक्ष, जनसंघ, संघटना काँग्रेस आणि भारतीय क्रांती दल इ. लोकसभेच्या २९५ जागा मिळाल्या म्हणजे जवळजवळ एकूण जागेच्या ५४.४% जागा मिळाल्या. काँग्रेसला उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश, पंजाब, हरियाणा आणि बिहार या राज्यात काँग्रेसला एकही जागा मिळवता आली नाही. मध्यप्रदेश, राज्यस्थान या राज्यात फक्त एक जागा जिंकता आली. इंदिरा गांधींनाही अमेठी मतदारसंघातून पराभवाचा सामना करावा लागला. १९६७ च्या निवडणुकांपेक्षाही अधिक एक प्रबळ पक्षपद्धतीला धक्का बसला. देशातील बहुतेक राज्यातील सार्वत्रिक निवडणुकांमध्ये अनुक्रमे पंजाब व पश्चिम बंगाल ही राज्ये वगळता हरियाणा, हिमालच प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश, बिहार, ओरिसा इ. राज्यात जनता पक्षांची मंत्रिमंडळे अधिकारपदावर आली. मात्र घटकपक्षांमध्ये असलेली अविश्वासाची भावना, नेत्यामध्ये असलेली तीव्र सत्तास्पर्धा यामुळे तसेच या काळात इंदिरा गांधीनी दाखविलेल्या राजकीय कौशल्यामुळे जनता पक्षाचे सरकार फार काळ अधिकारपदावर राहू शकले नाही. पुढे १९६० मध्ये लोकसभेसाठी सातव्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या. या निवडणुकात काँग्रेस पक्षाला ४२.७% मते मिळाली व लोकसभेच्या एकूण ५२९ जागांपैकी ३६२ (६६.७%) जागा मिळाल्या. १९७७ ते १९८० च्या कालखंडात काँग्रेस व्यवस्था मागे होती मात्र पुन्हा ती राज्याराज्यातील प्रादेशिक पक्षाच्या सहकार्याने सत्ता निर्माण करण्यास यशस्वी ठरत होती.


महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्यात काँग्रेस मुख्य स्थानी होता. महाराष्ट्रात १९७८ मध्ये काँग्रेस विरोधी पक्ष सत्तेवर आले. तेव्हा काँग्रेस व्यवस्थेच्या वर्चस्वाला धक्का बसला. कर्नाटकात निजलिंगाप्पा यांची पकड घट्ट होती, त्यामुळे कर्नाटकामध्ये काँग्रेस वर्चस्व निर्माण झाले होते. १९७२ मध्ये निजलिंगप्पा आणि इंदिरा गांधी यांच्यातील संघर्षातून काँग्रेस वर्चस्वाला महाराष्ट्राप्रमाणे कर्नाटकातही धक्का बसला.

ओडिसामध्ये १९५२ मध्ये काँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळत नव्हते. परंतु १९६१-१९६७ या काळात काँग्रेसला ओडिशात बहुमत प्राप्त झाले. मात्र तीन वेगवेगळे नेते या काळात राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्यापैकी हरेकृष्ण महताब यांनी काँग्रेस सोडून जनकाँग्रेसची पक्षाची स्थापना केली त्यामुळे काँग्रेस पक्ष हा ओडिसा राज्यामध्ये कमकुवत झालेला दिसतो.

१९५२ मध्ये काँग्रेस पक्ष आसाम राज्यात सत्तारूढ होता. १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये आसामच्या निवडणुकीचा मुख्य विषय आसामचा सार्वत्रिक विकास होता. त्यावरून आंदोलन होऊन मेधीच्या ऐवजी बमिलाप्रसाद चालिहा राज्याचे मुख्यमंत्री झाले. चालिहा हे १९७० पर्यंत मुख्यमंत्री म्हणून सत्तेवर होते. मात्र देवकांत बरूआ व मोईनुल हक गट वेगळा असूनही काँग्रेसमात्र एकसंघ राहिली. याचे कारण बमिलाप्रसाद चालिहा यांनी इंदिरा गांधींशी जुळवून घेतल्याने काँग्रेसची सत्ता एकसंघ राहण्यास मदत झाली. पुढे मात्र १९६८ पासून आसाममध्ये मलछीत सेनाय ही प्रादेशिक संघटना वाढली. मद्रासमध्ये चक्रवर्ती राजगोपालचारी यांचा प्रभाव होता. परंतु द्रविड चळवळ काँग्रेसच्या विरोधात गेल्याने १९५४-१९६३ यादरम्यान कामराज हे काँग्रेसचे मुख्यमंत्री होते. १९६३ मध्ये कामराज काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले. त्यांनी सार्वजनिक धोरणातून काँग्रेस वर्चस्व घडवले होते. मात्र १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत द्रविड मुन्नेत्र कळघम या पक्षाला विधानसभेच्या ३५ व लोकसभेच्या ०२ जागा मिळाल्या. १९६२ च्या निवडणुकीत विधानसभेच्या २३४ जागांपैकी या पक्षाला विधानसभेच्या ५० व लोकसभेच्या ७ जागा मिळाल्या. १९६७ च्या निवडणुकीत विधानसभेच्या १३८ जागा मिळवून हा पक्ष सत्तेवर आला. १९७१ मध्ये या पक्षाला विधानसभेत १८४ जागा मिळून तो पुन्हा सत्तेवर आला त्यावेळी लोकसभेच्या २३ जागा या पक्षाला मिळाल्या. ऑक्टोबर १९७२ मध्ये द्रविड मुन्नेत्र कळघममधून एम. जी. रामचंद्रन यांनी अखिल भारतीय अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम या पक्षाची स्थापना केली आणि १९७७ मधील विधानसभेच्या निवडणुकीत या पक्षाला १३० जागा मिळाल्या तर द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षाला केवळ ३० जागा मिळाल्या. परंतु १९८० च्या लोकसभा निवडणुकीत आण्णा द्रमुक पक्षाला २ जागा मिळाल्या तर द्रविड मुन्नेत्र कळघम ला १६ जागा मिळाल्या. १९८४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत अण्णा द्रमुक या पक्षाने इंदिरा काँग्रेस पक्षाशी युती केली आणि तो पक्ष सत्तेवर आला.

उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेस पक्ष १९४७-१९६७ या वीस वर्षांत आघाडीवर होता. उत्तर प्रदेशमधून काँग्रेस नेते पंडित जवाहरलाल नेहरू, गोविंद वल्लभ पंत असे प्रभावी नेतृत्त्व काँग्रेसला मिळाले होते. गोविंद वल्लभ पंतानीही राज्यातील डावीकडे झुकलेल्या काँग्रेसला व सनातनी हिंदू विचारांच्या काँग्रेस नेत्यांनाही आटोक्यात ठेवले होते. १९५४ नंतर संपूर्णानंद (१९५७) व चंद्रभानु गुप्ता (१९६०) मुख्यमंत्री झाले. त्यांच्या काळात समाजवाद अस्तित्वात होता. चौधरी चरणसिंग नेहमीप्रमाणे समाजवादापासून दूर होते. अशा प्रकारे

मुख्यमंत्र्यांची गटबाजी अस्तित्वात होती. चंद्रभानु गुप्ता नेहरू विरोधी गटांचे होते. काँग्रेस अध्यक्ष पदावरून नेहरू आणि गुप्ता यांच्यात मतभिन्नता होती. १९६३ मध्ये कामराज योजनेला अनुसरून गुप्तांनी राजीनामा दिल्यानंतर मात्र गुप्ता गटाच्या सुचेता कृपलानी मुख्यमंत्री झाल्या. १९६७ मधील निवडणुकीत वाद सुरू झाला व चौधरी चरणसिंगांनी काँग्रेसपासून फारकत घेवून जन काँग्रेसची स्थापना केली. १९६७ मध्ये उत्तरप्रदेशातील काँग्रेस पक्षाचे वर्चस्व संपुष्ठात आले. म्हणजेच महाराष्ट्र किंवा कर्नाटक राज्यांप्रमाणे उत्तर प्रदेशातील काँग्रेस वर्चस्वाला अधिमान्यता नव्हती. सामाजिक, धार्मिक अभियंत्रिकीकरणाची काँग्रेसची व्यवस्था आणि तिच्यामध्ये असणारी क्षमता कमी होण्यास मदत झाली.



बिहारमध्ये सामाजिक अभियांत्रिकीकरणाच्या प्रयोगाने श्रीकृष्ण सिन्हा व अनुग्रह नारायण सिन्हा यांनी काँग्रेस व्यवस्थेची संरचना निर्माण केली होती. मात्र १९६१ मध्ये श्रीकृष्ण सिन्हा यांच्या मृत्युबरोबर काँग्रेस वर्चस्व संपले. बीरचंद पटेल (कुर्मी) हे मुख्यमंत्री झाले. परंतु सामाजिक दुफळी वाढली (राजपूत – कुर्मी विरोधी ब्राह्मण, भूमिहार, कायस्थ. थोडक्यात, कर्नाटक व महाराष्ट्र राज्यामध्ये काँग्रेस व्यवस्था बिहारमध्ये राहू शकली नाही. ती उत्तरप्रदेशातील प्रयोगप्रमाणेच होती. पश्चिम बंगाल मध्ये १९४७-१९६६ पर्यंत डॉ. बिधानचंद्र रॉय हे चौदा वर्ष मुख्यमंत्री पदी होते. त्या काळात त्यांनी काँग्रेस पक्ष वाढवला होता. राजस्थान मध्ये १९५४ ते १९७१ पर्यंत मोहनलाल सुखाडीया मुख्यमंत्री होते. त्यांनी राजपूत व जाट यांच्यात समतोल राखला. परंतु काँग्रेसला निवडणुकीत चांगले यश मिळाले नाही. राजस्थानच्या जनसामान्यावर धोरणात्मक दिर्घकाळ प्रभाव पाडता आला नाही. १९६२ व १९६७ मध्ये गायत्रीदेवी यांनी काँग्रेस विरोधी प्रचाराची मोहिम उघडली होती. त्यामुळे राजस्थानमध्ये काँग्रेस पक्षाला वर्चस्वाची संरचना निर्माण करण्यात अपयश आले. अशा प्रकारे राज्या-राज्यामधील काँग्रेस व्यवस्थेचा १९५२ ते १९७७ या कालावधीतील वर्चस्वाच्या सत्तेचा चढउतार पाहिला. पश्चिम बंगालमध्ये काँग्रेस व्यवस्थेप्रमाणे कम्युनिष्ठ पक्षाची एक वर्चस्व पक्षपद्धती उदयास आली होती. कारण सामान्य नागरिकांच्या जीवनावर महत्त्वाचा परिणाम करणारी धोरणे आखली होती. राज्यकारभाराचे कौशल्य आणि लोकाभिमुख धोरणे यामुळे डाव्या आघाडीची व्यवस्था उदयास आली. थोडक्यात भारतात पुढे वर्चस्व व धुरिणत्वाच्या आधारे डाव्या आघाडीची व्यवस्थाही पुढे आल्याचे दिसते.

वरील तत्त्वांच्या आधारे १९५२-६२ पर्यंत राजकीय स्पर्धा एकांगी राहिली. याचे मुख्य कारण काँग्रेसच्या संघटनात्मक ताकदीमध्ये होते. राज्या-राज्यात काँग्रेसची प्रादेशिक संघटना मजबूत होती. या काळामध्ये प्रतीक, व्यक्तिमत्व या घटकांना जास्त महत्त्व होते.

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, या काळात सर्व समाजगटात त्यांचे पाठीराखे होते. सगळ्यांचा पक्ष असा शिक्का काँग्रेसवर असल्याने सर्व समाजगटांतील मते मिळत राहिली. स्वातंत्र्यानंतर पहिल्या दीडदोन दशकांदरम्यान सत्तेचे सामाजिक आधार बदलण्याचा मुद्दा पुढे आला नाही. विकास आणि लोकशाही शासन यांची चर्चा झाली पण या दोहोंना एक सामाजिक चेहरा असतो, याची फारशी दखल घेतली गेली नाही. पुढे समाजघटकांच्या जागृतीचे आणि हितसंबंधाचे राजकारण सुरू झाले. परिणामी साठीच्या दशकापासून काँग्रेसपुढे आव्हाने उभी राहू लागली आणि काँग्रेसव्यवस्थेच्या सावलीतून पक्षीय राजकारण बाहेर पडण्यास सुरुवात झाली. याचाच भाग म्हणजे मध्यम जातींच राजकारण उभं राहण्यास उत्तर भारतात सुरवात झाली. लोहियांच्या आगडे आणि पिछडे या वर्गवारीत काही अंशी या नव्या राजकारणाचा बदल दिसू लागला. १९६७ साली ही राजकीयदृष्ट्या निर्माण झालेली वर्गवारी यशस्वी झाली नाही. मात्र १९७७ मध्ये जनता पक्षाच्या राजकारणात पिछड्या जातींनी हातभार लावला. मात्र पिछडे (मागास) आणि मध्यम या वर्गवाऱ्यांमध्ये विसंगती असल्याने पुढील राजकारणातील तो महत्त्वाचा मुद्दा बनला. १९६७ च्या निवडणुकांनी राजकारणात एक बदल झाला तो म्हणजे राज्या-राज्यांतील राजकारणाला वेगळेपण ज्या ९ राज्यांमध्ये १९६७ मध्ये काँग्रेसने सत्ता गमावली आणि यातून राज्य पातळीवर स्वायत्तपणे राजकीय स्पर्धा सुरू झाली. ती अनुक्रमे १९५७ मध्ये केरळ राज्यामध्ये कम्युनिष्ठांची सत्ता त्याचबरोबरीने १९६७ मध्ये प. बंगालच्या

राजकारणातही कम्युनिष्ठ पक्ष महत्त्वाचा बनला. हरियाणा व ओरिसामध्ये स्थानिक नेतृत्वाच्या माध्यमातून नवे प्रादेशिक पक्ष महत्त्वाचे ठरले. मध्यप्रदेश, बिहार, उत्तर प्रदेश या सर्वच ठिकाणी संयुक्त विधायक दलाचा प्रयोग झाला. १९७१-७२ च्या इंदिरा लाटेने ही घडामोड झाकोळून टाकली. पण पुढे १९७७ मध्ये पुन्हा एकदा दक्षिण भारत काँग्रेस बरोबर, पश्चिमेच्या राज्यामध्ये तीव्र स्पर्धा आणि उत्तर भारतात काँग्रेस व्यवस्था सपशेल हरल्याचे चित्र निर्माण झाले. म्हणजे देशभरात सर्व राज्यामध्ये एकसारखी अशा प्रकारची स्पर्धा नव्हती, ही बाब पुढे आली. १९८४ च्या काँग्रेसच्या ऐतिहासिक विजयानंतरही आसाम, मिझोराम, पंजाब या राज्यांमध्ये काँग्रेस सत्तेवर येऊ शकली नाही आणि जम्मू-काश्मिर, आंध्र प्रदेश, कर्नाटक, तमिळनाडू या राज्यांनी आपापली स्वतंत्र पक्षीय स्पर्धा ही सुरू ठेवली.

ब्रिटिश राजवटीत भारतीय स्वातंत्र्यासाठी काम करणाऱ्या काँग्रेस या मोठ्या स्वतंत्र संघटनेचे रूपांतर स्वातंत्र्यानंतर राजकीय पक्षात झाले आणि देशाचे शासन चालविण्यासाठी तो सत्तास्पर्धा आणि निवडणुकीत सामील झाला. १९५२ ते १९६७ या काळात लोकसभेच्या चार सार्वत्रिक निवडणुका झाल्या. त्यात काँग्रेसला बहुमत प्राप्त झाले. मात्र विरोधी पक्षाने आपले कसेबसे अस्तित्व टिकवले. या काळात पं. नेहरूंचा मोठा प्रभाव काँग्रेसवर होता. त्या काळात काँग्रेस हा मास पक्ष होता (१९५०-१९७७). त्याला स्वातंत्र्य लढ्याचा वारसा होता. काँग्रेस पक्षाचे स्वरूप चळवळीच्या माध्यमातून सर्वसमावेशक घडल्याने त्यांना स्थानिक पातळीवर चांगली संघटना बांधता आली. बहुविध हितसंबंधाची समावेशकता हा काँग्रेस पक्षाचा आधार होता. विशेष म्हणजे स्वशासनाचा अधिकार, सामुहिकतेचा अधिकार व विशेष प्रतिनिधीत्वाचा अधिकार काँग्रेसने मान्य केला होता. या विचारामुळे प्रत्येक समाजाचे सहअस्तित्व व लोकशाही अवकाश ही संरचना काँग्रेस व्यवस्थेचा आधार होती. निर्णय प्रक्रियेमध्ये राज्यपातळीवरील नेतृत्त्वाचा सहभाग व घटकराज्यांच्या प्रश्नांच्या बाबतीत स्वायत्तता असा प्रघात नेहरू पंतप्रधान काळात होता. पक्षांतर्गत लोकशाही हे काँग्रेसचे वैशिष्ट्य होते. पं. नेहरूंच्या निधनानंतर १९६४ साली राज्यनेतृत्त्वाने पुढाकार घेतला. पं. नेहरू व लालबहादूर शास्त्री (१९६६) वारसा शोधण्याच्या कार्यात काँग्रेस पक्षाच्या मुख्यमंत्र्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. निर्णय प्रक्रियेवर देखील त्यांचा प्रभाव होता.

**काँग्रेस व्यवस्थेचे यश**

| अ.क्र. | निवडणुकीचे वर्ष | लढविलेल्या जागा | जिंकलेल्या जागा | जागांची टक्केवारी | मतांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | १९५२ | ४७९ | ३६४ | ७४.७३ | ४४.९९ |
| २. | १९५७ | ४९० | ३७१ | ७५.१० | ४७.४८ |
| ३. | १९६२ | ४८८ | ३६१ | ७३.०७ | ४४.७२ |
| ४. | १९६७ | ५१६ | २८३ | ५४.४२ | ४०.७८ |
| ५. | १९७२ | ४४१ | ३५२ | ६७.९५ | ४३.६८ |
| ६. | १९७७ | ४९२ | १५४ | २८.४१ | ९४.५२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७. | १९८० | ४९२ | ३५३ | ६६.७२ | ४२.६९ |
| ८. | १९८४ | ४९१ | ४०४ | ७८.५९ | ४९.१० |
| ९. | १९८९ | ५१० | १९७ | ३७.२४ | ३९.५३ |

मात्र १९६९ सालानंतर पंतप्रधानांच्या हातात सत्ता केंद्रीत झाली व मुख्यमंत्र्यांना दुय्यम दर्जा दिला गेला. १९६६ ला इंदिरा गांधी पंतप्रधानपदी विराजमान झाल्या. मात्र १९६७ पासून कॉंग्रेसची थोडी घसरण सुरू झाली. एकतर लोकसभेत त्यांचे प्रतिनिधित्व घटले व काही राज्यात कॉंग्रेसेत्तर पक्षाची सरकारे सत्तेवर आली. १९६५ ला राष्ट्रपतीच्या निवडीवरून कॉंग्रेस दुभंगली. इंदिराजींच्या नेतृत्त्वाखाली इंडिकेट कॉंग्रेस व मोरारजी देसाई, स. का. पाटील, कामराज आण्णा निजलिंगाप्पाच्या अध्यक्षतेखाली सिंडिकेट (संघटन कॉंग्रेस) याच काळात कॉंग्रेस अंतर्गत प्रधानमंत्र्याच्या आणि पक्षश्रेष्ठींचा गट अशी मोर्चेबांधणी सुरू झाली. दिनेशसिंग, यशवंतराव चव्हाण, द्वारकाप्रसाद मिश्र, कमलकांत त्रिपाठी, अशोक मेहता इ. माणसे पंतप्रधानांच्या विश्वासातली होती. मात्र इंदिरा गांधी या स्वतंत्र वृत्तीच्या होत्या. हे त्यांनी 'रुपयाचे अवमूल्यन' करण्याच्या निर्णयातून दाखवून दिले. तरीही १९६७ पर्यंत सिंडिकेटचे पारडे जड होते.

श्रीमती इंदिराजींनी मुंबई येथे अधिवेशन बोलावून त्यात लोकसभा विसर्जनाची घोषणा केली. दरम्यान, पक्षश्रेष्ठींनी 'इंदिरा हटाव'चा नारा लावला तर इंदिराजींनी 'गरिबी हटाव'ची घोषणा केली. बँकांचे राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तनखेबंदी, बांगलादेश मुक्ती संग्राम, पुरोगामी प्रतिमा, क्रांतिकारी घोषणा जनसामान्यांशी प्रत्यक्ष संवाद इ. मुळे इंदिराजींची लोकप्रियता वाढली. विविध राज्यांच्या विधानसभातही यश मिळाले. इंदिराजींची सत्तारूढ कॉंग्रेस हीच खरी कॉंग्रेस ठरली.

१९७१-७२ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांच्या गटाला ३५२ जागा मिळाल्या तर सिंडिकेट नेतृत्त्वाखालील आघाडीला ६० च्या आसपास जागा मिळाल्या. इंदिराजींनी बहुमताच्या जोरावर १९७३ मध्ये 'पोखरण' येथे अणुचाचणी घेतली व भारताने शांततेसाठी अणुस्फोटाची यशस्वी चाचणी केल्याचे जाहीर केले.

१२ जून १९७५ ला अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निकाल इंदिरा गांधी आणि कॉंग्रेस पक्षाच्या दृष्टिकोनातून अत्यंत धक्कादायक ठरला. या न्यायालयाच्या न्या. जगमोहनलाल सिन्हा यांनी इंदिराजींची निवडणुक भ्रष्टाचाराने सिद्ध झालेल्या आरोपावरून रद्द ठरविली व सहा वर्षे निवडणूक न लढण्याचा ऐतिहासिक निर्णय दिला. मात्र या न्यायालयीन निर्णयाचा सन्मान करता देशाच्या व पक्षाच्या दृष्टीने अत्यंत घातक निर्णय घेतला तो म्हणजे २५ जून १९७५ ला मंत्रिमंडळाचा सल्ला न घेता राष्ट्रपती फकरूद्दीन अली अहमद यांची आणीबाणीच्या अध्यादेशावर मध्यरात्री स्वाक्षरी घेतली आणि देशात 'आणीबाणीची राजवट' म्हणजे इंदिराजींची एकाधिकारशाही सुरू झाली. जनतेच्या उसळणाऱ्या आकांक्षा दडपण्यासाठी, विरोधी पक्षाचे वाढते सामर्थ्य खच्ची करण्यासाठी पक्षांतर्गत बंडाळी मोडून काढण्यासाठी इंदिराजींनी अंतर्गत आणीबाणी पुकारली. विरोधी पक्ष नेत्यांना देशद्रोही ठरवून डांबून ठेवले. संवैधानिक नियम मोडणे, मूलभूत हक्क, वृत्तपत्र स्वातंत्र्य, लोकशाही संकेत यापैकी एकूण एक गोष्टी निकालात काढल्या. या काळ्या

राजवटीलाही पुरोगामी वैचारिकतेचा व गोरगरिबाविषयीच्या कळवळ्याला मुलामा देण्यासाठी वीस कलमी कार्यक्रमाचा जन्म झाला. एकही ठोस योजना या कार्यक्रमात नव्हता. ती केवळ सदिच्छात्मक धोरणांची जंत्री होती.

२९ महिन्यांच्या आणीबाणीनंतर १९७७ ला अन्यायी व जुलमी अवस्थेतून जनतेला सुटकेची संधी मिळाली. मात्र काँग्रेस राजवटीचे पुरोगामित्त्वाचे सगळे बुरखे हुकुमशाही राजवटीने टराटर फाडून टाकले. परकीय राजवटीला आव्हान देणारा पक्ष म्हणून असणारा नावलौकिक धुळीला मिळाला. आणीबाणीच्या काळात विरोधी पक्षाची केलेली धरपकड यातून काँग्रेस, जनसंघ, समाजवादी पक्ष आणि भारतीय क्रांतीदल एकत्र येऊन जनता पक्षाचा उदय झाला व भारतीय राजकारणात १९७७ च्या लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेसला पराभवाला सामोरे जावे लागले व मोरारजी देसाई यांच्या नेतृत्त्वाखाली जनता पक्षाची सत्ता आली. परिणामी, काँग्रेस वर्चस्वाला छेद व ऱ्हासाला सुरवात झाली.

### **१.२.३ काँग्रेस व्यवस्थेचा ऱ्हास : पहिला टप्पा (१९७७-१९८०, १९८९, २०२२ पर्यंत) : (Decline of Congress System) :**

सन १९७७ ते १९८० हा भारतीय राजकारणातील दुसरा कालखंड सुमारे तीन वर्षांचा होता. संघटना काँग्रेस, समाजवादी पक्ष, जनसंघ आणि भारतीय लोकदल हे चार घटक पक्ष एकत्र येऊन जनता पक्ष स्थापन झाला.

संपूर्ण इंदिरा गांधीच्या कालखंडात काँग्रेस तंबू एकखांबीच राहिला. आणीबाणीच्या काळात इंदिराजींना देवकोटीत बसविण्याचे प्रयत्न केले. गोरगरिबांसाठीचा वीस कलमी कार्यक्रमाचा उदो उदो सुरू ठेऊन दुसरीकडे सत्तेचा एकाधिकार स्वत:च्या व चिरंजीवाच्या हातात एकवटला. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे पुतणे श्री. अरविंद बोस यांनी पत्राद्वारे पंतप्रधानांना असे कळविले की, ''तुमच्या व्यक्तिगत नेतृत्त्वाखाली काँग्रेस पक्ष व शासन व्यक्तीपूजेकडे व एकाधिकारशाहीकडे जात असून सरळसरळ लोकशाही विरोधी पवित्रे घेत आहे. तुम्ही सत्तेवर आल्यानंतर पहिला बळी लोकशाही समाजवादाचा पाडला आहे.''

१९७७ सालच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला मोठा हादरा बसला. तो जगजीवनराम यांनी मंत्रिमंडळ व काँग्रेस पक्षाचा दिलेला राजीनामा. १९६९ च्या फुटीपेक्षा तो आघात मोठा होता. आणीबाणीनंतर अनेक विरोधी पक्ष (गैर काँग्रेसवादी) एकत्र आले. संघ-जनसंघाचे नेते (कार्यकर्ते) प्रथमच सामील झाले. १९७७ च्या निवडणुकीत संपूर्ण उत्तर भारतातील काँग्रेसच्या दोन जागा सोडल्या तर जवळपास सर्वच जागा नवनिर्मित व त्यांच्या मित्रपक्षांनी जिंकल्या. जवळपास ३० वर्षांची काँग्रेसची शासकीय सत्ता संपुष्टात आली. त्यावेळी जनता पक्षाची रितसर घटना देखील नव्हती. जनता पक्षाला लोकसभेत २७१ जागा मिळवून मोरारजी देसाई पंतप्रधान झाले. परंतु घटक पक्षातील कलह, चरणसिंग यांची महत्त्वाकांक्षा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व संघाशी पूर्वीच्या जनसंघाने ठेवलेल्या संबंधामुळे निर्माण झालेला दुहेरी सदस्यत्वाचा वाद व अन्य कारणांनी जनतापक्ष फार काळ अधिकारावर राहू शकला नाही व १९७९ मध्ये मोरारजींनी राजीनामा दिला व जनता पक्षाच्या विघटनाची प्रक्रिया सुरू झाली.

१९७७ च्या ६ व्या लोकसभा निवडणुकीत विविध राजकीय पक्षांनी जे एकमेकांशी समझोते केले, तडजोड केल्या त्यातून मात्र भारतीय राज्यव्यवस्थेचे ध्रुवीकरण द्विपक्ष पद्धतीकडे वा बहुपक्षपद्धतीकडे एक पाऊल पडले. ध्रुवीकरण डावे-उजवे, पुरोगामी-प्रतिगामी असे न होता सरंजामशाही विरुद्ध लोकशाही असे झाले. गैरकाँग्रेसवादी पक्षव्यवस्थेला सत्ता स्पर्धा करता आली.

जनता पक्षाच्या ध्रुवीकरणाचा प्रयोग फसल्यावर काँग्रेस विरोधी पक्षात फाटाफूट झाली. १९८० च्या निवडणुकीत काँग्रेस पुन्हा प्रभावी ठरला. पण एकपक्ष वर्चस्वाचे हे चिरंतन वैशिष्ट्य म्हणता येणार नाही. (बहुपक्षपद्धती) १९८०-८४ च्या अखेरपर्यंत निवडणुकीत काँग्रेसला बरेच यश मिळाले, पण १९८४ पर्यंत यशाच्या शिखरावर असलेल्या काँग्रेसला १९८५ च्या विधानसभा निवडणुकीत अकरा राज्यात काँग्रेस विरोधी राजकीय पक्षाच्या हातात शासन सत्ता गेली. संसदेत काँग्रेसला पाठिंबा मिळाला तरी राज्यात मात्र प्रादेशिक पक्षांचा प्रभाव वाढत गेला. १९७८ मध्ये महाराष्ट्रात विरोधी पक्ष सत्तेवर आले. तेंव्हा काँग्रेस व्यवस्थेच्या वर्चस्वाला धुरिणत्वासह तडा गेला. हीच अवस्था १९७२ मध्ये इंदिरा गांधी व निजलिंगाप्पा यांच्यातील संघर्षातून कर्नाटकात झाली होती. १९८० च्या कालखंडाचे वैशिष्ट्य म्हणजे घटक राज्यातील मुख्यमंत्र्यांना आपल्या इच्छेनुसार बदलून इंदिरा गांधींनी तेथील गटराजकारणात हस्तक्षेप केल्यामुळे राज्यातून काँग्रेसची प्रतिमा व पक्षसंघटना ढासळत गेली. १९८४ च्या इंदिरा गांधींच्या हत्येनंतर राजीव गांधी पंतप्रधान झाले. त्यांनी पक्षात लोकशाही व विकेंद्रीकरण आणण्याचा प्रयत्न केला. आधुनिकीकरणावर विशेष भर दिला. परंतु बोफोर्स तोफा व विमानांच्या खरेदी प्रकरणची त्यांची स्वच्छ प्रतिमा मलिन झाली व पुढे १९८९ च्या निवडणुकीत त्यांना बचावाचा पवित्रा घ्यावा लागला. त्यांना तुलनेने या निवडणुकीत (१९७) सर्वाधिक जागा मिळाल्या, पण त्यांना स्पष्ट बहुमत मिळाले नाही. जनता दलाचे व्ही. पी. सिंगांचे सरकार पाच पक्षांशी युती करून सत्तेवर आले. काँग्रेसने मात्र विरोधी पक्षाची भूमिका बजावली. त्यास भाजपने बाहेरून पाठिंबा दिला. व्ही. पी. सिंग सरकारला संसदेत स्पष्ट बहुमत मिळवता आले. मात्र भाजपने आपला पाठिंबा काढून घेतला व व्ही. पी. सिंग सरकार गडगडले. भाजपने अयोध्येत राम मंदिराचा व हिंदुत्वाची प्रखर भूमिका घ्यायला सुरवात केली. तर जनता पक्षाने मंडल आयोगाची घोषणा करून मागासवर्गीयांसाठी आरक्षणाचे रान उठविले. या युतीचा शासनपक्ष एकजिनशीपणा राहिला नाही.

एकूण १९८० ते १९८८ या काळात नवीन काँग्रेस व्यवस्थेत लोकानुरंजनवाद, सार्वजनिक धोरणांची पुनर्रचना, टेक्नॉलॉजिक संरचनेचे अभियांत्रिकीकरण हे पक्षपद्धतीचे त्या काळात गुणधर्म राहिले. राजकीय पक्षांच्या विघटनाला सुरवात झाली व विविध प्रादेशिक पक्षांचा उदय झाला.

### १.२.४ काँग्रेस व्यवस्थेचे बदलते स्वरूप (१९८० ते १९८९) : (Changing Nature of Congress System - 1980 to 1989) :

सन १९७७ ते १९७९ या काळात सत्तेवर असलेल्या जनता पक्षाच्या पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी राजीनामा दिला व जनता पक्षाच्या विघटनाला सुरुवात झाली. १९८० नंतर इंदिरा गांधी पुन्हा पंतप्रधान झाल्यानंतर काँग्रेस पक्षाच्या भूमिकेत बदलाला सुरवात झाली. समाजवादाशी काडीमोड घेण्यास सुरवात

झाली. राजीव गांधींच्या काळात पं. नेहरूंच्या 'फेबियन सोशॅलिझम' आणि इंदिराजींच्या 'प्रचारकी समाजवाद' या दोन्ही तत्त्वप्रणालीला तिलांजली देण्यात आली. राजीव गांधी यांचा धंदेवाईक व्यवस्थापनात्मक दृष्टिकोण, बाजारप्रक्रियाचा अर्थव्यवस्था बेतण्याचा त्यांचा निर्धार हा एकूणच समाजवादी समाजरचनेला छेद देण्याचा प्रयत्न दिसून येतो. खाजगीकरण हे बड्या भांडवलशाही राष्ट्रांना परवडते. मात्र राजीव गांधींचा आर्थिक कार्यक्रम हा जागतिक पातळीवरचा नवसाम्राज्यवादाचा/नवसाहतवादाचा अविष्कार आहे अशी टीकाही केली जाते.

सर्वसामान्य गरिब जनतेच्या दैनंदिन गरजा बाजूला सारून चैनीच्या वस्तूंचे उत्पादन वाढविणे, आयात-निर्यातीवरील नियंत्रणे उठविणे, कंपनी व व्यक्ती यांच्या उत्पन्नावरील कर कमी करणे, मक्तेदारी विषयक कायद्यात भांडवलदार धार्जिने बदल करणे, अनिवासी भारतीयांना विशेष सवलती, बहुराष्ट्रीय कंपन्यांना विशेष सवलती ही राजीव गांधी धोरणाची ठळक वैशिष्ट्ये सांगता येतील.

वरील धोरणांमुळे कामगार कपात धोरण, देशी उद्योगधंदे बसणार, परकीय भांडवलाची भारतीय अर्थ व्यवस्थेवरील पकड, विकासाचे कोणतेही प्रारूप नव्हते. त्यामुळे जनतेच्या मूलभूत गरजांचीही पूर्तता न होणे, खाजगीकरणातून मक्तेदारी फोफावणार इ. गोष्टींचे त्यावेळच्या कॉंग्रेस व्यवस्थेला काहीच तमा नव्हती. आधुनिकीकरणाच्या व २१ व्या शतकाकडे देशाला घेऊन जाण्याच्या नावाखाली पश्चिमी देशांचे जे अंधानुकरण करण्याच्या राजीव गांधींच्या प्रयत्नातून मागास व कंगाल देशाचे कोणतेही हित साध्य होणार नव्हते.

भारतीय राज्यघटनेतील सामाजिक समता व न्याय इ. उद्दिष्टे या नव्या आर्थिक धोरणांनी साध्य होणार नव्हती.

समाजवादाच्या संदर्भात देशाची अधोगती झपाट्याने झालेली दिसून येते. बेताल औद्योगिकीकरण, शेती व्यवसायाचे व्यापारीकरण यावर भर देणारा निर्णय कॉंग्रेस व्यवस्थेच्या शंभर वर्षांच्या ध्येयधोरणांना तिलांजली देणारा दिसतो. मे १९८५ च्या कॉंग्रेसच्या बैठकीत अर्थमंत्र्यांनी मांडलेल्या मसूद्यात 'समाजवाद' शब्दही नव्हता. भारतीय राजकारणात बहुपक्ष पन्नाशीच्या दशकापासून राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर कार्यरत होते. म्हणून देशात बहुपक्ष पद्धती होती, असा त्याचा अर्थ होत नाही. कारण १९८९ पर्यंत कॉंग्रेस व्यवस्था त्याचे विरोधक अशी सरळ विभागणी होती. १९८९ मध्ये खऱ्या अर्थाने बहुपक्ष पद्धतीचा उदय झाला. कॉंग्रेस व्यवस्था व त्यांचे विरोधक अर्थव्यवस्था मागे पडली व त्याजागी, कॉंग्रेस, भाजप, राष्ट्रीय आघाडी, डावी आघाडी अशा चार गटांमध्ये त्याची विभागणी झाली. द्विध्रुवीय राजकारण बहुध्रुवीय बनले.

सन १९९१ नंतर कॉंग्रेस व्यवस्थेच्या जाहिरनाम्यात पक्षाची समाजवादी व समतावादी भूमिका क्षीण झाली. १९९१ ला सत्तेवर आल्यानंतर कॉंग्रेस पक्षाने 'नवे आर्थिक धोरण' अंमलात आणले व आर्थिक विकासाच्या काही क्षेत्रातून कल्याणकारी जबाबदाऱ्या व काही सार्वजनिक उपक्रमामधून अंग काढून घेण्याची घोषणा ही बदलत्या कॉंग्रेस व्यवस्थेचे स्वरूप असल्याचे दिसते.

सन १९४७ ते ७७ व १९७७ ते ८९ या दोन कालखंडापेक्षा १९८९ नंतरच्या तिसऱ्या कालखंडात काँग्रेस व जनता पक्ष कुटुंबा बाहेरचे पक्षात गतीने वाढ झाली. त्याचबरोबर प्रादेशिक पक्षांचे राष्ट्रीय राजकारणातले महत्त्व वाढलेले दिसून येते. आज पक्षीय व्यवस्थेचा तिसरा टप्पा १९९१ पासून सुरू झाला. त्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे – 'रालोआ व संपुआ' अशा दोन आघाड्यांमध्ये सत्तास्पर्धा घडून आली.

**१.२.५ काँग्रेस ऱ्हासाचा दुसरा टप्पा :**

**बहुपक्ष पद्धतीत बहुपक्ष आघाड्यांचा टप्पा :**

सक्षम व मजबूत राष्ट्रीय पक्षाचे सरकार निर्माण होण्याचा काळ मागे पडून स्थानिक व प्रादेशिक पक्ष हे देशाच्या राजकीय पटलावर महत्त्वाचे ठरू लागले. भारतीय राजकारणातील बदलत्या स्वरूपाचे १९९१ मध्ये ही काँग्रेसला स्पष्ट बहुमत नव्हतेच २३२ जागा मिळवून काँग्रेस सत्तेवर आली. राजीव गांधीजींच्या हत्येनंतर त्यांच्या जागी काँग्रेस अध्यक्षपदी नरसिंह राव यांची निवड करण्यात आली. नेहरू – गांधी – कुटूंबांच्या बाहेरची व्यक्ती पंतप्रधान होऊन सलग पाचवर्ष त्यापदावर राहिली. त्यानंतर म. मनमोहन सिंग पाच वर्ष पंतप्रधान राहिले असले तरी पक्षाचं नेतृत्त्व सोनिया गांधीकडे आहे. मात्र याच कालावधीत १९८१ ते ९१ याकाळात व्ही. पी. सिंग व चंद्रशेखर यांची सरकारे आल्पजिवी ठरली. भाजपला सोमनाथ ते अयोध्या रथयात्रेचा फायदा झाला. या पक्षाचे लोकसभेतील संख्या ८२ वरून १२० झाले तरीही झारखंडमुक्ती मोर्चाच्या पाठिंब्यावर पी. व्ही. नरसिंगराव यांचे सरकार स्थापन झाले. अर्थात हे आघाडीचे सरकार होते. बहुध्रुवी राजकारण द्विध्रुवी करण्याचा प्रयत्न नव्वदीच्या दशकाच्या उत्तरार्धात सुरू झाला. या प्रयत्नांमधून आघाड्याकेंद्रीत पक्षव्यवस्था घडत गेल्या. उदा. रालोआ, संपुआ डावी आघाडी, चौथी आघाडी इ. आघाड्याच्या द्विध्रुवी व्यवस्थेमध्ये मर्यादित पर्याय होते. स्थैर्य, सरंचना विचारप्रणालीतील मतभिन्नता होती. सत्तेची स्पर्धा व्यवस्थेअंतर्गत झाली या संरचना घडत होत्या आणि त्याबरोबर मोडल्या देखील जात होत्या. या काळात भाजपने राष्ट्रीय लोकशाही आघाडीची संरचना सुरू केली. ही आघाडी संपुआच्या अगोदर भारतीय राजकारणात सुरू झाली. भाजपाच्या या संरचनात्मक मिश्रणामध्ये तीन गोष्टी प्रामुख्याने दिसतात – १) हिंदुत्व सहकारी पक्षांच्या गळी उतरवणे, २) राज्यांमधील काँग्रेसच्या वर्चस्वाला विरोधी करण्यासाठी विचारप्रणाली बाजूला ठेवून समझोता करणे म्हणजेच गैरकाँग्रेस, गैरकम्युनिष्ठ आणि गैर धर्मनिरपेक्षता पक्ष व गटांचा एक समझौता निर्माण करणे, ३) हिंदुत्वाच्या विविध गटांचे एकत्रिकरण करून त्यांच्यात समन्वय प्रस्थापित करणे या संरचनेनुसार १९९९ मध्ये या पक्षपद्धतीची राजकीय स्थिती मजबूत झाली, राममंदीर आंदोलन, मुसलमानांचा अनुनय, समान नागरी कायदा, ३७० वे कलम अशा मुद्द्यांच्या आधारे हिंदुत्व आणि जात या दोन चौकटीमध्ये राजकीय ध्रुवीकरण केले काँग्रेसमध्ये या कालावधीत साखर, युरिया, हवाला घोटाळा या प्रकरणामुळे या सरकारची प्रतिमा डागाळलेली होती. त्याच १९९५ मध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात या राज्यामध्ये भाजप सरशी झाली होती. खुल्या व्यापारी धोरणामुळेही काँग्रेसला जनरोषला सामोरे जावे लागते. काँग्रेस अंतर्गत मतभेद (केसरी–तिवारी–अर्जुनसिंग) निर्वाण झाले. या पार्श्वभूमीवर झालेल्या १९९६ च्या निवडणुकीत काँग्रेसला लोकसभेच्या केवळ १४० जागा राखण्यात यश आले. १६१ जागा घेऊन भाजपा लोकसभेत सर्वाधिक मोठा पक्ष म्हणून उदयास आला. तरीही भाजपा लोकसभेत विश्वासदर्शक ठराव

जिंकण्यात यश झाले नाही. परिणामी, भाजपचे १३ दिवसांचे व त्यानंतर देवेगौडा, इंद्रकुमार गुजराल सरकार स्थापन झाले. परंतुही सरकारे अल्पजीव ठरली.

१९९६ च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षास मिळणारी मते कमी झाली १९९८ साली काँग्रेसला शे ३९ टक्के मते मिळाली. १९९१ साली शे. ३७.२ टक्के मिळाली व १९९६ साली शे. ८९ टक्के मते मिळाली. सत्तेवर असतानासुद्धा काँग्रेसचा शे. ८ टक्के मते कमी झाली. उत्तर प्रदेश व बिहारमध्ये पक्षाचा प्रभाव पूर्णत: संपुष्ठात आला. तमिळनाडूत मोपनार यांनी तमिल मनिला काँग्रेस हा प्रादेशिक पक्ष स्थापन केला तर ममता बॅनर्जी यांनी १९९७ मध्ये पक्षाचा राजीनामा देऊन तृणमूल काँग्रेस नावाचा पक्ष स्थापन केला. त्यामुळे पं. बंगाल व तमिळनाडू या महत्त्वाच्या राज्यात काँग्रेस पक्षाची ताकद मोठ्या प्रमाणात कमी झाली. १९९१-९८ या सात वर्षांच्या काळात नेहरू, गांधी कुटूंबातील कोणताही नेता नेतृत्वस्थानी नसताना काँग्रेस पक्षास लोकांचा पाठिंबा मिळत होता. मात्र काँग्रेसपक्षात असुरक्षिततेची भावना होती. घराणेशाही शिवाय आपली धडगत नाही. त्यामुळे १९९८ च्या संसदीय निवडणुकीत काँग्रेससाठी आपण प्रचार करणार आहोत, याच काळात संघटनात्मक दुबळ्या बनलेल्या काँग्रेसमध्ये सोनिया गांधीच्या रूपाने नेतृत्त्व पुढे आले. त्यामुळे काही प्रमाणात पक्षाला उभारी मिळाली असली तरी भाजपाने त्यांच्या विदेशी जन्माचा मुद्दा प्रभावीपणे पुढे आणला. सोनिया गांधी विरुद्ध वाजपेयी अशी नेतृत्वाची स्पर्धा उभी करून भाजपाने विविध राज्यांमध्ये व्यवहार्य आघाड्या साकारण्यात यश मिळविले. परिणामी, १९९८ च्या निवडणुकीचा निकाल भाजपाच्या बाजूने लागला. १९९६ च्या निवडणुकीच्या तुलनेत १९९८ मध्ये भाजपला १६१ वरून १८२ जागा (२५.६%) मिळविण्यात यश आले. काँग्रेसला मात्र १४१ जागांवर (२५.८%) समाधान मानावे लागले. काँग्रेस पक्षात राहण्यापेक्षा पक्षाच्या बाहेर जाऊन जास्त चांगला राजकीय लाभ मिळू शकतो, या हेतूने शरद पवार यांनी काँग्रेस पक्षाचा त्याग करून राष्ट्रवादी पक्षाची स्थापना केली. अशा प्रकारे ज्यावेळी प्रादेशिक नेतृत्वाकडे अशा प्रकारच्या जाणीवा निर्माण होवू लागल्या. त्यावेळी मात्र काँग्रेस पक्षाचा राजकीय प्रभाव क्षीण होत होता.

१९९१-९८ याकाळात काँग्रेस पक्षाचा पाया सातत्याने संकुचित होत होता. अनेक राज्ये काँग्रेसच्या हातातून निसटत होती. उत्तर भारतात इतर मागास जाती आणि दलित जातींच्या मतदारांच्या जातींच्या आधारे संघटीत करणारे पत्र प्रभावी ठरले. बाबरी मशीदी प्रकरणी काँग्रेसने संधीसाधू व जमातवाद्यांना सोईची भूमिका घेतल्यामुळे नाराज झालेला मुस्लीम समाज पण राजद या पक्षांच्या बाजूने उभा राहिला. उत्तर प्रदेशात मायावती यांनी दलित मतदारांना आपला मूळ आधारभूत जनाधार बनवून त्या आधारे विविध राजकीय आघाड्या बांधायवयास सुरुवात केली. उत्तर भारताचे राजकारण आपल्या ताब्यात ठेवणाऱ्या सवर्ण जातींना आता सत्तेच्या परिघावर जाणे अपरिहार्य ठरले. त्यामुळे त्यांनी काँग्रेसचा त्याग केला व भाजपला पाठिंबा द्यावयास सुरुवात केली. बिहारमध्ये त्यांनी इतर मागास जातींचे नेते नितीशकुमार व शरद यादव यांचे पुढारपण मान्य केले.

याकाळात काँग्रेस पक्षाने नव्या आर्थिक धोरणास सुरुवात केली व राव यांच्यात काळात स्थिर प्रशासन दिले पण सर्वसाधारण काँग्रेसजन त्या सरकारवर नाराजच होता. याकाळात पक्षसंघटना कमजोर होती व

कार्यकर्त्यांचे वैचारिक प्रशिक्षण होत नव्हते. लोकांना प्रेरणा देईल, त्याच्या मनात नवी उमेद निर्माण करील, अशी कोणतीही विचारसरणी काँग्रेस पक्षाजवळ नव्हती. बाबरी मशीद प्रकरणामुळे त्यांची धर्मनिरपेक्षतेबाबत बांधिलकी अल्पसंख्यांकांना पक्की वाटत नव्हती. राज्यात काँग्रेस विरोधक असणाऱ्या प्रादेशिक पक्षांची आघाडी बनवण्यात भाजप नेते श्री. अडवाणी यांना १९९८ साली यश आले. तेलगू देसम नेते चंद्राबाबू नायडू, रामकृष्ण हेगडे, जयललिता, नवीन पटनाईक यांच्यासारखे नेते त्यांनी एकत्र केले व बहुमत मिळवून वाजपेयी यांचे सरकार स्थापन केले.

१९९९ ते २००४ या काळात भाजपचे सरकार होते. सोनिया गांधी यांनी विरोधी पक्षनेत्यांची भूमिका प्रभावीपणे बजावली. या काळात इंडिया शायनिंग या घोषणेतील फालेपणा भाजपाच्या अंगलट आला. तोपर्यंत महाराष्ट्र कर्नाटकसारख्या राज्यातील काँग्रेस सरकारे पुर्नप्रस्थापित झाली होती. परिणामी, २००४ च्या निवडणुकीत लोकसभेच्या १४५ जागा मिळवून काँग्रेस काहींशी सावरली. इंदिरा गांधीनंतर काँग्रेस पक्षावत मजबूर पकड निर्माण करण्यात सोनिया गांधी यांना यश आले होते. १९९८ नंतरच्या काळात काँग्रेसच्या रुपाने मिळालेल्या स्थिर सरकार गांधी–नेहरू घराण्याचे नेतृत्त्व, शेतकऱ्यांना दिलेली कर्जमाफी या काँग्रेसप्रणित डॉ. मनमोहन सिंग सरकारला जमेच्या बाजू होत्या. त्यामुळे २००९ च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे लोकसभेतील संख्याबळ वाढले. काँग्रेसला २०६ जागा (२८.५५%) मिळाल्या. काँग्रेसने भाजपाच्या विरुद्ध मित्र पक्षांची आघाडी बनवावयास सुरुवात केली. त्यात त्यांना द्रमुक, राष्ट्रीय जनता दल, झारखंड मुक्ती मोर्चा, राष्ट्रवादी काँग्रेस इ. पक्षांचा पाठिंबा मिळाला. मोपनार यांचा तमिळ मनिला काँग्रेस पक्ष काँग्रेसमध्ये सामील झाला. डाव्या आघाडीने भाजपाचा पराभव करण्यासाठी काँग्रेसला पाठिंबा दिला व संयुक्त पुरोगामी आघाडीची रचना केली. या काळात भाजपास, असे वाटत होते की, आत त्याच्या पक्षाचा विजय पक्का आहे. पक्षाचे नेते प्रमोद महाजन यांनी आक्रमक अशी प्रचार मोहिम राबवली होती. पण उत्तरप्रदेश हा भाजपासाठी अवघड प्रदेश होता. या अत्यंत गाजलेल्या निवडणुकीत भाजपाचा पराभव झाला व काँग्रेसच्या नेतृत्वाखालची संयुक्त प्रागतिक आघाडी–डावी आघाडीस बहुमत मिळाले. बहुमतासाठी त्यांना मायावती किंवा मुलायमसिंग यादव यांचा पाठिंबा घेण्याची गरज राहिली नाही.

सोनिया गांधींनी काँग्रेस संसदीय पक्षाचे नेतेपद व पंतप्रधानपद नाकारले व त्या जागी डॉ. मनमोहन सिंग यांची नेमणूक केली. इ. स. २००४ मध्ये डॉ. मनमोहन सिंग देशाचे पंतप्रधान झाले, पण पक्षाचे अध्यक्षपद सोनिया गांधी राहिल्या. पक्षाच्या कामकाजाचा भार डॉ. सिंग यांच्यावर नाही. पण सरकारचे काम डॉ. सिंग यांच्या सोपवण्यात आले. डॉ. सिंग व सोनिया गांधी यांच्यात समन्वय / सामंजस्य होते. २००९ साली त्यांच्या सरकारला जास्त बहुमताने निवडून दिले या निवडणुकीच्या वेळी त्यांना डाव्या पक्षांच्या विरोधाचा सामना करावा लागला. गेल्या २५ वर्षातील काँग्रेसच्या वाटचालीतील हा तिसरा टप्पा महत्त्वाच्या आहे. कारण या टप्प्यात सोनिया गांधी, डॉ. मनमोहन सिंग यांनी २००४ साली काँग्रेसला सत्ता मिळवून दिली व २००९ साली जास्त जागा मिळवून डाव्या पक्षांचा पराभव करून त्यास पुन: सत्तेत आले. मात्र काँग्रसचा २००४ ते २००९ साली विजय झालेला असला तरी त्यास मिळालेल्या मतांचा फारसा फरक नाही. २००४

साली पक्षास २ ते २४.५०% मते मिळाली होती. आता ती शे. २९ टक्क्यांच्या आसपास आहेत. काँग्रेसच्या मतांच्या वाढीत उत्तर प्रदेशात राहुल गांधी यांनी केलेला प्रचार महत्त्वाचा होता.

**भाजप एक पक्ष प्रबळ आघाडीचा टप्पा :**

२००४ ते २०१४ या कालावधीमध्ये सलग दोन पंचवार्षिक वर्षामध्ये काँग्रेसची सरकारे आली. काँग्रेसच्या दृष्टीने पहिली टर्म यशस्वी ठरली असली तरी दुसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये काँग्रेसची कामगिरी निराशाजनक राहिली. २००९ नंतर आलेल्या डॉ. सिंग सरकारच्या काळात घोटाळ्यांची मालिका सुरू झाली. कोळसा घोटाळा, ऑलिम्पियाड घोटाळा यासारखी प्रकरणे मांडण्यात विरोधकांना यश आले आणि यामध्ये रॉबर्ट वधेरा, काँग्रेस नेते चिदंबरम् यांची चौकशी यातून काँग्रेसची प्रतिमा अधिकच डागळली. पुढे २००९ नंतर भाजपने गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांना भावी पंतप्रधान म्हणून प्रोजेक्ट केले. त्यासंबंधीचा प्रचार भाजपने सोशल मिडियाद्वारे प्रभावीपणे केला आणि २०१४ च्या १६ व्या लोकसभा निवडणुकांवर याचा परिणाम झाला. अनेक राज्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेससारख्या प्रादेशिक पक्षांनी काँग्रेसची साथ सोडली. त्यामुळे बहुसंख्य ठिकाणी काँग्रेसला एकाकी लढत द्यावी लागली. परिणामी, ४६४ जागा लढविणाऱ्या काँग्रेस लोकसभेच्या केवळ ४४ जागा राखता आल्या. या निवडणुकीत काँग्रेसला मिळालेल्या मतांची टक्केवारी घटून १९.५२ टक्के झाली तर भाजपाने ४२८ जागा लढवून २८२ जागा मिळवून लोकसभेत स्पष्ट बहुमत संपादन केले. या निवडणुकीत काँग्रेसला लोकसभेच्या १/१० जागा मिळाल्यामुळे विरोधी पक्षनेते पदावर बसण्याची संधी देखील मिळाली नाही. खऱ्या अर्थाने विचार केल्यास १९५२ ते ६७ या कालावधीत लोकसभेत विरोधी पक्षनेता नव्हता. ही स्थिती २०१४ च्या १६ व्या लोकसभेलाही लागू झाली आहे.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या निकालाचे वर्णन लोकजनशक्ती पक्षाचे नेते रामविलास पासवान यांनी 'मोदी त्सुनामी' असे केले आहे. यातूनच काँग्रेसच्या अस्तित्वाचे प्रश्न उमटले आहेत. २५ वर्षाच्या आघाडी राजकारणाच्या टप्प्यात भाजपने ३०३ जागा मिळवून ज्याप्रमाणे आघाडी स्थापन करणारा प्रमुख पक्ष हा बहुमतापासून दूर असल्याने त्याला प्रादेशिक पक्षांवर अवलंबून राहवे लागत असे, पण २०१४ आणि २०१९ भाजपाने स्पष्ट बहुमत प्राप्त केल्याने त्याने प्रादेशिक पक्षांवरील अवलंबित्व कमी झाले. त्यामुळे ही जी बहुपक्षीय स्पर्धा दिसत असली तरी आघाडीचे स्वरूप हे एक पक्ष केंद्रीकृत आघाडी शासन झालेले दिसते. भाजपविरोधाच्या राजकारणाचे राष्ट्रीय पक्ष म्हणून काँग्रेसलाच करावे लागणार आहे. ती ताकद प्रादेशिक पक्षांमध्ये आणि त्यांच्या नेत्यामध्ये नाही. हे २०१९ च्या निकालावरून सिद्ध झालेले आहे. त्यामुळे बहुसंख्यांकवादी राजकारणाचा अतिरेक नियंत्रित करण्यासाठी काँग्रेस उपयुक्त ठरू शकते. मात्र आजच्या परिस्थितीत भाजपविरोधात सक्षमपणे उभे राहण्याची ताकद काँग्रेसकडे नाही, सध्या काँग्रेसकडे तीन गोष्टींची कमतरता आहे. १) पक्षाकडे नेतृत्त्व नाही. त्यामुळे पक्ष संघटना खिळखीळी झालेली आहे. २) भाजपाच्या बहुसंख्यांक समाजाच्या नावे सुरू केलेल्या आक्रमक राजकारणाला प्रत्युत्तर देण्यासाठी काँग्रेसकडे पर्याय नाही. ३) काँग्रेस म्हणजे भ्रष्टाचार, मुस्लीम अनुनयच या भाजपने मांडलेल्या समीकरणावर असलेला मतदारांचा विश्वास मोडीत काढण्याची रणनिती पक्षाकडे नाही. राहुल गांधी काँग्रेसचे नेतृत्व करीत आहे.

मात्र त्यांना आत्तापर्यंतच्या निवडणुकांमध्ये फारसे यश मिळाले नाही. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसची धाव ४४ वरून ५२ जागापर्यंत गेली. पाच वर्षातील लोकसभेच्या वाढलेल्या जागा फक्त आठ हे अपयश राहुल गांधीच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह लावणारे आहे. व्यापक अर्थाने बदलत गेलेल्या राजकीय पटलावर काँग्रेसने फारसा विचार केला नाही. किंबहुना नव राजकीय पट काँग्रेसच्या लक्षात आला नाही. गांधी कुटुंबाकडे पक्षाची सत्ता असेल तर पक्ष कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीवर तरून जाईल. या विश्वासावर काँग्रेसची वाटचाल कित्येक वर्ष सुरू आहे. भाजपविरोधी महाआघाडीचे प्रयत्न गेल्या लोकसभेमध्ये मात्र काँग्रेस हाच मोठा अडसर ठरला. विरोधकांची आघाडी असती तरी भाजपचा पराभव झाला नसता, हे निकालाअंती स्पष्ट झाले. पण काँग्रेस त्यातही गांधी घराण्याच्या नेतृत्वाला प्रादेशिक पक्षांनी कडाडून विरोध केला. तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी, बहुजन समाज पक्षाच्या मायावती, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव दिल्लीमध्ये आपचे प्रमुख अरविंद केजरीवाल या प्रादेशिक पक्षाचा काँग्रेसला विरोध होता. या पक्षांनी काँग्रेसशी आघाडी करणे टाळले. महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस तसेच कर्नाटकात जनता दल (धर्मनिरपेक्ष) आंध्रप्रदेशमध्ये तेलगू देसमशी अशा प्रादेशिक पक्षांना भाजपविरोधी लढायचे होते. मात्र काँग्रेसशी युती करणे अमान्य होते. याची परिणीती काँग्रेस द्विधा मन:स्थितीत राहिला. राष्ट्रीय पक्ष या नात्याने जरी काँग्रेसने भाजपा विरोधात थेट आघाडी उघडली असली तरी राहुल गांधीनी एकल्याने नरेंद्र मोदी यांना आव्हान दिले तरीही प्रादेशिक पक्षांशी किती जुळवून घ्यावयाचे आणि अशा प्रकारची भूमिका घेतल्याने किती फायदा होणार याविषयी काँग्रेस साशंक होती. उत्तर प्रदेश प्रमाणेच इतर दिल्ली, हरियाणा आणि पंजाबमध्ये आम आदमी पक्षाशी युती करण्यास काँग्रेस नकार दिला. अन्य राज्यामध्ये काँग्रेस एकटी लढली या एकाकी लढाईमुळे काँग्रेसच्या जागा वाढल्या नाही.

**तक्ता २**

| अ.क्र. | निवडणुक वर्ष | पक्ष | जिंकलेल्या जागा | मतांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | १९९१ | काँग्रेस | २३२ | ३६.२६% |
| २. | १९९६ | भाजपा | १६१ | २०.५९% |
| ३. | १९९८ | भाजपा | १८२ | २५.५९% |
| ४. | १९९९ | भाजपा | १८२ | २३.७५% |
| ५. | २००४ | काँग्रेस | १४५ | २६.५३% |
| ६. | २००९ | काँग्रेस | २०६ | २८.५५% |

**तक्ता ३**

**भाजपाचा एकप्रबळ पक्ष आघाडीचा टप्पा (२०१४–१९)**

| अ.क्र. | निवडणुक वर्ष | पक्ष | जिंकलेल्या जागा | मतांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | २०१४ | भाजपा | २८२ | ३१.००% |
| २. | २०१९ | भाजपा | ३०३ | ३७.३८% |

राजकीय विश्लेषक अभ्यासकांनी मांडलेल्या मतानुसार काँग्रेस पक्षाचे पुनरागमन शक्य आहे.

२०१९ च्या लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला असला तरी काँग्रेसला लोकमताचा कौल हा मतपेटीच्या माध्यमातून एकूण १२ कोटी (शे. २२%) मते मिळाली आहेत, जागा वाढल्या आहेत. ही मते मागच्या वेळी पेक्षा १ कोटी जास्त आहेत. काँग्रेस पक्ष हा गमावलेले जनमत पुन्हा मिळवू शकतो मात्र त्याला खालील संघटनात्मक बदल आचरणात आणावे लागतील.

**काँग्रेस पक्षास :**

- भाजपाच्या नव्या राष्ट्रवादाचे खरे स्वरूप समजावून सांगून, सौम्य हिंदुत्वाचा त्याग करून सर्वसमावेशक राष्ट्रवादाची मांडणी करणे.
- देशाची बदलती आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन आर्थिक विकासाचे नवे प्रतिमान जे मध्यम वर्गास आकर्षित करील असे विकसित करणे, जुने धोरण सोडून देणे.
- व्यक्तिस्वातंत्र्य सहिष्णुता, बहुविधता व लोकशाही यांचे महत्त्व प्रतिपादन करणे राहूल गांधींचा राजीनामा स्विकारून नवा नेता निवडणे गांधी परिवारातील सदस्य अध्यक्ष नसतानाही १९९१-९८
- या काळात पक्षाने १४० पेक्षा जास्त जागा जिंकल्या होत्या.
- घराणेशाही त्याग करून नव्याने पक्ष संघटना बांधणे व जनतेच्या प्रश्नावर चळवळी उभारणे.

**स्वयंअध्ययन प्रश्न – २ :**

**खालील प्रश्नांची उत्तरे एक ते दोन वाक्यत लिहा.**

१) पं. नेहरूंवर कोणत्या विचारसरणीचा प्रभाव होता?

२) स्वातंत्र्यपूर्व काळात जहाल गटाचे नेतृत्त्व कोणी केले?

३) २० कलमी कार्यक्रमाची घोषणा कोणाच्या राजवटीत झाली?

४) कोणता काळ एकप्रबळ पक्षपद्धतीचा काळ होता?

५) सन १९७७ च्या जनता पक्षाच्या राजवटीत देशाचे पंतप्रधान कोण होते?

## १.३ पारिभाषिक शब्द :

**१) मवाळ (नेमस्त) :** सौम्य विचाराचा पुरस्कार, सुधारणावादी आग्रह इ.

**२) गैर काँग्रेस व्यवस्था :** काँग्रेस पक्ष सोडून इतर पक्षांची आघाडी

**३) पुरोगामी :** नवीन विचारसरणी

**४) वेठबिगारी :** कमी पैशात अधिक कष्टाची कामे करून घेणे.

५) **स्वीकृत सभासद :** इतर पक्षातून काँग्रेसमध्ये दाखल झालेले.

६) **संपुआ :** संयुक्त पुरोगामी आघाडी (काँग्रेस व समविचारी पक्ष)

७) **रालोआ :** राष्ट्रीय लोकशाही आघाडी (भाजप व मित्रपक्ष मिळून)

## १.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयंअध्ययन प्रश्न – १ :**

**उत्तरे :** १) २१ वर्षे २) १९५५ आवडी ३) ४२ वी घटनादुरुस्ती

**स्वयंअध्ययन प्रश्न – २ :**

**उत्तरे :** १) लोकशाही समाजवाद

२) लो. टिळक, बिपिनचंद्र पाल, लाला लजपतराय इ.

३) २० कलमी कार्यक्रमाची घोषणा इंदिरा गांधी राजवटीत झाली.

४) १९५२ ते १९७७ – एकप्रबळ पक्षपद्धती

५) पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी

## १.५ सारांश :

राजकीय पक्षाचे अस्तित्व आधुनिक राजकीय व्यवस्थेमध्ये अटळ आहे. कारण राजकीय व्यवस्थेमध्ये राजकीय पक्ष अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हा भारतातील सर्वांत जुना पक्ष होय. २७ डिसेंबर १८८५ ला मुंबई येथे सर ॲलम ह्यूम यांच्या नेतृत्त्वाखाली स्वातंत्र्याचा लढा देण्यासाठी भिन्न विचारसरणीचे गट काँग्रेसमध्ये समाविष्ट होते. स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेस सत्तेच्या राजकारणात उतरली. काँग्रेसवर पं. नेहरूंचा प्रभाव होता. त्यावेळी काँग्रेस मास पक्ष होता. पुढे १९६६ मध्ये इंदिरा गांधी देशाच्या पंतप्रधानपदी विराजमान झाल्या. १९६७ नंतर काँग्रेसची घसरण सुरू झाली. सन १९६९ मध्ये राष्ट्रपतीच्या निवडीवरून काँग्रेसमध्ये दोन गट झाले. इंदिराजींच्या नेतृत्त्वाखाली इंडिकेट व मोरारजी देसाई, स. का. पाटील, कामराज यांचे नेतृत्त्वाखाली सिंडिकेट (संघटना काँग्रेस) पुढे १९७२ च्या लोकसभा निवडणुकीत इंडिकेटला ३५२ जागा मिळाल्या. सिंडिकेट गटाचा पराभव झाला. सन १९७३ ला इंदिराजींनी 'पोखरण' येथे अणुचाचणी घेऊन शांततेसाठी अणुस्फोटाची घोषणा केली. पुढे २० कलमी कार्यक्रमाची त्यांनी घोषणा केली. १९७५ ला अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिराजींची निवड अवैध ठरविली. मात्र न्यायालयाच्या निर्णयाचा सन्मान न करता त्यांनी २५ जून १९७५ ला आणीबाणी घोषित केली व काँग्रेस पक्षात त्यांची एकाधिकारशाही सुरू झाली. आणीबाणीच्या काळात विरोधी पक्षांच्या कार्यकर्त्यांची धरपकड करण्यात आली. यातूनच जनता पक्षाचा उदय होऊन जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले. मात्र अंतर्गत कलह, महत्त्वाकांक्षा यामुळे १९७९ ला जनता

पक्ष सत्तेतून पायउत्तार झाला. १९७७ ते १९७९ हा काँग्रेसच्या ऱ्हासाचा काळ होय. जनता पक्षाचा ध्रुवीकरणाचा प्रयोग फसल्यानंतर १९८० ला काँग्रेस पक्ष पुन्हा प्रभावी ठरला. १९८४ पर्यंत काँग्रेसला लोकप्रियता होती. १९८४ च्या इंदिराजींच्या हत्येनंतर राजीव गांधी यांनी पक्षात लोकशाही विकेंद्रीकरण आणण्याचा प्रयत्न केला. मात्र बोफोर्स तोफा व विमानांच्या खरेदीमध्ये त्यांची प्रतिमा मलिन झाली.

सन १९८९ च्या निवडणुकीत काँग्रेसला सर्वाधिक जागा मिळाल्या. मात्र स्पष्ट बहुमतापासून हा पक्ष दूर राहिला. जनता दलाचे व्ही. पी. सिंग सरकार सत्तेवर आले. दरम्यान भाजपने अयोध्येवर राममंदिर व हिंदुत्वाची प्रखर भूमिका यामुळे व्ही. पी. सिंग सरकार अडचणीत आले.

सन १९८० नंतर काँग्रेसच्या भूमिकेत बदलाला सुरवात झाली. पं. नेहरूंच्या 'फेबियन समाजवाद' व इंदिराजींचा 'प्रचारकी समाजवाद' ही दोन्ही तत्त्वे बाजूला सारून राजीव गांधी यांनी धंदेवाईक व्यवस्थापकीय दृष्टिकोन बाजार प्रक्रियांच्या अर्थव्यवस्था बेतण्याचा त्यांचा निर्धार समाजवादी समाजरचनेला छेद देणारा होता. १९९१ ला सत्तेत आल्यावर काँग्रेसने 'नवे आर्थिक धोरण' अंमलात आणले.

सन १९४७ ते १९७७ व सन १९७७-८९ या दोन कालखंडापेक्षा १९८९ च्या तिसऱ्या कालखंडात काँग्रेस आणि जनता पक्षाच्या कुटुंबाबाहेरचे पक्ष गतीने वाढले व प्रादेशिक पक्षांचे राष्ट्रीय राजकारणात महत्त्व वाढले.

२५ वर्षांच्या काळात म्हणजेच इसवी सन १९८५ ते २०१० मध्ये आपण प्रथम काँग्रेसचा ऱ्हास व नंतर काँग्रेसचे पुनर्जिवन कसे झाले ते पाहिले. या काळात काँग्रेसने नव्या आर्थिक धोरणाचा पुरस्कार करून विकासाची नवी दिशा दाखवली. या काळामध्ये मंदिर मंडल व मार्केट या तीन घटकांनी भारतीय राजकारण प्रभावित केले. भारतीय जनता पक्ष हा काँग्रेसचा मुख्य विरोधी पक्ष असून काँग्रेस विरोधी पक्षाचे आघाडी बनवण्याची कौशल्य त्यांच्याकडे आहे. काँग्रेसला पुढील काही दशकासाठी आपली कार्यक्रम पत्रिका बनवावी लागेल. त्यात भारतीय लोकशाही प्रक्रिया जास्त जनताभिमुख करणे धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचा पुरस्कार करणे सामाजिक न्यायाचे व समतेचे समानन वितरण करण्याचे कार्यक्रम जारी करणे, देशास आर्थिक विकासाच्या मार्गावर अग्रेसर ठेवणे, देशांतर्गत दहशतवादाच्या आव्हाने मोडून काढणे आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रात जास्त सकारात्मक भूमिका बजावणे इत्यादींचा समावेश करता येईल. गेली २५ वर्ष काँग्रेसची परीक्षा पाहणारी ठरली. पुढील २५ वर्ष ही काँग्रेसच्या विकासाची असतील, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांची असावी.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

**दिर्घोत्तरी प्रश्न –**

१) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या ध्येयधोरणांचा थोडक्यात आढावा घ्या.

२) स्वातंत्र्यपूर्व काळातील राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या निर्मितीचा इतिहास थोडक्यात स्पष्ट करा.

३) स्वातंत्र्योत्तर काँग्रेस पक्षाच्या एकपक्ष प्रबळ (वर्चस्ववादाचा) व्यवस्थेचा आढावा घ्या.

४) सन १९७७ पासून काँग्रेस व्यवस्थेच्या ऱ्हासाची चर्चा करा.

५) काँग्रेस व्यवस्थेच्या बदलत्या स्वरूपाची चर्चा करा. (१९८० ते १९८९).

६) बहुपक्षपद्धतीत बहुपक्ष आघाड्यांचा टप्पा सौदाहरण स्पष्ट करा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) पळशीकर सुहास आणि सुहास कुलकर्णी : 'सत्तासंघर्ष' समकालिन प्रकाशन, पुणे.

२) व्होरा राजेंद्र आणि सुहास पळशीकर : 'महाराष्ट्रातील सत्तांतर', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई (१९९६).

३) भोळे भा. ल. : 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण', पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.

४) पवार प्रकाश : 'भारतातील पक्षव्यवस्थांची उत्क्रांती प्रतिमान आणि ऱ्हास', समाजप्रबोधन पत्रिका (डिसेंबर २०१७).

५) तुंटे विजय आणि संदीप नरेकर : 'भारतीय राज्यवस्था', प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

६) Kothari Rajni : 'The Congress System in India', Delhi.

७) फडके य. दि. : 'पक्षांतराचे राजकारण', अक्षर प्रकाशन, मुंबई.

८) पळशीकर सुहास आणि नितीन बिरमल (संपा.) : 'महाराष्ट्राचे राजकारण राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ', प्रतिमा, पुणे.

९) तळवलकर गोपीनाथ : 'साधना', पद्म प्रकाशन, मुंबई.

१०) भोळे भा. ल., किशोर बेडकिहाळ (संपा.) : 'शतकांतराच्या वळणावर', डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा.


❑❑❑

# घटक २
# बहुपक्षपद्धती
## (Multi Party System)

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

    २.२.१ भारतातील बहुपक्षपद्धतीचा पहिला टप्पा (१९७७ ते १९८०)

    २.२.२ भारतातील बहुपक्षपद्धतीचा दुसरा टप्पा (१९८९ ते आजपर्यंत)

    २.२.३ भारतातील प्रादेशिक पक्ष

    २.२.४ राज्यस्तरीय द्विपक्षीय व्यवस्था (गुजरात व मध्य प्रदेश)

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.५ स्वयंअध्ययन प्रश्न

२.६ अधिक वाचनासाठी पुस्तके


## २.० उद्दिष्ट्ये :

- भारतातील बहुपक्षपद्धतीचा प्रयोग समजावून घेणे.
- भारतातील प्रादेशिक पक्षाचे ध्येयधोरणे अभ्यासणे.
- राज्यपातळीवरील द्विपक्षीय व्यवस्थेचा अभ्यास करणे.

## २.१ प्रस्तावना :

कोणत्याही लोकशाही देशामध्ये राजकीय पक्ष असणे आवश्यक आहे. कारण तेथील राज्यवस्था चालविण्यासाठी एक यंत्रणा हवी असते तेव्हा ही यंत्रणा चालविण्यासाठी संघटना, राजकीय पक्ष असणे आवश्यक आहे. त्यामुळे राजकीय पक्षांची गरज असते. काही देशामध्ये एकपक्ष, काही देशात द्विपक्ष व काही देशात बहुपक्ष पद्धत अस्तित्त्वात आहेत. भारतासारख्या खंडप्राय देशामध्ये बहुपक्षपद्धती असणे साहजिक आहे. कारण भारतामध्ये भाषा, संस्कृती, धर्म, जात, प्रांत इत्यादीमध्ये विविधता आहे. त्यामुळे भारतात बहुपक्ष पद्धतीचा स्वीकार केला गेला आहे, याची सुरुवात स्वातंत्र्य पूर्वकाळात झाली आहे, असे

म्हणता येईल. ब्रिटीश राजवटी विरोधात संघर्ष करण्यासाठी १८८५ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. त्यानंतर १९०६ साली मुस्लीम लीग, १९१६ साली हिंदू महासभा, १९१७ जस्टीस पार्टी, १९२० शिरोमणी अकाली दल, १९२५ साली भारतीय कम्युनिस्ट पक्ष, १९२५ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, १९३६ साली स्वतंत्र मजूर पक्ष, १९४४ द्रविड कळघम इत्यादी अनेक राजकीय पक्ष भारतात निर्माण झाले होते.

स्वतंत्र भारतामध्ये या सर्व घटकांचा परिणाम होऊन बहुपक्षपद्धती निर्माण झाली किंवा अस्तित्वात आली. आजपर्यंत भारतात अनेक राजकीय पक्ष स्थापन झाले आहेत. भारतीय निवडणूक आयोगाच्या दि. २३ सप्टेंबर २०२१ रोजी प्रकाशित केलेल्या नोटीसद्वारे एकूण जवळजवळ ३ हजार पक्ष असून त्यात आठ राष्ट्रीय पक्ष व ५५ प्रादेशिक पक्ष आणि जवळजवळ २७०० राजकीय पक्षानी नोंदणी केली आहे. भारतात बहुपक्षपद्धती स्विकारले असले तरी १९७७ पर्यंत काँग्रेस हा एकमेव प्रभावी व शक्तीशाली पक्ष म्हणून वावरत होता. परंतु १९७७ साली अनेक राजकीय पक्ष एकत्र येऊन काँग्रेसचा पराभव केला. त्यामुळे खऱ्या अर्थाने बहुपक्षपद्धतीचा स्विकार केल्याची जाणीव झाली.

## २.२ विषय विवेचन :

भारतामध्ये अनेक राजकीय पक्ष कार्यरत असून त्यापैकी अनेक पक्षांचा भारतीय राजकारणावर स्पष्टपणे जाणीव होण्याइतका प्रभाव आहे. भारतातील राजकीय पक्ष हे धार्मिक, प्रांतिक, भाषिक, प्रादेशिक, जाती, वंश इत्यादी घटकाच्या आधारावर निर्माण झालेल्या अस्मितेच्या भावनेतून निर्माण झालेले आहेत. बहुपक्षपद्धती असणे म्हणजे अनेक राजकीय पक्षाचे अस्तित्व आणि सत्तेत सहभागी असणे होय. भारतीय समाजात मोठ्या प्रमाणावर विविधता आहे. काही राजकीय पक्ष हे स्थानिक मुद्द्याच्या आधारावर निवडणूक लढवत असतात. तर कधी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रश्नाच्या आधारे निवडणूका लढणारे राष्ट्रीय पक्ष ही कार्यरत आहेत. एकूणच भारतीय राजकारणामध्ये बहुपक्ष पद्धती अस्तित्वात आहे. परंतु स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेल्या आणि स्वातंत्र्य चळवळीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या काँग्रेस पक्षाने स्वातंत्र्यानंतर जवळजवळ ३० ते ४० वर्षे आपले वर्चस्व भारतीय राजकारणावर कायम ठेवले म्हणूनच राजकीय अभ्यासक रजनी कोठारी यांनी याला काँग्रेस वर्चस्वाचा काळ, असे म्हटले आहे. भारतीय राजकारणात इतर राजकीय पक्षाचे अस्तित्व असून ही काँग्रेसचे वर्चस्व राहिले. त्यामुळे खऱ्या अर्थाने बहुपक्षपद्धती विकसित झाली नव्हती. परंतु सन १९७७-८० व सन १९८९ पासून आजपर्यंत अनेक राजकीय पक्ष भारतात निर्माण झाले आहेत.

**भारतात बहुपक्षपद्धत निर्माण होण्याची कारणे –**

**१) स्वातंत्र्यपूर्व वारसा :**

स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच भारतामध्ये अनेक पक्षाची निर्मिती झाली. त्यात प्रामुख्याने काँगेस पक्ष १९८५ साली स्थापन झाला. त्याच्या अंतर्गतच समाजवादी काँग्रेस, शेकाप इत्यादी पक्षाची स्थापना झाली. अकाली दल, मुस्लीम, लीग, हिंदू महासभा, जस्टीस पार्टी, द्रविड कळघम, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन,

स्वतंत्र मजूर पक्ष, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ इत्यादी अनेक पक्ष हे स्वातंत्र्यपूर्व कालखंडात निर्माण झाले होते. त्यामुळे भारतीय राजकारणात बहुपक्षपद्धती स्वातंत्र्यानंतरही कायम राहिली.

**२) फूटीचे राजकारण :**

भारतीय राजकारणात बहुपक्षपद्धती अस्तित्वात येण्यासाठी एक कारण म्हणजे प्रत्येक पक्षात मतभेदामुळे व वैयक्तीक स्वार्थासाठी पक्ष सोडून स्वत:चे पक्ष स्थापन करण्यात आले. त्यात प्रामुख्याने काँग्रेस पक्षात फूट पडून आजपर्यंत अनेक पक्ष निर्माण झाले आहेत. संघटना काँग्रेस, काँग्रेस (I), काँग्रेस (U), काँग्रेस (S), तृणमूल काँग्रेस, केरळा काँग्रेस, स्वतंत्रपक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, YSR काँग्रेस इत्यादी पक्ष काँग्रेसमधून स्थापन झाले तर जनता दल यापक्षातून लोकशक्ती, राष्ट्रीय जनता दल, बिजू जनता दल, समाजवादी जनता दल, संयुक्त जनता दल, जनता दल सेक्युलर, हरियाणा लोकदल, समता पक्ष, किसान मजूर पक्ष इत्यादी पक्षाची निर्मिती झाली. साम्यवादी पक्षाचे विघटन होऊन भारतीय कम्युनिस्ट पक्ष व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष असे पक्ष निर्माण झाले. रिपब्लिकन पक्षाचे अनेक गट निर्माण झाले आहेत. अशाप्रकारे स्वार्थासाठी फूट पाडून अनेक पक्ष निर्माण झाले.

**३) राष्ट्रीय पक्षाचे अपयश :**

भारतीय राजकारणामध्ये राष्ट्रीय महत्त्वाच्या पक्षानी लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी अपयशी ठरले. त्यामुळे प्रत्येक राज्यामध्ये अनेक राजकीय पक्ष निर्माण झाले आहेत, हे जे प्रादेशिक पक्ष आहेत ते स्थानिक पातळीवरील प्रश्नासंबंधी कार्य करतात. लोकांच्या अस्मितेचा प्रश्न असतो त्यांना स्वत:च्या हितासाठी स्वत:चा पक्ष आवश्यक असतो. त्यामुळे त्यांनी प्रादेशिक पक्षाची निर्मिती केले जातात व त्यांना निवडून दिले जाते त्यामुळे राष्ट्रीय पक्षांना प्रादेशिक पक्षांना आपल्या बरोबर समझोता करून घ्यावा लागतो. जेणेकरून त्या राज्यामधील लोकांचे पाठबळ मिळविणे आवश्यक असते. अशा रीतीने भारतीय राजकारणात बहुपक्षीय राजकारण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामध्ये प्रादेशिक पक्षाचे योगदान महत्त्वाचे आहे, असे असताना सुद्धा गुजरात व मध्यप्रदेश काँग्रेस आणि भाजप या दोनच पक्षाचा अस्तित्व जाणवतो या सर्व घटकाचा अभ्यास प्रस्तूत प्रकरणामध्ये सविस्तर करणार आहोत.

### २.२.१ भारतातील बहुपक्षपद्धतीचा पहिला टप्पा (१९७७–१९८०) :

भारत स्वतंत्र झाल्यानंतर १९५२ साली पहिली लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूका झाल्या. यामध्ये काँग्रेसने सर्वात जास्त ३६४ जागा जिंकल्या. या निवडणूकीत १९४ लहान मोठे राजकीय पक्षाचे उमेदवार सहभागी होते. त्यात जनसंघ, शेकाप, मुस्लीम लीग, कम्युनिस्ट पक्ष, किसान मजदूर पक्ष, समाजवादी इत्यादी प्रमुख पक्ष होते. १९५७ च्या निवडणूकीत जनसंघ, प्रजासमाजवादी, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मुस्लीम लिग, रिपब्लीकन पक्ष इत्यादी एकूण ४५ राजकीय पक्षांनी निवडणूकीत सहभाग घेतला होता. या निवडणूकीत केरळ राज्याच्या विधानसभेमध्ये कम्युनिस्ट पक्षाचे बिगर काँग्रेस सरकार अस्तित्वात आले. १९६२ च्या निवडणूकीत त्यावेळी स्वतंत्र पक्षाची भर पडली होती. स्वतंत्र पक्ष काँग्रेसला प्रभावी लढत

देईल, अशी अपेक्षा होती. केवळ १८ जागावर समाधान राहिले. मात्र ओरिसा, बिहार, राजस्थान, गुजरात या राज्यात बराच पाठिंबा मिळवून तिथे प्रमुख विरोधीपक्ष म्हणून स्वतंत्र पक्षानी दर्जा मिळविला. उत्तर प्रदेशमध्ये जनसंघ, तामिळनाडूमध्ये द्रमुख, पंजाबमध्ये अकालीदल तर कम्युनिस्ट पक्षांनी केरळ, पश्चिमबंगाल व आंध्रात यशस्वीरित्या आपले वर्चस्व निर्माण केले. असे अनेक राजकीय पक्ष हे सत्तेच्या राजकारणात आपली प्रगती किंवा प्रभाव निर्माण करीत होते. तरीही केंद्रामध्ये या तीनही निवडणकीत काँग्रेसने आपले वर्चस्व कायम ठेवले होते. १९६२ च्या युद्धातील पराभव, १९६४ साली नेहरूचे निधन आणि १९६५ चे पाकिस्तान बरोबर झालेले युद्ध इत्यादी घटना घडताना काँग्रेसेतर पक्षांनी आपापसात संघटन सुरू केले होते. तरीही १९६७ च्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये काँग्रेसला बहुमत मिळाले. मात्र लोकसभेच्या सदस्य संख्येत घट झाली. केवळ २८३ जागा मिळाल्या आणि कसेबसे सरकार बनविले. या निवडणूकीमध्ये स्वतंत्र पक्ष, द्रमुक मुनेत्र कळघम इत्यादी पक्षाचे प्रतिनिधी निवडून आले आणि राज्याच्या विधानसभेमध्ये आठ राज्यात बिगर काँग्रेसचे सरकार सत्तेवर आले. १९६९ साली काँग्रेस पक्षात फूट पडली व संघटना काँग्रेस हा पक्ष निर्माण झाला. १९७१ च्या लोकसभा निवडणूकीत संघटना काँग्रेसने स्वतंत्र पक्ष, जनसंघ आणि संयुक्त समाजवादी याच्या बरोबर बडी आघाडी स्थापन केली. या आघाडीला विरोध करण्यासाठी काँग्रेसने कम्युनिस्ट, द्रविड मुनेत्र कळघम, मुस्लीम लीग आणि अनेक लहान पक्षाबरोबर निवडणूक पूर्व समझोता केला. श्रीमती इंदिरा गांधींच्या नवकाँग्रेस पक्षाला ३५० जागा मिळाल्या. संघटना काँग्रेसच्या बडी आघाडी यशस्वी होऊ शकली नाही. १९७२ साली झालेल्या १६ राज्याच्या विधानसभा निवडणुकामध्ये केवळ मद्रास या एका राज्यामध्ये बिगर काँग्रेस सत्तेवर आले अन्यथा सर्व राज्यामध्ये काँग्रेस पक्षाची सरकारे अस्तित्वात आली.

**जनता पक्ष व बहुपक्षीय व्यवस्था :**

१९७७ च्या निवडणुकीद्वारे भारतातील केंद्र सरकार हे बिगर काँग्रेस सरकार अस्तित्वात आले. पाच लोकसभेच्या निवडणूकीमध्ये काँग्रेसपक्ष हा निर्विवाद सत्तेवर होता. १२ जून १९७५ रोजी अहालाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधी यांच्यावरील भ्रष्टाचाराच्या आरोपावरून त्यांची १९७१ ची लोकसभा निवडणूक रद्द ठरवून सहा वर्षासाठी कोणतीही निवडणूक लढवण्यास त्यांना अपात्र ठरविले. अलाहाबादच्या निकालावरून विरोधी पक्षांनी इंदिरा गांधींच्या राजीनाम्याची मागणी केली. लोकांच्या आग्रहामुळे व राष्ट्रहिताच्या नावाखाली इंदिरा गांधींनी उच्च न्यायालयाच्या निकालाकडे दुर्लक्ष करून सर्वोच्च न्यायालयात अपील केले. २४ जून १९७५ रोजी न्यायालयाने सशर्त स्थगिती दिली. त्यानुसार त्या पंतप्रधान राहणार होत्या मात्र खासदार म्हणून सर्व हक्क तहकूब करण्यात आले. या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार नैतिकतेच्या आधारावर इंदिरा गांधींनी राजीनामा द्यावा, अशी जोरदार मागणी विरोधी पक्ष एकत्रितरित्या करत होते. त्यामुळे इंदिरा गांधी आपले एकाधिकारशाहीचा वापर करून २५ जून १९७५ रोजीच्या मध्यरात्रीपासून अंतर्गत अशांततेचे कारण दाखवून आणीबाणी घोषीत केली. हा निर्णय घेताना मंत्रीमंडळाचाही सल्ला घेतला नव्हता. २६ जूनची पहाट होण्याआधीच अनेक विरोधी पक्षाच्या नेत्यांना अटक केली. वृत्तपत्रावर बंदी घालण्यात आली. अनेक संघटनांवर बंदी आणली. या काळात संसदेचे अधिवेशन घेतले. या अधिवेशनात अडतीसावी, एकोणचाळीसावी व चाळीसावी घटना दुरुस्त्या करण्यात आल्या. त्यानुसार आणिबाणी पूकारण्याचा निर्णय

न्यायालयीन पुरावलोकनातून काढून घेतला. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान व सभापती यांच्या निवडणूकाविषयचे खटले चालवण्याचा न्यायालयाचा अधिकार रद्द ठरवला. यासर्व गोष्टींचा परिणाम म्हणून सर्वोच्च न्यायालयाने या सुधारित कायद्यानुसार श्रीमती इंदिरा गांधींना सर्व आरोपातून निर्दोष ठरवले.

भारतीय राजकारणातील या घटनेमुळे एक अत्यंत भयंकर परिस्थिती निर्माण झालेली होती. आणीबाणीच्या विरोधात विरोधीपक्ष एकटवले गेले व आणीबाणी शिथील करण्याची मागणी होऊ लागली. तेव्हा जनतेच्या दबावामुळे किंवा पक्षातील स्थान डळमळीत झाल्यामुळे इंदिरा गांधींनी १८ जानेवारी १९७७ रोजी निवडणूका घेण्याची घोषणा केली. आणीबाणी शिथिल केली गेली. तरीपण आणीबाणीतील काही जाचक कायदे तसेच अमलात ठेवले. सेन्सॉरशीप काढून घेतली तरी आक्षेपार्ह मजकुरास बंदी करणारा कायदा तसाच ठेवला. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी जनतेला आणीबाणीच्या रौद्र, भयंकर, क्रूर व पाशवी स्वरूप लोकांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. आणीबाणीचे लाभ म्हणून ज्या गोष्टीचा प्रचार केला जात होता तो किती खोटा आहे व प्रत्यक्ष परिस्थिती किती खालावलेली आहे, हे विरोधी पक्षानी लोकांच्या मनामध्ये रुजवण्याचा प्रयत्न केला.

**विरोधी पक्षामधील एकजूट :**

लोकसभेच्या निवडणूका जाहीर झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी दिल्ली येथे समाजवादी पक्ष, संघटना काँग्रेस, जनसंघ व काँग्रेसमधून बाहेर पडलेले तरुण कार्यकर्ते व नेते यांची बैठक झाली आणि जनता पक्षाची स्थापना करण्यात आली. हे चारही पक्ष हे वेगवेगळे ध्येय-धोरणे स्विकारलेले असले तरी काँग्रेस पक्षाच्या विरोधात आणीबाणीतील अन्याय, अत्याचाराचा विरोध करण्यासाठी एकत्र येण्याचा निर्णय घेतला. त्या चारही पक्षाची पार्श्वभूमी समजावून घेणे आवश्यक आहे.

**१) संघटना काँग्रेस :**

१९६९ साली राष्ट्रपतीपदाच्या निवडणूकीत उमेदवार ठरविण्याच्या मुद्द्याच्या आधारावर इंदिरा गांधी व इतर काँग्रेस नेत्यामध्ये मतभेद झाले व निजजिंगप्पा, कामराज, स. का. पाटील, मोरारजी देसाई इत्यादी नेत्यांनी काँग्रेसमधून बाहेर पडले व संघटना काँग्रेसची स्थापना करण्यात आली व इंदिरा गांधीच्या काँग्रेसला नवकाँग्रेस पक्ष म्हणून ओळखले जाऊ लागले. १९७१ च्या निवडणूकीत संघटना काँग्रेसला केवळ १६ जागा मिळाल्या. या पक्षांनी एकाधिकारशाहीचा विरोध करून लोकशाही यशस्वी करणे, जनतेचे जिवनमान उंचाविणे, न्यायमंडळाचे स्वातंत्र्य सुरक्षित ठेवणे, नागरिकांना रोजगार मिळवून देणे इत्यादी अनेक ध्येय-धोरणे घोषित केले.

**२) भारतीय जनसंघ :**

१९५१ साली डॉ. शामाप्रसाद मुखर्जी यांनी भारतीय जनसंघाची स्थापना केली. याला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहकार्य होते. या जनसंघाला अटलबिहारी वाजपेयी, एल. के. अडवाणी, नानाजी देशमुख इत्यादी नेत्यांचे नेतृत्त्व लाभले. या पक्षांनी देश एक, राष्ट्र एक, संस्कृती एक यावर विश्वास ठेवून भारताचे अखंडत्व

व ऐक्य टिकवणे, आर्थिक राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण करणे, खासगी उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देणे, राष्ट्रभाषा हिंदी भाषेला मान्यता देणे इत्यादी अनेक ध्येयधोरणे ठरविले होते.

**३) समाजवादी पक्ष :**

१९३४ साली काँग्रेस पक्षांतर्गत समाजवादी पक्षाची स्थापना केली. १९४८ साली समाजवादी विचारसरणीचा गट काँग्रेस पक्षातून बाहेर पडला. त्यात जयप्रकाश नारायण, आचार्य नरेंद्र देव, अच्युतराव पटवर्धन, अशोक मेहता, मिनू मसानी, युसूफ मेहरअली, ना. ग. गोरे, एस. एम. जोशी इत्यादी नेते समाजवादी पक्षाचे होते. १९५२ साली समाजवादी पक्ष व कृपलानी यांचा किसान मजदूर प्रजा पक्ष एकत्र येऊन प्रजासमाजवादी पक्ष स्थापन झाला. पुढे लोहिया यांनी भारतीय समाजवादी पक्ष स्थापन केला. पुढे १९७७ साली या समाजवादी पक्षानी जनता पक्षात समावेश झाले. देशात समाजवादी अर्थव्यवस्था प्रस्थापित करणे, जमीन सुधारणाविषयक कायद्यात सुधारणा करणे, भूमिहीनांना जमीन मिळवून देणे, मोठ्या उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण करणे इत्यादी अनेक ध्येयधोरणे होते.

**४) भारतीय लोकदल :**

१९७४ साली चौधरी चरणसिंग यांच्या नेतृत्त्वाखाली भारतीय लोकदल या पक्षाची स्थापना झाली. भारतीय लोकदल हा पक्ष भारतीय क्रांतिदल, उत्कल काँग्रेस व स्वतंत्र पक्ष एकत्र येऊन स्थापन झालेला पक्ष होता. या पक्षाने गांधीवादाचा मार्ग स्विकारला होता. भांडवलशाहीला विरोध करणे, ग्रामोद्योगाला प्रोत्साहन देणे, संपत्तीच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करणे, शेती विकासास चालना देणे, न्यायालयाचा दर्जा वाढविणे अशी ध्येयधोरणे भारतीय लोकदलाने स्विकारली होती. १९७७ साली निर्माण झालेल्या जनता पक्षात लोकदल पक्ष सामील झाला होता.

अशा या चारही एकत्र पक्षांनी येऊन जनता पक्षाची निर्मिती करण्यात आली आणि १९७७ च्या लोकसभा निवडणूकीमध्ये एकत्रित लढण्याचा निर्णय घेतला.

**जनता पक्षाचा निवडणूकीतील लढा :**

१९७१ ते १९७६ या काळात इंदिरा गांधींनी सत्तेचा दुरुपयोग केला. त्यांनी एकाधिकारशाही निर्माण करून विरोधी पक्षाच्या नेत्यांचे खच्चीकरण करण्यात आले. त्यामुळे या जुलमी वृत्तीने राज्यकारभार करणाऱ्या इंदिरा गांधींच्या विरोधात सर्व विरोधी पक्ष एकत्रीत येऊन विरोध करण्याचा निर्णय घेतला. जयप्रकाश नारायण यांच्या एकमुखी नेतृत्त्वाखाली काँग्रेसच्या विरोधात सर्व भारतभर लढा सुरू झाला. पुढे २३ जानेवारी १९७७ रोजी जनता पक्ष स्थापन झाला. १९७७ च्या निवडणूकीमध्ये वैध ठरलेल्या एकूण मतापैकी ३४.५ टक्के मत काँग्रेसला मिळाली. तर विरोधी पक्षाच्या वाट्याला ६५.५ टक्के मते आली. जनता व त्याचे मित्रपक्ष यांना मताच्या दृष्टीने सुद्धा निर्विवाद बहुमत मिळाले. जनता व लोकशाही पक्ष – २९९, काँग्रेसला १५३ जागा मिळाल्या आणि जनता पक्ष सत्तेवर आले. काँग्रेस पक्षाला आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ व तामिळनाडू या मोठ्या व मणिपूर, जम्मू काश्मीर व सिक्कीम या छोट्या राज्यात काँग्रेसला उत्तम यश मिळाले. तरीसुद्धा

महाराष्ट्र, अरुणाचल प्रदेश, त्रिपुरा, मेघालय व मिझोराम या राज्यात जनता पक्षाचा प्रभाव दिसून आला. हिमाचल प्रदेश, पंजाब, चंदीगढ, राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश व ओरिसा या राज्यात काँग्रेसचा अभूतपूर्व पराभव झाला. ३० वर्षाचे काँग्रेसचे वर्चस्व संपुष्टात आले.

जनता पक्ष सत्तेवर आल्यानंतर राज्याच्या विधानसभा विसर्जीत करण्याचा निर्णय घेतला. कारण जनता पक्षाच्या मते, ज्या राज्यातील जनतेने लोकसभेच्या निवडणूकीत काँग्रेसच्या विरुद्ध कौल दिला. तेथील सरकारला सत्तेवर राहण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही, तशी नऊ राज्ये निवडली गेली. त्यात बिहार, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश, ओरिसा, उत्तर प्रदेश, पं. बंगाल, पंजाब, हरियाणा, राजस्थान इत्यादी राज्याचा समावेश होता. त्याचबरोबर गोवा, पाँडिचेरी व दिल्ली आणि तामिळनाडू या राज्यामध्ये ही विधानसभा निवडणूक घ्यायच्या होत्याच. अशाप्रकारे दहा राज्ये व तीन केंद्रशासित प्रदेशातील निवडणूक जून १९७७ मध्ये घेण्यात आली. यापैकी पंजाब, पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू या राज्यामध्ये अनुक्रमे अकाली दल, कम्युनिस्ट पक्ष आणि अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम पक्ष सत्तेवर आले. पाँडिचेरी व गोवामध्ये प्रादेशिक पक्ष सत्तेवर आले आणि उरलेल्या राज्यामध्ये जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले. जानेवारी १९७८ साली त्रिपुरा विधानसभेमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला ४९ जागा मिळून तो पक्ष सत्तेवर आला. जनता पक्षाचे सरकार अवघ्या दोनच वर्षामध्ये संपुष्टात येण्यास सुरुवात झाली. जनता पक्षाचे सरकार पडण्याची कारणे खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) मोरारजी देसाई यांचे सरकार अंतर्गत कलहामुळे १५ जुलै १९७९ रोजी बरखास्त झाले. चरणसिंग बरोबर झालेला देसाईंचा वाद, जनसंघाची भूमिका या कारणामुळे बहुमत कमी झाले. त्यामुळे देसाई यांनी राष्ट्रपतींना दोन पत्रे लिहिली. एक म्हणजे राजीनाम्याचा व दुसरा पुन्हा सरकार स्थापन करण्यासंदर्भात होती. परंतु राष्ट्रपती रेड्डी यांनी विरोधी पक्ष नेते यशवंतराव चव्हाण यांना सरकार स्थापण्यास निमंत्रण दिले. परंतु ते शक्य झाले नाही. त्यामुळे चरणसिंग यांना सरकार स्थापण्यास निमंत्रण दिले चरणसिंग यांनी काँग्रेस (आय) च्या पाठिंब्यावर सरकार स्थापन केले. २८ जुलै १९७९ रोजी सरकार अस्तित्वात आले.

२) इंदिरा गांधी यांनी २० ऑगस्ट १९७९ रोजी पाठिंबा काढून घेतल्यामुळे चरणसिंग यांना पंतप्रधान पदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यांनी लोकसभा बरखास्त करण्याची शिफारस राष्ट्रपतीकडे केली होती.

३) जगजीवन राम जनता पक्षाचे नेते सरकार स्थापण्यासाठी विनंती केली होती. परंतु ते राष्ट्रपतींनी नकार देऊन लोकसभा बरखास्त केली व चरणसिंग यांना काळजीवाहू पंतप्रधान म्हणून काम पाहण्यास सांगितले.

अशाप्रकारे जनता पक्षाचे सरकार कोसळले. पुन्हा १९८० साली लोकसभेच्या निवडणूका झाल्या त्यामध्ये इंदिरा गांधी या पुन्हा सत्तेवर आल्या. त्यानंतर १९८४ साली झालेल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीत राजीव गांधी पूर्ण बहुमताने सत्तेवर आले. परंतु १९८९ पासून आजपर्यंत कोणत्याही पक्षाला पूर्ण बहुमत मिळाले नव्हते. २०१९ साली भाजप पक्षाला बहुमत मिळाले आहे. त्यामुळे बहुपक्षपद्धती जरी भारतात असली तरी जवळजवळ १९७७ ते १९८० हा तीन वर्षाचा काळ सोडला तर १९५२ ते १९८९ पर्यंत

काँग्रेस हा पूर्णहाती सत्तेत होता. त्यानंतर मात्र प्रादेशिक पक्षांचे महत्त्व वाढले. कोणत्या पक्षाचे स्वतंत्र सरकार स्थापन करण्याइतके संख्याबळ होत नव्हते. त्यामुळे अनेक पक्षांनी निवडणूक पूर्व व निवडणूकीनंतर आघाडी करून अनेक पक्ष सत्तेत सामील होण्याचा प्रयोग केला आहे आणि भारतीय बहुपक्षपद्धती टिकून आहे

## २.२.२ भारतातील बहुपक्षपद्धतीचा दुसरा टप्पा (१९८९ ते आजपर्यंत) :

१९७७ साली जनता पक्षात फूट पडली. १९८० च्या निवडणूकीमध्ये काँग्रेस पक्षाने ३५१ जागा जिंकून निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले. त्यामुळे जनसंघ, जनता पक्षातून बाहेर पडून भारतीय जनता पक्षाच्या नावाने आपला वेगळा पक्ष स्थापन केला. श्रीमती इंदिरा गांधी यांची १९८४ च्या ऑक्टोबर महिन्यात हत्या झाली आणि राजीव गांधी पंतप्रधान झाले. या निवडणुकीमध्ये ४०३ जागा जिंकून नेत्रदीपक यश प्राप्त केले. १९८९ च्या नोव्हेंबर महिन्यात नवव्या लोकसभेसाठी निवडणूका झाल्या. त्यापूर्वी १९८८ साली जनता पक्ष, जनता मोर्चा आणि लोकदल यांनी जनता दल स्थापन केले होते. तेव्हा जनतादल, काँग्रेस (एस), तेलगू देसम, आसाम गण परिषद इ. पक्षांनी मिळून ही निवडणूक लढविण्यात आली होती. या निवडणूकीमध्ये राजकीय पक्षाचा कोणताच महत्त्वाचा प्रश्न किंवा घोषणा प्रचारात नव्हती. निवडणूका झाल्या त्यामध्ये काँग्रेसला १९७ जागा मिळाल्या, जनता दलाला १४१, भारतीय जनता पक्षाला प्रथमच ८८ जागा मिळाल्या व कम्युनिस्ट पक्षाला ३२ जागा मिळाल्या. काँग्रेस पक्षाने बहुमत न मिळाल्यामुळे सरकार स्थापन न करण्याचा निर्णय घेतला. विश्वनाथ प्रतापसिंग यांच्या जनमोर्चा आघाडीने अल्पमतातील सरकार स्थापन केले. जनता पक्ष व डाव्या पक्षांनी या सरकारला बाहेरून पाठिंबा देण्याची भूमिका घेतली. हे सरकार वर्षाच्या आतच कोसळले. कारण ज्यावेळी व्ही. पी. सिंग यांनी मंडल आयोगाची घोषणा केली तेव्हा या राष्ट्रीय आघाडी जनमोर्चामध्ये सामील झालेले लालू प्रसाद यादव, चंद्रशेखर, देवीलाल इत्यादी नेत्यांमध्ये एकवाक्यता राहिली नाही. भाजप पक्षाने आपला पाठिंबा काढून घेतला. त्यामुळे सरकार बरखास्त झाले. पुढे अल्पावधीतच काँग्रेसच्या मदतीने चंद्रशेखर यांनी सरकार स्थापन केले. सहा महिन्यातच काँग्रेसने पाठिंबा काढून घेतला. चंद्रशेखर यांचे सरकार कोसळले. चंद्रशेखर यांनी लोकसभा बरखास्त करण्याचा सल्ला दिला. त्यानुसार राष्ट्रपतींनी लोकसभा विसर्जीत केली. दहाव्या लोकसभेच्या निवडणूका घोषित करण्यात आल्या. त्यानंतर २१ मे १९९१ रोजी राजीव गांधी यांची हत्या झाली. त्यामुळे निवडणूका या काही दिवस पुढे ढकलण्यात आल्या. १५ जून १९९१ रोजी निवडणूका पूर्ण करण्यात आल्या.

१९९१ साली दहाव्या लोकसभेच्या निवडणूका झाल्या. या निवडणुकीमध्ये लहानमोठे पक्ष मिळून जवळ जवळ ५०-५५ पक्ष निवडणूक रिंगणात होते. त्यात केवळ २९ पक्षाचे प्रतिनिधी निवडून आले. त्यामध्ये २२६ जागा काँग्रेस पक्षाला मिळाल्या. पी. व्ही. नरसिंहराव यांनी सरकार स्थापन केले. त्यावेळी ११८ जागा मिळवून भारतीय जनता पक्ष प्रमुख विरोधी पक्ष बनला. जनता दल ६०, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष ३५, भारतीय कम्युनिस्ट ३५ याच्या मदतीने पाच वर्षाचा आपला कार्यकाल पूर्ण केला. १९९६ च्या लोकसभा निवडणूकीत ३२ पक्षाचे प्रतिनिधी निवडून आले. काँग्रेस १४०, भाजप १६१, जनता दल ४६, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष ३२, भारतीय कम्युनिस्ट पक्ष १२, शिवसेना १५, तेलगू देसम १६ इत्यादी जागा मिळाल्या. कोणत्याही पक्षाला बहुमत मिळाले नाही. १६ मे १९९६ रोजी भाजपाने सरकार स्थापन केले.

बहुमत सिद्ध करण्यास अटलबिहारी वाजपेयी यांनी दोन आठवड्याची मुदत मागितली. परंतु बहुमत सिद्ध न करता आल्यामुळे केवळ १३ दिवसाचे सरकार राहिले. पुढे १ जून १९९६ रोजी एच. डी. देवेगौडा यांनी सरकार स्थापन केले. अवघ्या वर्षातच त्याचे सरकार पडले. इंद्रकुमार गुजराल यांनी सरकार स्थापन केले. तेही सरकार वर्षभरात कोसळले. ही दोन्ही सरकारे अल्पजिवी ठरतो. भारतीय जनता पक्ष, काँग्रेस व संयुक्त आघाडी या तीनही पक्षाला सरकार स्थापन करता आले नाही त्यामुळे ४ डिसेंबर १९९७ रोजी लोकसभा विसर्जित करण्यात आली.

१९९८ साली बाराव्या लोकसभेच्या निवडणूका झाल्या. या निवडणूकीत ही कोणत्याच पक्षाला बहुमत प्राप्त झाले नाही. यामध्ये भाजप आणि मित्रपक्षाच्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीला २५३ जागा मिळाल्या तर काँग्रेस व मित्रपक्षाना मिळवून १६७ जागा मिळाल्या. एकट्या काँग्रेसला १४१ जागा मिळाल्या. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला ३२, समाजवादी पक्ष २०, राष्ट्रीय जनता दल १७, अण्णा द्रविड मुनेत्र कळघम १८, तेलगू देसम १२ जागा भारतीय कम्युनिस्ट पक्ष ९ असे एकूण ४२ राजकीय पक्षाना प्रतिनिधीत्व मिळाले होते. भारतीय जनता पक्षाने तिसऱ्या आघाडीतील तेलगू देसमसह लहान मोठ्या एकूण तेरा पक्षांनी मिळून सरकार स्थापन केले. अण्णा द्रविड मुनेत्र कळघम यांनी काही मागण्या मांडल्या. त्या मागण्या मान्य करण्यास सरकारने नकार दिल्याने पाठिंबा काढून घेतले व अटलबिहारी वाजपेयी सरकार अल्पमतात आले आणि विश्वासदर्शके ठरावामध्ये २६९ अनुकूल व २७० प्रतिकूल असे. मतदान होऊन वाजपेयी सरकार कोसळले. कोणताही पक्ष सरकार स्थापन करू शकले नाही. त्यामुळे राष्ट्रपती के. आर. नारायण यांनी बारावी लोकसभा विसर्जित केली.

१९९९ साली लोकसभेच्या निवडणूका घेण्यात आल्या या निवडणूकीमध्ये भाजपाला १८९ जागा, काँग्रेस पक्षास ११८, मार्क्सवादी पक्ष ३५, तेलगू देसम ३०, समाजवादी पक्ष २९, संयुक्त जनता दल, बहुजन समाजपार्टी १५ व राष्ट्रीय जनता दल ७ जागा मिळाल्या. अटलबिहारी वाजपेयी यांचे तेवीस राजकीय पक्ष मिळून आघाडी सरकार सत्तेवर आले. २००४ साली झालेल्या लोकसभेच्या निवडणूकीत ३८ राजकीय पक्षांना प्रतिनिधीत्व मिळाले. काँग्रेस पक्षाला सर्वाधिक १५९ व भाजप १४४, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष ४४, समाजवादी पक्ष ४०, बसपा २४, द्रविड मुनेत्र कळघम १६ इत्यादी राजकीय पक्षांना जागा मिळाल्या. काँग्रेसपक्षाने संयुक्त पुरोगामी आघाडी स्थापन करून सरकार स्थापन केले. २००९ साली काँग्रेस २११, भाजप १९९, समाजवादी पक्ष २३, तृणमूल काँग्रेस २१, संयुक्त जनता दल २०, द्रविड मुनेत्र कळघम १८, जागा मिळाल्या. एकूण ३९ पक्षांना प्रतिनिधीत्व मिळाले. २०१४ साली मात्र भारतीय जनता पक्षाने २८९ जागा जिंकल्या. तृणमूल काँग्रेस ३८, अण्णा द्रमुक ३७, शिवसेना १८, काँग्रेस ५० जागा मिळाल्या. भारतीय जनता पक्षाने आपले सरकार स्थापन केले. २०१९ साली भारतीय जनता पक्षाने ३०१ जागा जिंकल्या आणि द्रमुक २४, वायएसआर काँग्रेस २२, काँग्रेस ५३, तृणमूल काँग्रेस २३, जागा जिंकल्याण एकूण ३६ पक्षांना प्रतिनिधीत्व मिळाले. अशाप्रकारे १९८९ ते २०१९ सर्व निवडणूकीमध्ये २०१९ ची निवडणूक वगळता सर्व निवडणूकीत कोणत्याही पक्षाला पूर्ण बहुमत मिळाले नाही. ज्यामुळे सर्व राजकीय पक्षाला एकत्रीत घेऊन आघाडीद्वारे सरकार स्थापन करण्यात आले आणि बहुपक्ष पद्धतीला चालना मोठ्या प्रमाणात मिळाले.

**बहुपक्षपद्धतीची वैशिष्ट्ये (१९८९ ते आजपर्यंत) :**

१) भारतीय राजकारणामध्ये कोणत्याही पक्षाला निर्विवाद बहुमत प्राप्त करता आला नाही. अपवाद २०१९ ची निवडणूकीमध्ये भाजपाने ३०३ जागा जिंकल्या. परंतु त्यांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीमधील सर्व पक्षांना सत्तेमध्ये सामावून घेतले आहे.

२) जनता दलाच्या सर्वपक्षीय एकत्र येण्याच्या दृष्टिकोनातून राज्यस्तरावरील राजकीय शक्तीचा प्रभाव वाढला व छोटे छोटे पक्ष स्थापन होऊन पुन्हा एकत्र येण्याचा प्रयोग वारंवार करण्यात आला.

३) १९८९ नंतरच्या भारतीय राजकारणात रजनी कोठारींनी सांगितलेल्या काँग्रेस वर्चस्वाचा काळ बदलून योगेंद्र यादव यांनी सांगितलेल्या काँग्रेसतेर राज्यव्यवस्था अस्तित्वात आली कारण एक प्रबळ पक्ष पद्धत बदलून बहुपक्ष पद्धत खऱ्या अर्थाने निर्माण झाली.

४) भारतीय राजकारणामध्ये पक्षाची भूमिका ही दोन आघाडीमध्ये रूपांतरित होऊन समान कार्यक्रमाच्या आधारावर निवडणूकपूर्व व निवडणूकीनंतर युती करण्याचा निर्णय पक्षांनी घेतला व यातून भाजपाचा राष्ट्रीय लोकशाही आघाडी व काँग्रेसचा संयुक्त पुरोगामी आघाडी अशा आघाड्या तयार झाल्या.

५) भारतीय राजकारणामध्ये राष्ट्रीय पक्षांना सोडून जात, धर्म, प्रांत, विकास, संस्कृती इत्यादीच्या मुद्द्याच्या आधारे अनेक प्रादेशिक पक्ष स्थापन करण्यात आले, तसेच ते सत्तेमध्ये सामीलही झाले. एकूणच प्रादेशिक पक्षाचे महत्त्व वाढले व राष्ट्रीय पक्षाची प्रतिमा / प्रभाव कमी झाल्याचे दिसते.

६) काँग्रेस व भाजप यांच्या खेरीज तिसरी आघाडी अद्याप उभी राहिली नाही. परंतु तृणमूल काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, तेलगू देसम, द्रमुक, अण्णा द्रमुख, वाएसआर काँग्रेस, बिजू जनता दल, शिवसेना, जनता दल (एस), राष्ट्रीय जनता दल इत्यादी पक्षांनी तिसरी आघाडी निर्माण होऊ शकते. त्या पद्धतीने प्रयत्नही चालू आहेत. ते किती यशस्वी होतील, हे येणारा काळच ठरवू शकेल.

७) भारतामध्ये जरी १९८९ सालापासून बहुपक्ष पद्धतीचा विस्तार झाला असला तरी २०१९ च्या निवडणुकीमध्ये मात्र भाजप हा एकाहाती सत्ता प्रस्थापित केली आहे. त्याचा १९८० पासून इतिहास पाहिला तर चढता आलेख दिसून येतो. तसे असले तरीही सत्तेत अनेक पक्ष समाविष्ट करून घेतले आहे.

अशा प्रकारे १९८९ नंतरच्या राजकारणात बहुपक्षपद्धतीचा विस्तार झाला आहे.

### २.२.३ भारतातील प्रादेशिक पक्ष :

भारतामध्ये निवडणूक आयोगांनी २३ सप्टेंबर २०२१ रोजीच्या नोटीसीनुसार भारतातील २७ राज्यातील एकूण ५४ प्रादेशिक पक्षाची यादी जाहीर केली आहे. या प्रादेशिक पक्षांना प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता मिळविण्यासाठी काही अटी आहेत ते खालीलप्रमाणे –

१) जो पक्ष राज्याच्या विधानसभेच्या निवडणूकीमध्ये कमीत कमी ६ टक्के मते मिळवतो आणि २ सदस्य निवडून येतात अशा पक्षांना प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता मिळते.

२) राज्याच्या विधानसभेमध्ये किमान ३ सदस्य निवडून यावेत किंवा विधीमंडळाच्या सदस्यापैकी ३% सदस्य निवडून आले पाहिजेत यापैकी कोणते जास्त असेल ते मान्य करता येईल.

वरील अटीपूर्व करणाऱ्या राजकीय पक्षांना प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता मिळते.

**प्रादेशिक पक्षाच्या उदयाची कारणे :**

१) राष्ट्रीय पातळीवरील पक्षांना पर्याय देण्यासाठी अनेक राज्यामध्ये प्रादेशिक पक्षाची स्थापना करण्यात आली. जेणेकरून स्थानिक पातळीवरील प्रश्न दूर करता येईल.

२) काँग्रेसचे वर्चस्व हे आणीबाणी, भ्रष्टाचार, हुकूमशाही वृत्ती, प्रादेशिक प्रश्नाकडे केलेला दुर्लक्ष व अंतर्गत गटबाजीमुळे नाराज नेत्यांनी बाहेर पडून अनेक प्रादेशिक पक्षाची स्थापना केली.

३) प्रदेशानुसार लोकांच्या प्रश्नाचे स्वरूप बदलते. या सर्व प्रश्नांना राष्ट्रीय पक्षांना सोडवणे शक्य झाले नाही. त्यामुळे प्रादेशिक अस्मिता वाढली आणि त्यामुळे प्रादेशिक पक्षाची निर्मिती झाली.

४) भाषा, जात, धर्म, संस्कृती याच्यात विविधता असल्यामुळे त्याचे रूपांतर राजकीय पक्षात झाले. भाषिक, सांस्कृतिक, जातीच्या संरक्षणासाठी ते कटिबद्ध राहतात.

५) प्रादेशिक अस्मिता, प्रादेशिक असमतोल, अन्यायाची भावना, नेत्याची सत्तेसाठी केलेली आटापिटा यातून प्रादेशिक पक्षाची स्थापना करण्यात आले.

वरील सर्व कारणावरून प्रादेशिक पक्षाची निर्मिती करण्यात आली. आज त्याची संख्या वाढते आहे. त्यामुळे आपण प्रमुख प्रादेशिक पक्षाची सविस्तर चर्चा घेणार आहोत.

**१) अकाली दल :**

१४ डिसेंबर १९२० रोजी अकाली दल पक्षाची स्थापना केली. अकाली दलाचे प्रथम अध्यक्ष मास्टर तारासिंग होते. हा पक्ष शिखाचे मुख्य प्रतिनिधी म्हणून कार्य करते. शीख धर्माचे संरक्षण व पंजाबची निर्मिती करणे, हा मुख्य उद्देश होता. १९५६ साली पंजाब व हरियाणा मिळून एकच पंजाब राज्य निर्माण झाला. तेव्हा पंजाबी भाषिकांसाठी स्वतंत्र पंजाबी राज्याची मागणी आणि गुरुमुखी लिपीतील पंजाबी भाषा राज्यभाषा व्हावी, या मागण्या केल्या. त्यासाठी आंदोलन केले. उपोषण केले. या सगळ्यांचा परिणाम म्हणून १९६६ साली पंजाब हे स्वतंत्र राज्य झाले. अकाली दल हे प्रभावी प्रादेशिक पक्ष असून पंजाबमध्ये २३ वर्षे सत्तेवर होता. सध्या सुखबीरसिंग बादल हे पक्षाचे अध्यक्ष आहेत.

**२) नॅशनल कॉन्फरन्स :**

भारतातील सर्वात जुन्या प्रादेशिक पक्षापैकी एक नॅशनल कॉन्फरन्स (ऑल जम्मू काश्मीर मुस्लीम) हा पक्ष १९३२ रोजी स्थापन करण्यात आले. स्वातंत्र्यानंतर सत्तेच्या राजकारणात प्रवेश करून जम्मू काश्मीरमध्ये मोठा प्रादेशिक पक्ष म्हणून उदयास आला. १९६० च्या दशकात काँग्रेसमध्ये विलीन झालेला पक्ष, १९७५ साली काँग्रेसमधून बाहेर पडला व १९७७ च्या निवडणुकीत प्रथमच राज्यात सत्तेवर आला आणि शेख अब्दुल्ला मुख्यमंत्री झाले. त्यानंतर हा पक्ष १९८१, २००२, २००९ ते २०१५ पर्यंत जम्मू व काश्मीरच्या

सत्तेत राहिला आहे. सध्या यापक्षाचे अध्यक्ष फारुख अब्दुल्ला आहेत. या पक्षाची काश्मीरच्या विशेष दर्जा कायम राहण्यासाठी प्रयत्न करीत होता. परंतु २०१४ साली झालेल्या निवडणूकीत पिपल्स डेमॉक्रेटिक पार्टी भाजपच्या जोरावर सत्तेत राहिले.

**३) द्रविड मुनेत्र कळघम :**

स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये तामिळनाडूतील ब्राह्मणेत्तर लोकांनी जस्टीस पार्टी स्थापन केली. पुढे पेरियार यांनी द्रविड कळघम या पक्षाची स्थापना केली. परंतु रामस्वामी नायकर पेरियार यांचे अनुयायी श्री. अण्णादुराई यांनी १९४९ साली द्रविडमुन्नेत्र कळघम या पक्षाची स्थापना केली. द्रविड जनतेच्या उन्नतीसाठी स्थापन केलेला महासंघ असा द्रमुकचा अर्थ आहे. या पक्षांनी राज्यघटनेला विरोध, हिंदी राष्ट्रभाषेला विरोध, समाजवादी व्यवस्था, सामाजिक शोषण, अन्याय इत्यादी विरोधात कार्य केले व स्वत: द्रविडनाडू स्वतंत्र राष्ट्राची मागणी केली. परंतु कालांतराने हिंदी भाषा लादणार नाही या अटीवर ते निवडणूकीत सहभागी झाले. त्याचे नेतृत्व करुणानिधी याच्याकडे होते. आज त्याचे नेतृत्व स्टॅलिन यांच्याकडे आहे. हा पक्ष पाँडेचरी व तामिळनाडू या दोन्ही ठिकाणी कार्यरत होते. सध्या याच पक्षाचे सरकार तामिळनाडूमध्ये आहे. यापूर्वी ही अनेक वर्षे या पक्षाची सत्ता तामिळनाडू व पाँडेचेरीमध्ये होती. एकूणच तामिळ लोकांच्या अस्मितेसाठी आणि त्यांचा विकासासाठी हा पक्ष कार्यरत आहे.

**४) अण्णा द्रमुक, तामिळनाडू :**

१९७१ साली मुख्यमंत्री करुणानिधी व एम. जी. रामचंद्रन यांच्यात मतभेद होऊन द्रमुक पक्षामध्ये फूट पडली व १७ ऑक्टोबर १९७२ रोजी रामचंद्रन यांनी अण्णा द्रमुक या पक्षाची स्थापना केली. १९७७ च्या निवडणूकीत अण्णा द्रमुक पक्षाला जास्त जागा मिळाले. एम. जी. रामचंद्रन हे मुख्यमंत्री झाले. तब्बल सलग १३ वर्षे म्हणजे मरेपर्यंत मुख्यमंत्री झाले. पुढे १९९१ साली जयललिता या अण्णा द्रमुकचे सर्व गट एकत्रित करून तामिळनाडूच्या मुख्यमंत्री झाल्या. सध्या पक्षाचे समन्वयक म्हणून ओ. पनीरसेल्वम आहेत. सहसमन्वयक म्हणून इडपडी पलानीस्वामी आहे. सध्या या पक्षाचे तामिळनाडू विधानसभेमध्ये ६६ सदस्य आहेत.

**५) शिवसेना :**

भाषिक आधारावर राज्यपुर्नचना झाल्यावर मराठी भाषिकांना स्वतंत्र राज्य मिळाला नाही. संयुक्त महाराष्ट्र चळवळीनंतर शेवटी १९६० साली महाराष्ट्राची निर्मिती झाली. परंतु बेळगाव, कारवार, निपाणी हे मराठी भाषिक प्रदेश कर्नाटकात घालण्यात आले. मुंबईमध्ये मराठी माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी १९ जून १९६६ रोजी बाळासाहेब ठाकरे यांनी मुंबई येथे शिवसेनेची स्थापना केली. भाजपबरोबर युती करताना हिंदुत्वाचा मुद्दा महत्त्वाचा ठरला. १९९५ साली शिवसेना-भाजप महाराष्ट्रात सत्तेवर आली. त्यानंतर २०१४ साली भाजपबरोबर युती करून पुन्हा शिवसेना सत्तेत राहिली. सध्या काँग्रेस व राष्ट्रवादी बरोबर युती करून पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. तरीही ते हिंदुत्ववादी विचार जोपासले आहेत.

### ६) तेलगू देसम पक्ष :

२९ मार्च १९८२ रोजी आंध्र प्रदेशमध्ये प्रसिद्ध अभिनेते श्री. एन. टी. रामाराव यांनी तेलगू देसम या पक्षाची स्थापना केली. आंध्रमध्ये काँग्रेस राजवटीत वाढलेला भ्रष्टाचार, लाचलुचपत यांचे निर्मूलन करण्यासाठी हा पक्ष स्थापन करण्यात आला. या पक्षास १९८३ च्या निवडणूकीत २९४ पैकी २०१ जागा मिळून एन. टी. रामाराव मुख्यमंत्री झाले. सध्या या पक्षाचे नेतृत्व चंद्राबाबू नायडू यांच्याकडे आहे. एन. टी. रामाराव हे तीनवेळा मुख्यमंत्री झाले. चंद्राबाबू नायडू हे १९९५ ते २०१९ पर्यंत मुख्यमंत्री होते. परंतु तेलंगणा विभागणी झाल्यामुळे त्यांना अपयश आले आहे. त्यांनी लोकसभेमध्ये ही त्याची कामगिरी राहिली आहे. तेलगू देसम पक्षाचे बालयोगी हे लोकसभेचे सभापती म्हणून कार्य पाहिले आहे.

### ७) युवाजना श्रमीक रयतू काँग्रेस पक्ष :

सध्या हा आंध्र प्रदेशातील महत्त्वाचा प्रादेशिक पक्ष बनला आहे. वायएसआर रेड्डी यांच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा जगमोहन रेड्डी हे १२ मार्च २०११ रोजी, युवाजना श्रमीक रयतू काँग्रेस पक्षाची स्थापना केली. २०१२ साली कोवूर पोटनिवडणूकीत विजय मिळविला. २०१४ साली झालेल्या विधानसभेत त्यांना केवळ ७० जागा मिळाल्या व विरोधी पक्ष म्हणून उदयास आले आणि आता २०१९ च्या विधानसभा निवडणूकीत १७५ पैकी १५१ जागा मिळवून जगमोहन रेड्डी हे मुख्यमंत्री झाले आहेत. हा पक्ष तेलगंणा व आंध्र प्रदेश या दोन्ही राज्यात असून ते तेलंगणामध्ये निवडणूक लढविले नाही. २०१४ च्या लोकसभेमध्ये ३८ पैकी ९ जागा मिळाल्या होत्या. आता २०१९ च्या लोकसभेमध्ये २५ पैकी २२ जागा वायएसआर काँग्रेस पक्षाला मिळाले आहेत.

### ८) तेलंगणा राष्ट्र समिती :

२०१४ साली निर्माण झालेल्या तेलंगणा राज्यामध्ये तेलंगणा राष्ट्र समिती प्रादेशिक पक्ष म्हणून उदयास आला आहे. आंध्रप्रदेशातून तेलंगणा हे वेगळे राज्य निर्माण करावे, ही भूमिका घेऊन तेलगू देसम पक्षाचे नेते के. चंद्रशेखर राव यांनी २७ एप्रिल २००१ रोजी तेलंगणा राष्ट्र समिती स्थापन केली. त्याचा उद्देश हैद्राबाद राजधानीसह तेलंगणा राज्य निर्माण करणे हा होता. २ जून २०१४ रोजी तेलंगणा हे राज्य अस्तित्वात आले आहे. २०१४ पासून तेलंगणा राज्याचे मुख्यमंत्री म्हणून चंद्रशेखर राव हे कार्यरत आहेत.

### ९) जनता दल (सेक्युलर) :

या पक्षाची स्थापना माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांनी जुलै १९९९ मध्ये केली. याचा ऐतिहासिक पार्श्वभूमी जनता पक्षापासून आहे. जनता पक्षामध्ये एच. डी. देवगौडा, कुमारस्वामी, सी. एम. इब्राहिम, रेवण्णा इत्यादी अनेक नेते आहेत. हा पक्ष कर्नाटक, अरुणालच प्रदेश व केरळ या तीन राज्यामध्ये अस्तित्वात असून कर्नाटकामध्ये आघाडी करून सत्ता प्रस्थापित केली आहे. हा पक्ष कर्नाटकात सत्तेच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका निभावत आहे. सध्या पक्षाचे अध्यक्ष एच. डी. देवेगौडा आहेत. कर्नाटकाच्या

विधानसभेत ३१ सदस्य आहेत व विधान परिषदेत ११ सदस्य आहेत. लोकसभा व राज्यसभेमध्ये प्रत्येकी एक सदस्य आहेत. हा पक्ष तरीही कर्नाटकाच्या राजकारणात महत्त्वाचा आहे.

**१०) आसाम गण परिषद :**

बांग्लादेशातून आसाममध्ये स्थलांतरित होणाऱ्या, बेकायदेशीर राहणाऱ्या विरोधात ऑल आसाम स्टुडंट युनियन स्थापन झाली. १९७७ साली आसूने बेकायदेशीर स्थलांतरविरोधात बेकायदेशीर नागरिकांचे नाव मतदार यादीतून काढून टाकावे, यासाठी शांततेच्या मार्गाने आंदोलन केले. ही चळवळ अनेक वर्ष चालली होती. आंदोलनाच्या परिस्थितीमध्ये आसूने १९८३ मध्ये ऑल आसाम गण संग्राम परिषद स्थापन केली. यात बऱ्याच संघटना, राजकीय पक्षांच समावेश होता. १९८५ मध्ये पंतप्रधान राजीव गांधींच्या उपस्थितीत आसू आणि केंद्र सरकारमध्ये आसाम करार झाला. १४ ऑक्टोबर १९८५ रोजी आसू बरखास्त करून आसाम गण परिषद या नावाने प्रादेशिक पक्षाची स्थापना करण्यात आली. श्री. प्रफुल्लकुमार महंत अध्यक्ष बनले. १९८५ च्या निवडणूकीत आसाम गण परिषद ६७ जागा जिंकून राज्यात सत्ता स्थापन केली. १९९६ साली दुसऱ्यांदा सत्तेवर आले. दोन्ही वेळी प्रफुल्लकुमार महंत हे मुख्यमंत्री झाले होते. २००० साली अतुल बोरा हे बाहेर पडले होते, पुढे २००८ साली एकत्र आले. सध्या पक्षाचे अध्यक्ष अतुल बोरा आहेत. आसाम विधान सभेमध्ये केवळ १ सदस्य आसाम गण परिषदेचे आहेत. तरीही हा पक्ष महत्त्वाचा आहे.

**११) झारखंड मुक्ती मोर्चा :**

हा एक झारखंड राज्यातील प्रादेशिक पक्ष आहे. १५ नोव्हेंबर १९७२ रोजी बिरसा मुंडा याच्या जन्मदिनी झारखंड बिहारपासून स्वतंत्र राज्याचा दर्जा मिळवून देण्यासाठी या पक्षाची निर्मिती झाली. १५ नोव्हेंबर २००० रोजी झारखंड राज्याची निर्मिती झाली. सीबू सोरेन आणि हेमंत सोरेन यांनी झारखंडमध्ये आपली सत्ता स्थापन केली. सध्या झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते हेमंत सोरेन हे मुख्यमंत्री म्हणून कार्यरत आहेत. २०१९ साली झालेल्या विधानसभेत ३० जागा मिळाल्या आहेत. सध्या या पक्षाचे अध्यक्ष शिबू सोरेन आहेत.

**१२) राष्ट्रीय जनता दल :**

५ जुलै १९९७ रोजी लालुप्रसाद यादव व इतर नेत्यांनी मिळून राष्ट्रीय जनता दलाची स्थापना केली. लालूप्रसाद यादव हे पक्षाचे अध्यक्ष झाले. हा पक्ष बिहार, झारखंड व केरळमध्ये अस्तित्वात आहे. हा पक्ष १९९७ पासून २००५ पर्यंत बिहारमध्ये सत्तेवर होता. त्यानंतर नितीशकुमार बरोबर युती करून २०१५ ते २०१७ सत्तेत सहभागी झाला होता. २०२० साली २४४ पैकी ७५ व महागंठबंधनला ११० जागा मिळाल्या असून सध्या हा पक्ष प्रमुख विरोधी पक्ष म्हणून कार्यरत आहे. सध्या या पक्षाचे नेतृत्त्व लालूप्रसाद यादव यांच्याकडेच आहे.

**१३) बिजू जनता दल :**

बिजू जनता दल हा ओरिसा राज्यातील प्रादेशिक पक्ष आहे. याची स्थापना २६ डिसेंबर १९९७ रोजी जनता दलातून फुटून नवीन पटनायक यांनी केली. भाजपबरोबर आघाडी करून २००० साली ओरिसा

राज्यामध्ये सत्तेवर आले व नवीन पटनायक हे मुख्यमंत्री झाले. त्यानंतर २००४, २००९, २०१४, २०१९ सलग पाचव्यांदा सत्तेवर आहेत. नवीन पटनायक यांनी केलेल्या विकास कामामुळे त्यांना पुन्हा सत्ता प्रस्थापित करताना कोणतीही अडचण आली नाही. २०१९ च्या विधानसभेच्या निवडणूकीत ११४, लोकसभेत १२, राज्यसभेत १० सदस्य हे बिजू जनता दलाचे आहेत.

**१४) सिक्कीम डेमॉक्रॅटिक फ्रंट :**

हा सिक्कीममधील प्रादेशिक पक्ष असून याची स्थापना पवनकुमार चामलींग यांनी लोकशाही समाजवादी विचारसरणीच्या आधारावर ४ मार्च १९९३ रोजी स्थापन केले. सध्या तेच अध्यक्ष आहेत. सिक्कीममध्ये १९९४ पासून २०१९ पर्यंत याच पक्षाची सत्ता कायम होती परंतु २०१९ साली केवळ १५ जागा मिळाल्या. परंतु प्रेमसिंगतमाग यांनी सिक्कीम क्रांतीकारी मोर्चा स्थापन करून सरकार स्थापन केले त्यामुळे सिक्कीम डेमॉक्रेटिक फ्रंटला सत्तेपासून दूर जावे लागले.

**१५) मिझो नॅशनल फ्रंट :**

१९५५ साली मिझो कल्चरल सोसायटीची स्थापना झाली. त्याचे सचिव लालडेंगा हे होते. १९५९ मध्ये दुष्काळ पडून मिझो टेकड्या उद्ध्वस्त झाल्या. दुष्काळामध्ये बांबूच्या झाडांना उंदरांनी खाल्ले आणि पिकांचेही नुकसान केले. त्यामुळे धान्याचा तुटवडा पडला. बरेच लोक भूकबळी ठरले. या काळात सोसायटीने १९६० साली नामकरण करून मौतम फ्रंट असे करण्यात आले व सप्टेंबर १९६० मध्ये मिझो नॅशनल फेमिन फ्रंट असे नाव देण्यात आले. या फ्रंटने मिझो लोकांना भात, अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तू पुरवल्या त्यामुळे हा फ्रंट लोकप्रिय झाला. पुढे २२ ऑक्टोबर १९६१ रोजी मिझो नॅशनल फ्रंट मध्ये रूपांतर करण्यात आले. १९८७ साली हा पक्ष सत्तेवर आला व लालडेंगा हे मुख्यमंत्री झाले. दोनच वर्षामध्ये सरकार कोसळले. त्यानंतर लालडेंगा यांचे १९९० साली निधन झाले. पुढे त्याची धुरा झोरमथांग यांच्याकडे आली. १९९८ ते २००८ पर्यंत हा पक्ष सत्तेवर होता. त्यानंतर २०१८ साली पुन्हा सत्तेवर आला आहे. झोरमथांग हे सध्या मुख्यमंत्री आहे. एकूणच हा पक्ष प्रादेशिक पक्ष म्हणून मिझोराममध्ये कार्यरत आहे.

**१६) समाजवादी पक्ष :**

मुलायमसिंग यादवांनी जनता दलातून फूटून ४ ऑक्टोबर १९९२ रोजी या पक्षाची स्थापना केली. हा पक्ष उत्तर प्रदेशातील प्रादेशिक पक्ष असून महत्त्वाची भूमिका बजावणारा पक्ष आहे. महाराष्ट्र, मध्यप्रदेश व उत्तर प्रदेश मध्ये वर्चस्ववादी पक्ष म्हणून कार्यरत आहे. मुलायमसिंग यादव हे १९९३ ते १९९५ व २००३ ते २००७ असे दोन वेळा मुख्यमंत्री झाले तर पक्षाचे नेते अखिलेश यादव २०१२ ते २०१७ मुख्यमंत्री राहिले आहेत. २०२२ च्या निवडणूकीत समाजवादी पक्षाला १११ जागा मिळाल्या आहेत. लोकसभेत ३ व राज्यसभेत ४ सदस्य आहेत. सध्या पक्षाचे प्रमुख म्हणून अखिलेश यादव कार्यरत आहेत.

**१७) महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष :**

हा गोवा राज्यातील गोमंतक पक्ष आहे. १९६३ साली दयानंद बांदोडकर यांनी महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाची स्थापना केली. २० डिसेंबर १९६३ ते १९७३ पर्यंत गोवा व दीव-दमनचे मुख्यमंत्री राहिले. त्यांच्या

मृत्यूनंतर त्यांची मुलगी शशिकला काकोडकर या सत्तेवर आल्या. हा पक्ष भाजपबरोबर कधी युती किंवा कधी निवडणूकीनंतर युती करून सत्तेवर राहिला आहे. सध्याच्या २०२२ साली झालेल्या निवडणूकीत महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाला केवळ २ जागा मिळाल्या आहेत. तरीही तो भाजपाबरोबर युती करून सत्तेवर आहे. सध्या पक्षाचे नेतृत्त्व दिपक ढवळीकर व सुदीन ढवळीकर यांच्याकडे आहे.

**१८) केरळा कॉंग्रेस :**

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसमध्ये फूट पडून १९६४ साली के. एम जॉर्ज बालकृष्ण पिलाई आणि मन्नथ पद्मनाभन यांनी या पक्षाची स्थापना केली. या पक्षाच्या हाती सत्ता जर मिळाली नाही तरीही केरळा कॉंग्रेसची भूमिका महत्त्वाची आहे. हा पक्ष कधी राष्ट्रीय लोकशाही आघाडी कधी संयुक्त पुरोगामी आघाडी व कधी डाव्या आघाडीमध्ये समाविष्ट झालेला होता. सध्या पी. जे. जोसेफ हे पक्षप्रमुख असून सध्या केरळ विधानसभेत २ सदस्य आहेत.

**१९) युनायटेड डेमॉक्रेटीक पक्ष :**

हा पक्ष मेघालयामध्ये कार्यरत असून याची सुरुवात स्थापन इ. के. माऊलॉग यांनी १९९७ मध्ये केली आहे. १९९८ साली बी. बी. लायंग डोह हे कॉंग्रेस पक्षाच्या पाठिंब्यावर मुख्यमंत्री झाले. २००० साली इ. के. माऊलॉग यांनी मुख्यमंत्री झाले. २००८ ते २००९ या कालावधीत डॉ. डोनकुपर रॉय हे मुख्यमंत्री झाले. सध्या विधानसभेत ६ सदस्य आहेत.

**२०) आम आदमी पार्टी :**

२०११ साली भ्रष्टाचाराच्या विरोधात सुरू झालेल्या आंदोलनामध्ये अरविंद केजरीवाल सहभागी झाले. पुढे २६ नोव्हेंबर २०१२ रोजी आम आदमी पक्षाची स्थापना केली. २०१३ मध्ये दिल्ली विधानसभेच्या निवडणूकीत केवळ २८ जागा मिळाल्या. कॉंग्रेसच्या पाठिंब्यावर सरकार स्थापन केले व अरविंद केजरीवाल मुख्यमंत्री झाले. परंतु हे सरकार अल्पजिवी ठरले. पुढे २०१५ साली ७० पैकी ६७ जागा जिंकून दिल्ली विधानसभेवर सत्तेवर आले. २०२० साली ६२ जागा जिंकून पुन्हा सत्तेवर आले. अरविंद केजरीवाल हे मुख्यमंत्री म्हणून कार्यरत आहेत. याचबरोबर पंजाबमध्ये २०१७ साली २० जागा जिंकल्या होत्या. २०२२ च्या निवडणूकीत ९२ जागा जिंकून सरकार स्थापन केले आहे व भगवान मान हे मुख्यमंत्री झाले आहेत. गोव्यामध्ये २०२२ च्या निवडणूकीत २ विधानसभेच्या जागा जिंकल्या आहेत. हे पंजाब व दिल्लीमध्ये प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता मिळवली आहे.

**२१) नागा पिपल्स फ्रंट :**

हा पक्ष नागालँड, मणीपूर व अरुणाचल प्रदेशमध्ये अस्तित्वात असून मुख्यत: नागालँडमध्ये प्रादेशिक पक्ष आहे. या पक्षाची स्थापन २००२ साली निऊपीआरिओ यांनी केली आहे. यापक्षाने भारतीय जनता पक्षाबरोबर युती करून २००३ ते २०१८ पर्यंत सरकार चालवले आहे. २०१८ च्या निवडणूकीत केवळ २६ जागा जिंकल्या असून एनडीपीपी व भाजप यांच्या बरोबर युती करून सत्तेत सहभागी झाले. सध्या या पक्षाचे

अध्यक्ष डॉ. शुरोजेली लीझीत्सू हे आहेत. नागा पिपल्स फ्रंट याच्यात फूट पडून निऊपीआ रिओ यांनी नॅशनॅलिस्ट डेमॉक्रॅटीक प्रोग्रेसीव पार्टी स्थापन करून पुन्हा मुख्यमंत्री झाले आहेत.

अशा प्रकारे भारतातील प्रादेशिक पक्ष स्थापन झाले असून यामध्ये प्रामुख्याने स्थानिक अस्मितेच्या आधारावर तसेच एकमेकांच्या मतभेदातून सत्ता प्रस्थापित करण्यासाठी पक्षाची निर्मिती झाली आहे. सर्व प्रादेशिक पक्षाचा विचार करता राज्यपातळीवर सरकार किंवा सत्ता प्रस्थापित करताना प्रादेशिक पक्ष महत्त्वाचे आहेत. परिणामत: तेच सत्तेवर आहेत, असे आपणास आढळून येईल.

### २.२.४ राज्यपातळीवरील द्विपक्षीय व्यवस्था (गुजरात व मध्यप्रदेश) :

भारत हा बहुपक्षपद्धती असलेला देश आहे. भारतात अनेक राज्यामध्ये प्रादेशिक पक्ष अस्तित्वात आले आहेत. परंतु गुजरात व मध्यप्रदेश सारख्या दोन मोठ्या राज्यामध्ये कोणतेही प्रादेशिक पक्ष स्थापन झाले नाही किंवा कोणता तिसरा पक्षप्रभावी ठरला नाही. त्यासंदर्भात आपण चर्चा करणार आहोत.

**१) गुजरात :**

२०१४ च्या लोकसभा निवडणूकीत देशभर गुजरातमधील विकासाच्या मॉडेलची चर्चा झाली. कारण भाजपाचे पंतप्रधान पदाचे उमेदवार असलेले नरेंद्र मोदी हे तेव्हा गुजरातचे मुख्यमंत्री होते आणि त्यांनी राज्यातील आपल्या शासनाची कर्तबगारी हा प्रचाराचा मध्यवर्ती मुद्दा बनवला. महागुजरात आंदोलनानंतर मुंबई गुजरातचा भाग असावी, ही मागणी मान्य न होताच १९६० साली गुजरात राज्य अस्तित्वात आले. गुजरात राज्यनिर्मिती नंतरच्या राजकारणाची सुरुवात ब्राह्मण आणि बनिया समाजाच्या राजकीय वर्चस्वापासून झाली. इतर अनेक राज्याप्रमाणेच गुजरातमध्येही सुरुवातीच्या काळात काँग्रेस पक्षाचे वर्चस्व होते. त्याला पहिल्यांदा शह दिला तो स्वतंत्र पक्षाने. काँग्रेसच्या राजकारणात सत्तेपासून दूर फेकल्या गेलेल्या जुन्या राजेरजवाड्यांनी गुजरातेत काँग्रेस विरोधाचे राजकारण उचलून धरले. गुजरातच्या राजकारणामध्ये राजकीय पक्ष हे अनेक असले तरी स्पर्धा मात्र दोनच पक्षामध्ये झाल्याचे दिसते.

१) १९६२ व १९६७ या दोन निवडणूकामध्ये काँग्रेस आणि स्वतंत्र पक्ष याच्या मध्येच स्पर्धा होती व काँग्रेस पक्षाला १९६२ साली ११३ व स्वतंत्र पक्षाला २६ जागा मिळाल्या होत्या. १९६७ च्या निवडणूकीत काँग्रेस ९३ व स्वतंत्र पक्षाला ६६ जागा मिळाल्या होत्या.

२) १९६९ साली काँग्रेसमध्ये फूट पडली आणि अत्यंत जवळचे काँग्रेस नेते मोरारजी देसाई हे काँग्रेसमधून बाहेर पडले. १९७२ व १९७५ च्या निवडणूकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि संघटना काँग्रेस यांच्यातच निवडणूकीमध्ये चुरशीची लढत झाली. १९७२ च्या निवडणूकीत काँग्रेसला १४० व संघटना काँग्रेसला १६ जागा मिळाल्या व १९७५ च्या निवडणुकीत काँग्रेसला ७५ व संघटना काँग्रेसला ५६ जागा मिळाल्या होत्या.

३) १९७७ साली जनता पक्षाचे नेतृत्त्व मोरारजी देसाई यांनी केले. त्यामुळे साहजिकच गुजरातमध्ये जनता पक्ष निवडणूकीत सहभाग घेतला. १९८० च्या निवडणूकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय) ला १४१

जागा व जनता पक्षाला (जेपी) २१ जागा व भाजपला ९ जागा मिळाल्या. १९८५ च्या निवडणुकीत काँग्रेसला १४९ व जनता पक्षाला १४, भाजप ११ जागा मिळाल्या. त्यामुळे काँग्रेस आणि जनता पक्षामध्ये खऱ्या अर्थाने लढत झाली.

४) आधीपासून भारतीय जनसंघ गुजरातमध्ये तग धरून होता तो भाजप पक्षाच्या रूपाने उदयास आला आणि १९९० निवडणूकीत भाजपाने ६७ जागा जिंकल्या व काँग्रेस केवळ ३३ जागा जिंकल्या. चिमणराव पटेल यांच्या जनता दलाने ७० जागा जिंकून बऱ्यापैकी यश मिळवले. त्यामुळे भाजपाला सत्तेपासून दूर राहावा लागला. परंतु चिमणभाई बरोबर युती करून सत्तेत सहभागी झाला. पण ते फारकाळ टिकले नाही.

५) १९९५ पासून आजपर्यंत मात्र भाजपाने हिंदुत्वाची अस्मिता निर्माण करून आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. १९९५, १९९८, २००२, २००७, २०१२ व २०१७ या सर्व निवडणूकामध्ये खरी लढत ही भाजप व काँग्रेस यांच्यातच होती. यामध्ये भाजपाने आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे.

अशा प्रकारे भारतामध्ये बहुपक्षपद्धती असली तरी गुजरातमध्ये मात्र ती द्विपक्षीय स्वरूपाची राहिली आहे. सुरुवातीच्या काळात काँग्रेसविरुद्ध स्वतंत्र पक्ष, काँग्रेस विरुद्ध संघटना काँग्रेस, काँग्रेस विरुद्ध जनता पक्ष व १९९० पासून काँग्रेस विरुद्ध भाजप अशाप्रकारे प्रत्येक टप्प्यावर राजकीय स्पर्धा दोन पक्षामध्ये सीमित राहिले आहे. हे गुजरातचे राजकीय वैशिष्ट्य म्हणता येईल. सर्वसाधारणपणे गुजरातच्या राजकारणाचे जरी टप्पे केले तरी १९६०-७५ हा पहिला टप्पा, १९७५ ते १९९५ दुसरा टप्पा आणि १९९५ ते आजपर्यंत टप्पा हा चौथा टप्पा म्हणता येईल. १९९५ पासूनचा टप्पा हा फक्त भाजप वर्चस्वाचा नाही तर नरेंद्र मोदी यांच्या वर्चस्वाचा देखील राहिला आहे.

मोदीच्या उदयानंतर गुजरातच्या पक्षपद्धीतीत एक मोठा फरक झाला. पक्षीय स्पर्धा दोन पक्षामध्ये असल्याचे रचनात्मक वैशिष्ट्ये कायम राहिले. उलट ते जास्त पक्के झाले. नरेंद्र मोदी यांनी हिंदू गुजराती अस्मितेचे राजकारण प्रचलित केले. त्यामुळे हिंदू समाजातील जवळपास सगळ्याच समाजघटकांचा भाजपाला पाठिंबा मिळू लागला. असे असले तरी गुजरातमध्ये मात्र द्विपक्ष पद्धतीच कायम राहिली आहे.

**२) मध्यप्रदेश :**

भाषेच्या आधारे राज्ये नव्याने संघटित करताना १९५६ साली देशाच्या मध्यभागी जो प्रदेश उर्वरित राहिला. त्या सगळ्या प्रदेशाला एकत्रित करून मध्यप्रदेश निर्माण केला गेला. ब्रिटीशकाळात मध्यप्रांत व बेरार या नावाचा प्रांत होता. मध्यप्रदेश हा बहुभाषिक प्रांत असला तरी त्यावर हिंदी भाषिकांचे वर्चस्व राहिले आहे. दुसरी गोष्ट म्हणजे १९५६ साली जो मध्य आणि पूर्व भारतातील एक मोठा आदिवासी पट्टी या राज्यात समाविष्ट केला होता. तो २००० साली छत्तीसगढ या नावाने वेगळा काढून स्वतंत्र राज्य करण्यात आले. हे विभाजन झाल्यानंतरही प्रादेशिकता नसलेले राज्य अशीच मध्यप्रदेशाची ओळल राहिली आहे. त्यामुळे कोणताही प्रादेशिक पक्ष या मध्यप्रदेशामध्ये निर्माण झाला नाही.

१९४८ पर्यंत हा प्रदेश संस्थानिकांच्या नियंत्रणाखाली राहिला होता. संस्थाने खालसा झाल्यानंतर निवडणूकाच्या राजकारणात ही त्याचे महत्त्व वाढले. कारण पूर्वीपासूनचा आपापल्या संस्थानामध्ये त्यांचा मोठा प्रभाव होता. १९५७ च्या निवडणूकीत काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून संस्थानिकाचे उमेदवार निवडून आले आणि काँग्रेस पक्ष सत्तेवर राहिला. राज्य स्थापनेनंतर रविशंकर शुक्ल पहिले मुख्यमंत्री झाले. परंतु अवघ्या दोन महिन्यात त्याचे निधन झाले. त्यानंतर नेहरूंनी कैलाशनाथ काटजू यांना राज्याचे मुख्यमंत्री केले. त्याच्या नंतर भगवंतराव मंडलोई काही काळ मुख्यमंत्री होते. नंतर १९६७ पर्यंत डी. पी. मिश्रा यांच्याकडे राज्याची सूत्रे राहिली. त्यानंतर मात्र मध्यप्रदेशमध्ये द्विपक्षीय राजकारणाला सुरुवात झाली. १९५७ व १९६२ मध्ये काँग्रेसला प्रबळ विरोध करू शकेल अशी मोठी राजकीय शक्ती मध्यप्रदेशाच्या राजकारणात अस्तित्वात नव्हती.

**द्विपक्षीय राजकारण :**

मध्यप्रदेशचे राजकारण हे १९६७ पासून आजपर्यंत द्विपक्षीय राहिले आहे. पहिल्या दोन निवडणूकामध्ये काँग्रेसला विरोधी पक्ष नव्हता. परंतु जनसंघाने १९६७ सालच्या निवडणूकीत ७८ जागा जिंकून काँग्रेस पक्षाला आव्हान दिले. काँग्रेसला काटावरचे बहुमत मिळाले. ३ काँग्रेसचे आमदार पक्षातून बाहेर पडले आणि काँग्रेसची सत्ता गेली. तेव्हा जनसंघ स्वतंत्र व संयुक्त समाजवादी यांनी आघाडी स्थापन केली. काँग्रेसचे फुटीर आमदार गोविंद नारायणसिंग मुख्यमंत्री बनले. मात्र त्यांचे सरकार अल्पजीवी ठरले आणि मार्च १९६९ साली काँग्रेसने सरकार स्थापन करून श्यामचरण शुक्ला मुख्यमंत्री झाले. तेव्हापासून आजपर्यंत द्विपक्षीय पद्धतीने निवडणूका होऊन मध्यप्रदेशामध्ये भाजपाचे वर्चस्व कायम राहिलेले दिसते. ते पुढीलप्रमाणे–

१) १९६७ व १९७२ च्या निवडणूकीत काँग्रेस आणि जनसंघामध्ये खऱ्या अर्थाने लढत झाली. यामध्ये जनसंघाची अनुक्रमे ७८ व ४८ होती.

२) १९७७ साली जनतापक्षाचे प्रभुत्व असल्यामुळे काँग्रेसला केवळ ८४ जागा मिळाल्या व जनता पक्षाला २३० जागा मिळाल्या या दोन्ही पक्षातच मुख्य लढत झाली होती. त्यावेळी जनसंघ जनता पक्षात विलीन झाला होता.

३) १९८० व १९८५ या दोन्ही निवडणूकीमध्ये भाजप व काँग्रेस यांच्यातच खरी लढत झाली असून काँग्रेस सत्तेवर राहिला.

४) १९९० साली प्रथमच भाजप सत्तेवर आला. त्यावेळी २२० जागा भाजपाला व केवळ ५६ जागा काँग्रेसला मिळाली होती.

५) १९९३ आणि १९९८ साली मात्र काँग्रेस पुन्हा सत्तेवर आला त्या निवडणुकीमध्ये खरी लढत भाजप व काँग्रेस यांच्यातच होती.

६) २००३, २००८, २०१३ या तीनही निवडणूकामध्ये भाजपाला मोठे यश मिळाले व मध्यप्रदेशाच्या राजकारणाचे सत्तास्थान कायम राखले.

७) २०१८ साली भाजपाला १०९, काँग्रेस ११४ जागा मिळाल्या. काँग्रेसनी सत्ता प्रस्थापित केले. परंतु भाजपाने 'ऑपरेशन कमळ' या नावाखाली काही काँग्रेस नेत्यांना आपल्या पक्षात सामावून घेतले. १९६७ साली जसे घडले त्याचा प्रत्यय या निवडणूकीत आला आणि काँग्रेस पक्षाचे सरकार पडले आणि पुन्हा भाजपाने आपले सरकार प्रस्थापित केले.

वरील सर्व निवडणूकीचा विचार करता मध्यप्रदेशमध्ये काँग्रेस, जनसंघ किंवा भाजप यांच्यामध्येच खरी निवडणूक झाली आहे. कोणत्याही निवडणूकीमध्ये त्रिशंकू व्यवस्था निर्माण झाले नाही. त्यामुळे मध्यप्रदेशातील राजकारण हे द्विपक्षीय व्यवस्थेची राहिली आहे, असे म्हणता येईल. या राज्यामध्ये प्रादेशिक पक्षाच्या आधारावर कोणताही पक्ष स्थापन झाला नाही. मध्यप्रदेशाच्या राजकारणात दोनच विचारसरणीचे पक्ष कार्यरत असून तिथे पद्धतशीरपणे हिंदू प्रतीके, हिंदू मूल्ये आणि हिंदू सांस्कृतिक जाणीव याचा प्रभाव वाढविला आहे. त्यामुळे भाजप पक्ष मोठ्या प्रमाणात वाढली आहे. भाजपाने गुजरातप्रमाणे मध्यप्रदेशमध्ये ही आपले वर्चस्व निर्माण केले आहे.

गुजरात व मध्यप्रदेश या दोन्ही राज्यामध्ये द्विपक्षीय स्पर्धा कायम राहिली आहे. फक्त फरक हा आहे की, गुजरामध्ये काँग्रेस विरोधातील पक्ष बदलली, कधी स्वतंत्रपक्ष, कधी संघटना काँग्रेस, जनता पक्ष, तर कधी भाजप अशी विरोधी पक्षे बदलले. परंतु मध्य प्रदेशमध्ये मात्र काँग्रेस विरुद्ध जनसंघ/भाजप असाच राहिला आहे. त्यामुळे भारतीय राजकारणातील वेगवेगळ्या राज्यामध्ये अनेक पक्ष अस्तित्वात आले आहेत परंतु गुजरात व मध्यप्रदेश या दोन्ही राज्यामध्ये कोणता ही प्रादेशिक पक्ष स्थापन न करता जनतेची मते ही काँग्रेस आणि इतर पक्ष किंवा काँग्रेस किंवा भाजप अशाच विचारसरणीत विभागलेला दिसतो.

## २.३ सारांश :

भारतामध्ये भाषा, जात, धर्म, प्रादेशिकता, संस्कृती यांच्यात विविधता असल्यामुळे व स्वातंत्र्यपूर्वी पासूनच अनेक पक्ष अस्तित्वात असल्यामुळे भारतात बहुपक्षपद्धती रूढ झाली आहे. भारतात आज जवळ जवळ ८ राष्ट्रीय पक्ष हे प्रादेशिक पक्ष व २७९६ पक्ष नोंदणीकृत आहेत. २७ राज्यामधील पक्ष हे प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता मिळाले आहेत. त्याचबरोबर प्रादेशिक पक्षाचे वर्चस्व प्रस्थापित होत असताना गुजरात आणि मध्यप्रदेश सारख्या राज्यामध्ये द्विपक्षीय व्यवस्था अस्तित्वात आली आहे. आजपर्यंत तेथे प्रादेशिक अस्मितेच्या आधारावर कोणतेही राजकीय पक्ष स्थापन झाले नाहीत.

भारतामधील बहुपक्षपद्धतीमुळे अनेक राजकीय पक्षांना सत्ता प्रस्थापित करण्याची संधी मिळाली आहे. त्याचबरोबर प्रादेशिक पक्ष सुद्धा देशाच्या राष्ट्रीय पातळीवर आपले वर्चस्व निर्माण करण्याचा आणि सत्तेत सहभागी होण्याचा प्रयत्न करताना दिसतात. १९७७ साली निर्माण झालेला जनता पक्ष हा अनेक पक्षांनी एकत्र येऊन स्थापन केला होता. नंतरच्या काळात १९८९ ते २०१९ पर्यंत कोणत्याही पक्षाला केंद्रीय पातळीवरती बहुमत मिळाले नाही. त्यामुळे युती व आघाडी करून सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न झाला. त्याचबरोबर निवडणूक पूर्व व नंतर आघाडी स्थापन करण्यात येत होते. राष्ट्रीय लोकशाही आघाडी, संयुक्त पुरोगामी आघाडी व तिसरी आघाडी अशा आघाड्याही प्रस्थापित करण्यात आल्या. एकूणच भारतीय

राजकारणामध्ये सत्ता प्रस्थापित करताना सर्व पक्षाचा विचार करावा लागला. सर्व लहान-मोठ्या पक्षांना सामावून घेऊन राज्यकारभार करणे आवश्यक बनले आहे. त्यामुळे बहुपक्षपद्धती भारतामध्ये टिकून राहिली आहे.

## २.२ स्वयंअध्ययन प्रश्न व उत्तरे :

**स्वयंअध्ययन प्रश्न – १ :**

१) जनता पक्षाची स्थापना कोणत्या साली झाली?

– १९७७

२) भारतीय जनसंघाची स्थापना कोणी केली?

– शामाप्रसाद मुखर्जी

३) चौधरी चरणसिंग यांनी कोणत्या पक्षाची स्थापना केली?

– भारतीय लोकदल

४) १९७५ साली आणीबाणीची घोषणा कोणी केली?

– इंदिरा गांधी

५) जनता पक्षाच्या आघाडीला १९७७ च्या निवडणूकीत सत्ता मिळाल्यानंतर कोण पंतप्रधान झाले?

– मोरारजी देसाई

**स्वयंअध्ययन प्रश्न – २ :**

१) १९९१ साली काँग्रेसचे कोण पंतप्रधान झाले?

– पी. व्ही. नरसिंहराव

२) कोणत्या साली बाराव्या लोकसभेची निवडणूक झाली?

– १९९८

३) १९९९ साली कोणत्या पक्षाचे सरकार केंद्रात कार्यरत होते?

– भाजप

४) २०१९ च्या निवडणुकीत कोणत्या पक्षाला बहुमत मिळाले आहे?

– भाजप

५) संयुक्त पुरोगामी आघाडी काळात देशाचे पंतप्रधान म्हणून कोणी काम केले?

– डॉ. मनमोहनसिंग

**स्वयंअध्ययन प्रश्न – ३ :**

१) शिवसेना हा पक्ष कोणत्या राज्यात कार्यरत आहे?

– महाराष्ट्र

२) धर्माच्या आधारावर निर्माण झालेला प्रादेशिक पक्ष कोणता?

- अकाली दल

३) तेलगू देसम पक्षाचे सध्या कोण प्रमुख आहेत?

- चंद्रबाबू नायडू

४) एच. डी. देवेगौडा हे कोणत्या पक्षाचे प्रमुख आहेत?

- जनता दल सेक्युलर

५) बिजू जनता दलाचे नेते कोण आहेत?

- नवीन पटनायक

**स्वयंअध्ययन प्रश्न – ४ :**

१) १९६२ साली गुजरातमध्ये कोणत्या पक्षाला जास्त जागा मिळाल्या?

- काँग्रेस

२) गुजरातमध्ये १९७२ व १९७५ च्या निवडणूकीत काँग्रेस विरुद्ध कोणता पक्ष कार्यरत होता?

- संघटना काँग्रेस

३) नरेंद्र मोदी पंतप्रधान होण्यापूर्वी कोणत्या राज्याचे मुख्यमंत्री होते?

- गजरात

४) मध्यप्रदेशमध्ये काँग्रेसविरुद्ध कोणता पक्ष कार्यरत आहे?

- भाजप

५) १९७७ च्या निवडणूकीत मध्यप्रदेशमध्ये कोणत्या पक्षाचे सरकार स्थापन झाले?

- जनता पक्ष

## २.६ अधिक वाचनासाठी पुस्तके :

१) Austin Granville : 'Working Democratic Constitution' OUP, New Delhi. (2014)

२) पळशीकर सुहास : 'देश-प्रदेश', युनिक ॲकॅडमी, पुणे (२०१५).

३) भोळे भास्कर : 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकाण', पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर (२००३)

४) पळशीकर सुहास (संपा.) : 'भारतातील प्रादेशिक पक्षांचे राजकारण', साधना प्रकाशन, पुणे (२००९)

५) https:\eci.gov.in

❑❑❑

# घटक ३

# आघाडीची सरकारे आणि भारतीय पक्षपद्धती

**अनुक्रमणिका**

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

- ३.२.१ राष्ट्रीय आघाडी (National Front)
- ३.२.२ संयुक्त आघाडी (United Front)
- ३.२.३ राष्ट्रीय लोकशाही आघाडी (National Democratic Allience)
- ३.२.४ संयुक्त पुरोगामी आघाडी (United Progressive Allience)

३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.० उद्दिष्ट्ये :

आघाडीचे सरकारे आणि भारतीय पक्षपद्धती या प्रकरणात आपण खालील विविध उद्दिष्ट्ये अभ्यासणार आहोत.

- भारतीय पक्षपद्धतीतील आघाडी सरकारचा अभ्यास करणे.
- आघाडी सरकारचे स्वरूप, ध्येयधोरणे व कार्यक्रम यांचा अभ्यास करणे.
- आघाडी सरकारच्या परिणामांचा अभ्यास करणे.
- भारतीय राजकारणातील आघाडी सरकारचा अभ्यास करणे.
- राष्ट्रीय आघाडी सरकारची ओळख विद्यार्थ्यांना करून देणे.
- संयुक्त आघाडी सरकारची ओळख विद्यार्थ्यांना करून देणे.
- राष्ट्रीय लोकशाही आघाडीची ओळख विद्यार्थ्यांना करून देणे.
- संयुक्त पुरोगामी आघाडीचा परिचय विद्यार्थ्यांना करून देणे.

## ३.१ प्रास्ताविक :

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण भारतातील आघाडी सरकारसंबंधी सविस्तर अभ्यास करणार आहोत. भारतामध्ये अनेक आघाडी सरकारे अस्तित्वात आली. परंतु १९९८ नंतर राष्ट्रीय लोकशाही आघाडी व २००४ नंतर संयुक्त पुरोगामी आघाडी या दोन आघाड्या समान कार्यक्रमाच्या आधारे निर्माण झालेल्या आहेत व तिसरी आघाडी ही प्राप्त परिस्थितीत व राजकीय हितसंबंधावर आधारलेली दिसून येते. या तीन आघाड्यांचा प्रामुख्याने आपण अभ्यास करणार आहोत.

संसदीय शासनव्यवस्थेत कायदेमंडळातील कनिष्ठ सभागृहात बहुमत प्राप्त करणाऱ्या राजकीय पक्षनेत्यास मंत्रीमंडळ बनविण्यासाठी पंतप्रधान म्हणून राष्ट्रप्रमुखामार्फत निवडले जाते. परंतु जेव्हा कोणत्याही एका राजकीय पक्षास बहुमत प्राप्त होत नाही, तेव्हा दोन किंवा अधिक राजकीय पक्ष व गट आपली आघाडी बनवून आपला नेता निवडतात व बहुमत प्राप्त करतात. त्या सरकारास 'आघाडी सरकार' असे म्हणतात. समान कार्यक्रमाच्या आधारे सत्ताप्राप्तीसाठी निवडणूकीपूर्वी वा निवडणूकीनंतर राजकीय गट/पक्ष एकत्रित येऊन आघाडीचे सरकार स्थापन करतात, ही सरकारे कायम अस्थिर असतात. कारण एखाद्या घटकपक्षाने पाठिंबा काढून घेतला तर ते सरकार कोसळते. अशाच प्रकारच्या आघाड्या भारतात देशपातळीवर व राज्यपातळीवर निर्माण झालेल्या आहेत.

भारतात आघाड्यांच्या राजकारणाची सुरुवात प्रथमत: राज्यांमध्ये झाली. १९६७ साली भारतातील सोळा राज्यात विधानसभा निवडणूका झाल्या, त्यापैकी बिहार, केरळ, मद्रास, ओरिसा, पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या आठ राज्यांत काँग्रेसला बहुमत मिळाले नाही आणि त्यामुळे या राज्यांमध्ये आघाडी सरकारे तयार झाली. या आघाड्या कोणत्याही तत्त्वावर, तत्त्वज्ञानावर व कार्यक्रमावर झालेल्या नव्हत्या तर केवळ सत्ताकारण ही त्यांच्या पाठीशी असलेली प्रेरणा होती. या आघाडीमधील राजकीय पक्ष भिन्न विचारसरणीचे होते. उदा. केरळमध्ये निवडणूकीपूर्वी सात पक्ष येऊन निवडणूकीनंतर सरकार स्थापन केले. तमिळनाडू राज्यात द्रमुक व स्वतंत्र या पक्षांनी निवडणूकीपूर्वी करार करून आघाडी स्थापन केली. राजस्थानमध्ये जनसंघ व स्वतंत्र अशी युती करून अपक्षांच्या साह्याने आघाडी सरकार स्थापन केले. उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश इत्यादी राज्यात १९६७ च्या निवडणूकांचे निकाल लागल्यानंतर आघाड्या तयार झाल्या होत्या. पंजाबमध्ये अकाली दल व जनसंघ यांनी एकत्र येऊन आघाडी सरकार स्थापन केली. महाराष्ट्रामध्ये पहिले आघाडी सरकार वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली तयार झाले. १९७८ च्या निवडणुकीत जनता पक्ष व काँग्रेसमधून फुटून तयार झालेली रेड्डी काँग्रेसचे आघाडी सरकार सत्तेवर येईल, असे अनेक राजकीय विश्लेषकांना वाटत होते. परंतु वसंतदादा पाटील यांनी जनता पक्षाचे अध्यक्ष एस. एस. जोशी व अन्य नेत्यांना चर्चेत गुंतवून रेड्डी काँग्रेस व इंदिरा काँग्रेस यांची आघाडी करून वसंतदादा पाटील मुख्यमंत्री व रेड्डी काँग्रेस व इंदिरा काँग्रेसचे नासिकराव तिरपुडे हे उपमुख्यमंत्री झाले. महाराष्ट्रातील प्रभावी आघाडी सरकार शरद पवारांच्या नेतृत्त्वाखाली १८ जूलै १९७८ ते १६ फेब्रुवारी १९८० ला तयार झाले. शरद पवारांनी वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळातून बाहेर पडून जनता पक्षाशी युती करून

शे. का. प. व इतर विरोधी पक्षांना एकत्र करून पुरोगामी लोकशाही आघाडी सरकार स्थापन केले. अशा प्रकारे भारतात राज्यामध्ये आघाडी सरकारची सुरुवात झाली.

अशाच प्रकारे देशपातळीवर आघाडी सरकारे स्थापन झालेली दिसून येतात त्यामध्ये १९७७ साली काँग्रेस विरोधी मोरारजी देसाई यांनी संघटना काँग्रेस, जनसंघ व समाजवादी पक्ष व भारतीय लोकदल या पक्षांना एकत्र करून जनता पक्षाची स्थापना केली व काँग्रेसच्या विरोधीत निवडणूक लढवली व ५४२ जागापैकी २७० जागा मिळाल्या. जनता दलाला लोकशाहीवादी काँग्रेसगट, द्रमुक पक्ष आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांनी जनता पक्षाला पाठिंबा दिला. प्रथमच आघाडीचे सरकार देशपातळीवर तयार झाले. १९८९ साली श्री. व्ही. पी. सिंग यांच्या नेतृत्त्वाखाली राष्ट्रीय मोर्चा (आघाडी) सरकार सत्तेवर आले. या सरकारमध्ये व्ही. पी. सिंग यांच्या नेतृत्त्वाखाली जनतादल, भा. ज. प., डावे पक्ष यांनी एकत्र येऊन आघाडी केली. १० नोव्हेंबर १९९० मध्ये व्ही. पी. सिंगाचे सरकार कोसळले जनता दलात फूट पाडून श्री. चंद्रशेखर हे काँग्रेसच्या पाठिंब्यांने ११ नोव्हेंबर १९९० ते २१ जुले १९९१ पर्यंत आघाडी सरकार स्थापन केले. १ जून १९९६ ते २० एप्रिल १९९७ एच. डी. देवेगौडांच्या नेतृत्त्वाखाली संयुक्त आघाडी सरकार सत्तेत आले. २१ एप्रिल १९९७ ते १९ मार्च १९९८ इंद्रकुमार गुजराल यांच्या नेतृत्त्वाखाली संयुक्त आघाडी सरकार तयार झाले १९ मार्च १९९८ ते १० ऑक्टोबर १९९९ भा.ज.प. च्या नेतृत्त्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडी सत्तेवर आली. अशा प्रकारे भारतामध्ये १९८९ ते २०१४ पर्यंत दिर्घकाळ आघाडी सरकारे अस्तित्वात होती.

## ३.२ विषय विवेचन :

भारतीय राजकारणात राष्ट्रीय पक्ष अस्तित्वात असले तरी १९८९ पासून ते २०१४ पर्यंत कोणत्याही एका पक्षाला केंद्रामध्ये बहुमत मिळाले नाही. त्यामुळे सत्ता संपादन करण्यासाठी आघाडी सरकारे अस्तित्वात आली. अनेक राज्यांमध्येही एकापेक्षा अधिक पक्ष कधी निवडणुकीपूर्वी किंवा कधी निवडणुकांचे निकाल घोषित झाल्यावर आघाड्या बांधतात व सत्तेवर येतात. आघाड्यांचे राजकारण देशात आता स्थिरावले आहे. त्याची सुरुवात १९६७ च्या निवडणुकानंतर झाली ही ऐतिहासिक वस्तुस्थिती आहे. १९४७ पासून १९६७ पर्यंत देशामध्ये केंद्र व राज्ये यामध्ये काँग्रेसपक्ष सत्तेवर होता. काँग्रेसला विरोध करणारा एकही सक्षम विरोधी पक्ष नव्हता. कारण स्वातंत्र्यपूर्व कालखंडात स्वातंत्र्य मिळवण्यामध्ये काँग्रेस पक्षाचे महत्त्वाचे योगदान राहिले आणि तोच पक्ष स्वातंत्र्यानंतर अस्तित्वात राहिला. या पक्षाला स्वातंत्र्यानंतर पं. नेहरूंसारखे सक्षम नेतृत्त्व लाभले. सन १९४७ ते १९६४ पर्यंत ते पंतप्रधान होते. नेहरूंनी अत्यंत विचारपूर्वक भारतातील सामाजिक, राजकीय व आर्थिक प्रश्न हाताळले होते. त्यामुळे विरोधकांना निवडणुकीमध्ये यश मिळत नव्हते. १९६४ मध्ये नेहरूंचे निधन झाले. भारतीय राजकारणातील परिस्थिती बदलत गेली. अनेक प्रादेशिक पक्ष उदयास आले. काँग्रेसमधून वेगवेगळे गट व नेते फुटून बाहेर पडले. त्यांनी नवीन पक्षाची स्थापना केली. १९६७ नंतर देशात विरोधी पक्षांची सरकारे अस्तित्वात आली. १९६७ सालानंतर काँग्रेसमध्ये इंदिरा गांधींचा कालखंड सुरू झाला. १९६७ ते १९७७ पर्यंत काँग्रेस पक्षाची सत्तासूत्रे इंदिरा गांधींकडे होती. त्यांनी १९७५ ते १९७७ च्या कालखंडात आणीबाणी जाहीर केली होती. यामध्येही इंदिरा गांधीजींची मुख्य भूमिका होती. त्यामुळे

अनेक विरोधी पक्ष एकत्र येऊन त्यांनी १९७७ ची निवडणूक लढवली व देशामध्ये पहिले विरोधी पक्षाचे सरकार अस्तित्वात आले. परंतु त्यांच्या अंतर्गत मतभेदामुळे हे सरकार टिकले नाही. १९८० च्या निवडणुकीमध्ये पुन्हा इंदिरा गांधीजींचे सरकार बहुमताने अस्तित्वात आले. १९८४ साली इंदिरा गांधींचे निधन झाले. सन १९८४ ते १९८९ पर्यंत राजीव गांधी देशाचे पंतप्रधान झाले.

सन १९८९ नंतर देशाचे राजकारण राज्यांच्या राजकारणातून निर्माण होऊ लागले. जे घटक राज्यांच्या पातळीपर्यंत सीमित होते, ते केंद्रपातळीवर घडून आले. सन १९८९ साली केंद्रामध्ये त्रिशंकू सरकार अस्तित्वात आले. त्यालाच आपण तिसरी आघाडी असे म्हणतो. याचा सविस्तर अभ्यास आपण करणार आहोत. १९९१ ते १९९५ मध्ये पुन्हा काँग्रेस पक्षाचे सरकार सत्तेवर आले. १९९६ च्या लोकसभा निवडणुकीनंतर देशामध्ये पुन्हा आघाडीची सरकारे सत्तेवर येण्यास सुरवात झाली. अशा प्रकारे देशाच्या राजकारणात आघाडी सरकारचे तीन स्वतंत्र पर्याय भारतीय राजकारणात निर्माण झाले.

लोकशाहीमध्ये राजकीय पक्षांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. प्रतिनिधिक लोकशाही राज्यांत राजकीय पक्षांना महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडावी लागते. लोकशाही शासनपद्धतीत जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधि मार्फत राज्यकारभार चालतो. जनतेच्या संमतीतून आणि टीकेतून लोकशाहीचा कारभार चालतो. सार्वत्रिक निवडणूकीत ज्या राजकीय पक्षाला लोकांचा पाठिंबा मिळतो, तो पक्ष कायदेमंडळात बहुमत प्राप्त करतो आणि सत्ताधारी बनतो. ज्या राजकीय पक्षांना लोकांचा पाठिंबा कमी प्रमाणात मिळतो ते पक्ष विरोधी पक्ष म्हणून सत्तारूढ पक्षाच्या कार्यावर नियंत्रण ठेवतात. लोकशाहीत सत्तारूढ पक्ष लोकमताचा पाठिंबा कायम टिकविण्यासाठी अधिक जबाबदारीने आणि कार्यक्षमतेने कारभार पाहतो, तर विरोधी पक्ष लोकमताचा पाठिंबा मिळविण्यासाठी अधिक जागृकतेने सत्तारूढ पक्षावर अंकुश ठेवतात. पुढील सार्वजनिक निवडणुकीत जनतेचा जास्तीतजास्त पाठिंबा मिळवून सत्तेवर येण्यासाठी तो नेहमी प्रयत्नशील असतो. लोकशाही राज्यात द्विपक्षपद्धती किंवा बहुपक्षपद्धती असते.

भारतात बहुपक्षपद्धती आहे. भातात राष्ट्रीय पातळीवरचे तसेच प्रादेशिक स्वरूपाचे विविध राजकीय पक्ष कार्य करताना दिसतात. स्वातंत्र्यप्राप्तीच्या काळापासून ते पुढे ४० वर्षाचा कालखंड विचारात घेतला तर राष्ट्रीय पातळीवर काँग्रेस पक्ष हा एकमेव प्रभावी सत्ताधारी पक्ष म्हणून कार्य करीत होता. १९७७ ते १९८० या जनता पक्षाच्या कार्यकालाचा अपवाद सोडला तर भारतात काँग्रेस प्रभावी, शक्तिशाली आणि सत्ताधारी पक्ष म्हणून आणि बाकीचे राजकीय पक्ष कमकुवत, दुर्बल विरोधी पक्ष म्हणून ओळखले जात होते. त्यामुळे भारतात एकपक्षीय लोकशाही पद्धती आहे, अशी उपाहासात्मक टीका केली जात असे. परंतु भारतीय पक्षपद्धतीचे स्वरूप एकपक्षीय होते, असा निश्चित निष्कर्ष काढता येणार नाही. कारण विविध घटक राज्यातील विविध पक्षांचे प्रभुत्व विचारात घेतले तर एकपक्षीय राजवट भारतात नाही, हे सिद्ध होते. डिसेंबर १९८९ मध्ये नववी सार्वत्रिक निवडणूक होऊन लोकसभेचे चित्र पूर्णपणे पालटले. १९८९ ते २०१४ पर्यंत कोणत्याही राजकीय पक्षाला बहुमत मिळाले नाही. १९८९ नंतर काँग्रेस पक्षाचे वर्चस्व कमी कमी होत गेले. देशामध्ये १९८९ नंतर आघाड्यांचे सरकारे स्थापन झालेली दिसून येते. या निवडणूकीपासून भारतात बहुपक्षपद्धतीचे स्वरूप देशपातळीवर प्रकट झाले. २०१४ पर्यंत देशात काँग्रेस हा प्रभावी पक्ष म्हणून काम

करीत होता. १९९८ ते २००४ पर्यंत भा. ज. प. चा अपवाद सोडला तर काँग्रेस पक्ष दिर्घ काळ सत्तेवर राहिला. परंतु २०१४ नंतर नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वामुळे व पक्षसंघटनात्मक बांधणीतून भा. ज. प. हा पक्ष गेले दहा वर्षे प्रभावी झालेला आहे. वरील विश्लेषणातून असे दिसून येते की, भारतामध्ये लोकशाही प्रगल्भ होताना दिसून येते.

देशपातळीवर पक्षाप्रमाणेच राज्यामध्येही आघाड्यांचे सरकारे १९६७ सालापासून येण्यास सुरुवात झाली आहे. त्याची अनेक उदाहरणे खाली दिलेली आहेत. तरीही अलिकडील कालखंडाचा विचार करता महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात १९९५ पासून ते आजपर्यंत आघाड्यांचे सरकारे आलेली आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने १९९५ मध्ये शिवसेना-भाजपने एकत्र येऊन आघाडी करून सरकार तयार केले. त्यांची ही युती २०१९ पर्यंत निवडणूक पूर्वी टिकून होते. परंतु निवडणूकीनंतर सत्तेसाठी व राजकीय वर्चस्वासाठी वैचारिक मतभिन्नता असणारे काँग्रेस व शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येऊन आघाड्यांचे सरकार महाराष्ट्रामध्ये तयार झालेले दिसते.

अशाच प्रकारे बिहारमध्ये नितीशकुमार यादव यांचा संयुक्त जनता दल हा पक्ष अनेक वर्षे भाजप विरोधी पक्ष म्हणून बिहार राज्यात काम करत होता. परंतु २०१४ च्या निवडणूकीनंतर या पक्षाने वैचारिक मतभिन्नता असली तरी भाजप बरोबर युती करून राजकीय सत्तेसाठी आघाडीचे सरकार तयार केले आहे. एकंदरीत वरील विश्लेषण लक्षात घेता, असे दिसून येते की, राज्यामध्ये होत असणाऱ्या युत्या फक्त सत्तेसाठी होताना दिसतात. आघाड्याच्या सरकारामध्ये सत्ता हाच मध्यवर्ती केंद्रबिंदू असतो. राज्यातील आघाडी सरकारचे प्रयोग याविषयी खालील परिच्छेदामध्ये त्याचे सविस्तर विश्लेषण केले आहे.

(१) राष्ट्रीय आघाडी, (२) संयुक्त आघाडी, (३) राष्ट्रीय लोकशाही आघाडी, (४) संयुक्त पुरोगामी आघाडी, सर्व आघाड्यांचा स्वतंत्रपणे अभ्यास आपण करणार आहोत.

### ३.२.१ राष्ट्रीय आघाडी (National Front) :

सन १९८९ नंतर भाजप व काँग्रेस यांना वगळून डाव्यापेक्षा वेगळी राजकीय शक्ती उभारण्याचा तिसरी शक्ती असे नाव पडले आहे. तिसरी शक्ती ही विशिष्ट विचारधारेवर आधारलेली नाही. त्यांच्यामध्ये सत्ता स्थापन करणे व निवडणूका लढवणे हा उद्देश असतो. भारतामध्ये स्वातंत्र्यानंतर १९६७ सालापर्यंत केंद्रापासून राज्यापर्यंत काँग्रेसची सत्ता होती. त्यामुळे विरोधी पक्षांमध्ये निराशा होती. काँग्रेस विरोधांचेच राजकारण त्यांच्यापैकी अनेक पक्षांनी चालवल्यामुळे त्या नकारात्मक आधारावर येऊन काँग्रेसला सत्तेवरून उतरवण्यासाठी विरोधीपक्ष एकत्र आले. १९६७ च्या निवडणूक निकालांनी राज्यसत्तेच्या संरचनेत पायाभूत बदल झाले. पृथगात्मक विरोधी पक्षांना किमान काही राज्यात तरी सत्तारूढ होण्याची संधी त्यात दिसली. काँग्रेसेत्तर अतिउजव्यांपासून अतिडाव्यापर्यंतच्या राजकीय पक्षांनी आपले तत्त्ववैचारिक कंगोरे बोथट करून परस्परांशी हातमिळवणी केली. त्यासाठी किमान समान कार्यक्रमावर त्यांनी सहमती करून घेतली. त्यातून तिसऱ्या आघाडीची पायाभरणी झालेली दिसून येते. १९६७ पासून १९७१ च्या निवडणुका होईपर्यंतच्या काळातील भारताच्या राज्यातील व संसदीय क्षेत्रातील सर्वांत महत्त्वाची घटना म्हणून राज्याराज्यातील

आघाड्या विचारधारेवर व तत्त्वावर झालेल्या नव्हत्या तर केवळ सत्ता हा त्यांच्या पाठीशी असलेला उद्देश होता. या आघाड्यांमधील राजकीय पक्ष भिन्न विचारसरणीचे होते. अनेक आमदारांनी आपल्या पक्षनिष्ठा बाजूला सारून मंत्रिपदे मिळवली ही परिस्थिती राज्याराज्यामध्ये चालू होती.

देशपातळीवर आणीबाणीमुळे काँग्रेसच्या वर्चस्वाला विरोध करण्यासाठी अनेक विरोधी पक्ष एकत्र येऊन निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. कारण अनेक पक्षांनी वेगवेगळ्या निवडणुका लढवल्या तर मतांची विभागणी ते त्याचा फायदा काँग्रेसला मिळतो. ही गोष्ट विरोधी पक्षांच्या लक्षात आले. त्यामुळे १९७७ च्या लोकसभा निवडणुकीवेळी समाजवादी पक्ष, संघटना काँग्रेस, जनसंघ, भारतीय लोकदल आणि काँग्रेस पक्षातून बाहेर पडलेले तरुण तुर्कने त्यांनी एकत्र येऊन जनता पक्षाची स्थापना केली. मोरारजी देसाई यांना पक्षाध्यक्ष करण्यात आले व चौधरी चरणसिंग उपाध्यक्ष झाले. अडवाणी सुरेंद्र मोहन व रामधन हे सरचिटणीस म्हणून निवडले गेले. जयप्रकाश नारायण यांच्या पुढाकाराने या पक्षाची निर्मिती झाली. त्यामध्ये त्यांची महत्त्वाची भूमिका होती. ५४१ जागांपैकी जनता पक्षाला २७० जागा मिळाल्या व बहुमताने जनता पक्षाने सरकार स्थापन केले. मोरारजी देसाई देशाचे पंतप्रधान झाले. देशामध्ये पहिले विरोधी पक्षाचे सरकार अस्तित्वात आले. परंतु हे सरकार जास्त काळ टिकले नाही. पक्षांतर्गत मतभेदामुळे तीन वर्षातच हे सरकार कोसळले. पुढे १९८० ते १९८९ पर्यंत काँग्रेसची सत्ता पुन्हा देशावर प्रस्थापित झाली. दरम्यानच्या कालखंडात जनता पक्षातून फुटून हिंदूत्ववादी विचारसरणीवर आधारित भारतीय जनता पक्षाची स्थापना झाली. तो पक्ष देशामध्ये काँग्रेस विरोधी पक्ष म्हणून मोठ्या प्रमाणात वाढण्यास सुरुवात झाली.

१९८९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी राजीव गांधींच्या मंत्रिमंडळात वित्तमंत्री असलेले विश्वनाथ प्रताप सिंगाची प्रतिष्ठा व लोकप्रियता वाढली होती. राजीव गांधींचे त्यांचे मतभेद झाले. विश्वनाथ प्रताप सिंग यांनी मंत्रिमंडळाचा व काँग्रेसचा राजीनामा दिला व भ्रष्टाचाराशी लढण्याच्या मुद्द्यावर जनमोर्चाची स्थापना केली. त्यातूनच राष्ट्रीय आघाडीचा उदय झाला. व्ही. पी. सिंग यांनी बोफोर्स तोफा खरेदी प्रकरणाचा मुद्दा उपस्थित केला. त्यांनी सर्व आरोप राजीव गांधी यांच्यावर केले. व्ही. पी. सिंगांनी अनेक विरोधी पक्षांना एकत्र घेऊन जनता दल, पक्षाची स्थापना केली. त्यांच्या विचाराला अनेक सदस्यांनी पाठिंबा दिला. भ्रष्टाचार, लाचलुचपत, सत्तेचा गैरवापर, बोफोर्स प्रकरण, फेअरफॅक्स प्रकरण व जर्मन पाणबुड्यांच्या खरेदीतील गैरव्यवहार इत्यादी मुद्द्यावर प्रचार करत १९८९ ची निवडणूक लढवली. या निवडणुकीत ५२५ जागांपैकी जनता दलाला १४१ जागा, काँग्रेसला १९३ जागा, भा. ज. प. ८८, मा. क. प. ३२, भा. क. प. १२, अण्णा द्रमूक ११ इतर पक्षांना ३५ आणि अपक्षांना १३ जागा मिळाल्या. कोणत्याही राजकीय पक्षाला लोकसभेत बहुमत मिळाले नाही. राजीव गांधी यांनी अल्पमतातील सरकार स्थापन करण्याचे नाकारले. जनता दलाने व्ही. पी. सिंग यांच्या नेतृत्त्वाखाली सरकार स्थापन केले. त्याला राष्ट्रीय मोर्चा सरकार राष्ट्रीय आघाडी असे नाव दिले. भा. ज. प., मा. क. प. व भा. क. प. व अपक्ष सदस्यांनी पाठिंबा दिला. या सरकारने काँग्रेस आणि भा. ज. प. यांच्या पलीकडे राष्ट्रीय पातळीवर आणखी एक शक्ती उभारण्याचा प्रयत्न केला.

सन १९७९ साली भारत सरकारने सामाजिक विषमतेच्या बाबतीत साकल्याने विचार करून त्याबाबतचा अहवाल देण्यासाठी व सामाजिक विषमता दूर करण्यासाठी करावयाच्या उपाय योजनांची

शिफारस करण्यासाठी श्री. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली एका आयोगाची स्थापना केली. त्यावर आयोगाने अभ्यास करून १९८२ मध्ये आपला अहवाल सादर केला होता. त्यामध्ये सरकारी नोकऱ्यांमध्ये व शिक्षण संस्थेमध्ये मागासवर्गीय जाती-जमातीसाठी आरक्षण ठेवावे अशी महत्त्वाची शिफारस केली होती. त्याची अंमलबजावणी झाली नव्हती. त्याची अंमलबजावणी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय १९९० मध्ये व्ही. पी. सिंग यांनी घेतला. त्याला उच्चवर्णीय जातींनी विरोध केला. उग्र व हिंसात्मक निदर्शने करण्यात आली. भा. ज. प. ने या निर्णयाला विरोध केला तसेच जनता दलातील एका गटाने ही त्याला विरोध केला. भा. ज. प. ने व्ही. पी. सिंग सरकारचा पाठिंबा काढला. त्यामुळे व्ही. पी. सिंग यांनी राजीनामा दिला. चंद्रशेखर यांनी काँग्रेसच्या पाठिंब्यावर सरकार स्थापन केले. ते पंतप्रधान झाले. अल्पावधित त्यांचे काँग्रेस पक्षाशी मतभेद झाले व काँग्रेस पक्षाने त्यांचा पाठिंबा काढून घेतला. चंद्रशेखर यांनी राजीनामा दिला. अशा प्रकारे भारतातील राष्ट्रीय आघाडीचे सरकार अल्पजीवी ठरले.

### ३.२.२ संयुक्त आघाडी (United Front)

१९९१ ते १९९५ या कालखंडात काँग्रेस पक्षाचे सरकार अस्तित्वात आले. १९९६ सालच्या अकराव्या लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा जनाधार मोठ्या प्रमाणात कमी झाला. या कालखंडात भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे घडली. ५४३ जागांपैकी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला १४०, भा. ज. प. ला १६१, जनता दलाला ४६, मा. क. प. ३२, भा. क. प. १२ जागा मिळाल्या. या निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष म्हणून अटलबिहारी वाजपेयी यांनी सरकार स्थापन केले. परंतु त्यांना विश्वासदर्शक ठराव जिंकता आला नाही. त्यामुळे त्यांनी राजीनामा दिला. हे सरकार फक्त तेरा दिवस टिकले. जनता दल व त्यांची आघाडी यांनी सरकार स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडला. जनता दलाला काँग्रेस पक्षाने पाठिंबा दिला. तसेच दोन्ही डाव्या पक्षांनी या सरकारला पाठिंबा दिला. जनता दलाचे एच. डी. देवेगौडा पंतप्रधान झाले. या सरकारला सतरा पक्षांचा पाठिंबा होता. हे सरकार संयुक्त आघाडीचे सरकार होते. या सर्व राजकीय पक्षांच्या एकसूत्रीकरण समितीचे अध्यक्ष चंद्राबाबू नायडू होते. पंतप्रधान देवेगौडा व काँग्रेसचे अध्यक्ष सिताराम केसरी यांचे मतभेद झाले. त्यांनी या सरकारचा पाठिंबा काढून घेतला. त्यानंतर संयुक्त आघाडी व काँग्रेस यांच्यातील वाटाघाटीनंतर आय. के. गुजराल यांच्या नेतृत्त्वाखाली सरकार स्थापन झाले. या सरकारला काँग्रेसने बाहेरून पाठिंबा दिला. तथापि, पुन्हा राजीव गांधींच्या हत्येच्या बाबतीतील अहवाल सादर करण्यासाठी जो जैन आयोग स्थापन केला होता त्याने तात्पुरत्या अहवालातील काही भाग प्रसिद्ध केला. त्यामध्ये तामिळनाडूमधील डी. एम. के. बाबत काही आक्षेपार्ह विधाने होती. काँग्रेसचे अध्यक्ष सीताराम केसरींनी संमिश्र सरकारमधून डी. एम. के. ला काढून टाकण्याची मागणी केली. परंतु पंतप्रधान गुजराल व संयुक्त आघाडीचे नेते चंद्राबाबू नायडू या दोघांनीही ही मागणी मान्य केली नाही. त्यामुळे काँग्रेसने अविश्वास ठराव मांडला त्यास भा. ज. प. ने पाठिंबा दिला व गुजराल यांना राजीनामा द्यावा लागला.

अशा प्रकारे देशामध्ये १९८९ नंतर भा. ज. प., काँग्रेस व डावे पक्ष यांच्या पाठिंब्यावरच आघाडीचे प्रयोग झाले. त्यांना वगळून हे प्रयोग यशस्वी झाले नाहीत. आघाडी सरकारने आपल्या कालखंडात कृषी विकास, असंघटीत कामगारांना न्याय, सत्तेचे विकेंद्रीकरण, राज्यांना स्वायत्तता, मागास जातीला आरक्षण,

कलम ३५६ च्या वापरावर निर्बंध, दारिद्र्य निर्मूलन, भूमीसुधार इत्यादी प्रश्नांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. शेतकरी, इतर मागास जाती, कामगार, भूमीहीन इत्यादी घटक आघाडीचा पाय होता, परंतु आघाडीचा पर्याय अल्पकाळ ठरला. देशातील प्रमुख राष्ट्रीय पक्ष वर्चस्वाखाली बनल्यामुळे आघाडीच्या पर्यायाला मर्यादा आहेत.

### ३.२.३ राष्ट्रीय लोकशाही आघाडी (National Democractic Alliance) :

१९९६ च्या ११ व्या लोकसभेच्या निवडणुकीत भा. ज. पा. ला १६१ जागा मिळाल्या. सर्वांत अधिक जागा मिळवणारा पक्ष म्हणून हा पक्ष भारतीय राजकारणात पुढे आला. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्त्वाखाली सरकार स्थापन केले. परंतु या सरकारला विश्वासदर्शक ठराव जिंकता आला नाही. त्यामुळे हे सरकार तेरा दिवसात सत्तेवरून गेले. १९९६ च्या सरकारचा अनुभव लक्षात घेऊन भा. ज. पा. ने आपली राजकीय रणनिती बदलली. यातूनच राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा उदय झाला. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या राजकारणाचे दोन टप्पे पाडता येतील.

**(१) राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा पहिला टप्पा (१९९८ ते २०१४) :**

भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांनी चाणाक्षपणे अनेक घटकपक्षांना एकत्र करून आघाडी स्थापन करण्याचा निर्णय घेतला. भाजपच्या कार्यक्रम पत्रिकेतील हिंदुत्त्वाचा भाग वगळण्याचे ठरविले, ते म्हणजे रामजन्मभूमी, काश्मिर बाबातचे ३७० वे कलम, समान नागरी कायदा हे मुद्दे बाजूला ठेवून भा. ज. पा. ने अकाली दल, अण्णाद्रमूक, तृणमूल काँग्रेस, समता पक्ष, बिजू जनता दल व शिवसेना या पक्षांचा पाठिंबा मिळवला. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीची स्थापना १९९८ मध्ये केली. १९९८ च्या निवडणुकीत रा. लो. आ. निवडणुकीला सामोरी गेली. या निवडणूकीत २५५ जागा रा. लो. आ. ला मिळाल्या व चंद्राबाबू नायडू यांच्या तेलगू देसमशी आघाडी करून राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे पहिले सरकार स्थापन झाले व अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान झाले. जयललिता यांनी या सरकारचा पाठिंबा काढून घेतला. तेरा महिन्यात हे सरकार बरखास्त झाले.

तेराव्या लोकसभेची निवडणूक जाहीर झाली. या निवडणूकीपूर्वी भारत-पाकिस्तान यांच्यात कारगील युद्ध झाले. त्याचा फायदा रा. लो. आ. ला झाला. दरम्यानच्या कालखंडात शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. त्यामुळे काँग्रेस विरोधी वातावरण देशात तयार झाले होते. सप्टेंबर १९९९ मध्ये झालेल्या निवडणुकीत द्रमूक, एम. डी. एम. के., पी. एम. के. तेलगू देसम, संयुक्त जनता दल, शिवसेना, लोकजनशक्ती यांच्या पाठिंब्याने रा. लो. आ. ला ३०२ जागा मिळाल्या व काँग्रेस पक्षाचा मोठा पराभव झाला. भा. ज. प. ला १८२ जागा मिळाल्या. रा. लो. आ. तील व देशातील सर्वांत मोठा पक्ष म्हणून रा. लो. आ. च्या पाठिंब्यावर अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान झाले व लालकृष्ण अडवाणी हे गृहमंत्री झाले. आडवाणी व नवे मानवसंसाधन मंत्री डॉ. मुरलीमनोहर जोशी यांनी या सरकारमध्ये हिंदुत्त्ववादी कार्यक्रम प्रत्यक्षात राबवण्यास सुरुवात केली. त्या दृष्टीने धोरणे आखली. भा. ज. प. च्या ध्येयधोरणाचा प्रभाव रा. लो. आ. आघाडीवर झाला.

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे पहिल्या टप्प्यातील ध्येय धोरण –

१) भारताला जगातील एक बलवान देश बनवण्यासाठी अण्वस्त्रे तयार करणे. त्यासाठी संरक्षणावरील खर्चात वाढ करणे. नवी शस्त्रास्त्रे मिळवण्यासाठी अमेरिका व इस्राईल यांच्याकडे शस्त्रास्त्रांची मागणी करणे.

२) परराष्ट्र धोरणात अलिप्तवादी चळवळ व तिसऱ्या जगाच्या एकतेचे विचार न करता अमेरिकेच्या प्रभाव क्षेत्रात सामील होऊन पाकिस्तानवर दबा टाकणे, यामुळे भारत–अमेरिका संबंधात सुधारणा झाली.

३) आर्थिक धोरणाच्या संदर्भात उदारीकरणाचे धोरण स्विकारले. त्यामुळे परकीय भांडवलशाही गुंतवणूक वाढली.

४) राष्ट्रीय रस्ते योजना यांचे विकास करणे.

५) भारतात आय. टी. क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ करणे.

६) महिलांसाठी लोकसभा व विधानसभामध्ये ३३ टक्के जागा राखीव ठेवणे.

७) भूक, भय, भ्रष्टाचार, यापासून जनतेला मुक्त करणे. भ्रष्टाचाराच्या निर्मूलनासाठी लोकपाल विधेयक मंजूर करणे.

८) केंद्र–राज्य संबंधांच्या पुनर्बांधणीसाठी राज्यांना अधिक स्वायत्तता देणे व छोटी राज्य स्थापन करणे याचाच एक भाग महणून झारखंड, छत्तीसगड व उत्तरांचल यासारख्या लहान राज्यांची स्थापना केली.

अशा प्रकारे देशातील आघाडी सरकारच्या कालखंडातील सर्वांत जास्त चालणारे सरकार म्हणून याकडे पाहिले जाते. यात महत्त्वाची भूमिका अटलबिहारी वाजपेयी यांची होती. त्यांच्या समन्वयवादी नेतृत्त्वामुळे ते यशस्वी झाले.

सन २००४ च्या १४ व्या लोकसभा निवडणुकीला सामोरे जात असताना रा. लो. आ. सरकार सहा महिने मुदतपूर्व बरखास्त केले. हा निर्णय मित्रपक्षावर भा. ज. प. ने लादला. देशात आर्थिक विकासामुळे ‘फील गुड’चे वातावरण आहे, सर्व क्षेत्रात भारताने दैदिप्यमान प्रगती केल्यामुळे इंडिया शाईन होत आहे. भारताची आता महासत्ता बनवण्याच्या दिशेने वाटचाल होत आहे. रा. लो. आ. सरकारने पाकिस्तानशी संबंध सुधारण्यास पुढाकार घेतला आहे. त्यामुळे निवडणूकीनंतर भारत–पाक संबंध सुधारतील अशा विविध मुद्द्यांच्या आधारे रा. लो. आ. निवडणुकीला सामोरी गेली. परंतु यामध्ये त्यांचा पराभव झाला. रा. लो. आ. ला १८८ जागा मिळाल्या. काँग्रेसने नविन आघाडी करून निवडणूक जिंकली. याचे कारण म्हणजे विभिन्न जातीसमुदायांचा काँग्रेसला पाठिंबा, दलित, आदिवासी आणि मुस्लीम यांचा पाठिंबा काँग्रेसला मिळाला. सन २००४ च्या पराभवानंतर रा. लो. आ. ने आघाडी कायम ठेवण्याचा निर्णय घेतला. या निवडणुकीनंतर अटलबिहारी वाजपेयी यांचे नेतृत्त्व संपुष्टात आले व भा. ज. प. ची सर्व सूत्रे लालकृष्ण अडवाणी यांच्या हाती आली. त्यांच्या नेतृत्त्वाखाली रा. लो. आ. ने २००९ ची लोकसभा निवडणूक लढविली. देशामध्ये मनमोहन सिंग सरकारची समाधानकारक कामगिरी, सामान्य नागरिकांसाठी राबविलेल्या

विविध योजना, शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी, शेतीमालाला दर, मनरेगा यासारख्या योजना यामुळे रा. लो. आ. २००९ लोकसभा निवडणूकीतही पराभूत झाली.

**(२) राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा दुसरा टप्पा (२०१४ ते २०१९) :**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीला १४ व्या व १५ व्या लोकसभेत मोठ्या प्रमाणात अपयश आले. वाजपेयी व आडवाणींचे नेतृत्त्व संपुष्टात आले. मार्च २०१३ मध्ये भा. ज. प. ने नरेंद्र मोदी यांना भा. ज. प. संसदीय समितीचे सदस्य म्हणून निवडले आणि पक्षाच्या प्रचार मोहिमेचे प्रमुख म्हणून त्यांच्या नावाची घोषणा केली. निवडणूक मोहिमा राबविण्यासाठी पक्षाने बारा सदस्यीय समिती स्थापन केली. त्यामध्ये आडवाणी यांना वगळण्यात आले. आक्रमक हिंदुत्त्वाचा चेहरा असणाऱ्या मोदींनी प्रचाराची सूत्रे हाती घेताच सूत्रबद्ध योजना आखायला सुरुवात केली. संपूर्ण पक्ष आपल्या वर्चस्वाखाली आणला. सप्टेंबर महिन्यात पक्षाने नरेंद्र मोदी हेच पंतप्रधानपदाचे उमेदवार असतील असे जाहीर केल्यावर भा. ज. प. प्रणीत रा. लो. आ. च्या प्रचाराला वेग आला. भा. ज. प. चे नेतृत्त्व हेच रा. लो. आ. चे नेतृत्त्व निवडले. सन २०१४ च्या निवडणुकीमध्ये भा. ज. प. ने अनेक मित्र पक्षांना रा. लो. आ. मध्ये समाविष्ट केले. त्यामध्ये महाराष्ट्रातून राजू शेट्टी यांचा स्वाभिमानी पक्ष, महादेव जानकर यांचा राष्ट्रीय समाज पक्ष, रामदास आठवले यांचा रिपब्लिकन पक्ष अशा अनेक छोटे-मोठे पक्ष सर्व राज्यातून आघाडीत समाविष्ट झाले. यामध्ये प्रामुख्याने शिवसेना, तेलगू देसम, लोकजनशक्ती, शिरोमणी अकाली दल, राष्ट्रीय लोकसमता पक्ष, जम्मू आणि काश्मिर पिपल्स डेमोक्रेटिक पक्ष, अपना दल, ऑल इंडिया एन. आर. काँग्रेस, नागालँड पिपल्स फ्रंट, पत्राली मक्कल कच्छी अशा प्रकारचे बारा पक्ष राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सत्तेमध्ये सामील झाले. भा. ज. प. ने या निवडणूकीत ४२८ जागा लढवल्या त्यापैकी २८२ जागा जिंकल्या. १९८९ नंतर पूर्ण बहुमत मिळवणारा एकमेव पक्ष म्हणून भा. ज. प. पक्ष पुढे आला. तरीही भा. ज. प. ने रा. लो. आ. तील मित्रपक्षांना सत्तेत सहभागी करून घेतले. यामध्ये लोकजनशक्ती पक्ष, शिवसेना, रिपब्लिकन पक्ष (आठवले) यासारख्या प्रादेशिक पक्षांना सत्तेत सहभागी करून घेतले. त्यामुळे रा. लो. आ. चे संख्याबळ ५४३ पैकी ३३६ झाले. या सर्व प्रादेशिक पक्षाचा फायदा भा. ज. प. ला विधानसभा निवडणूकीला झाला.

रा. लो. आ. चे नेते म्हणून नरेंद्र मोदी यांनी या निवडणुकीत रणनीती आखली. त्यांनी पक्षसंघटना मजबूत करून आक्रमक प्रचार केला. सोशल मीडियाचा व माहिती तंत्रज्ञानाचा वापर प्रचारात केला. काँग्रेसची प्रचार मोहिम त्यामानाने विस्कळित होती. या निवडणुकीत पंतप्रधानपदाचा उमेदवार त्यांनी अगोदर जाहीर केला होता. त्यामानाने संयुक्त पुरोगामी आघाडीचा उमेदवार निश्चित नव्हता. मनमोहन सिंग सरकारच्या कालखंडात मोठ्या प्रमाणात टू जी घोटाळा, कोळसा घोटाळा सारखे अनेक घोटाळे झाले होते. त्याचा फायदा रा. लो. आ. ला झाला. यापूर्वीच्या निवडणूकीत भा. ज. प. ने इतर मागास जातींना आपल्या पक्षाकडे वळवले होते. आता त्या पक्षाने दलित, आदिवासी या समाजातही स्थान निर्माण केले. हे स्थान नव्या हिंदू विचारांच्या आधारे केले जात आहे. नेहरू प्रणीत भारताच्या कल्पनेस आव्हान दिले जात आहे. त्याला उत्तर देण्याचे आव्हान यु. पी. ए. पुढे आहे. नरेंद्र मोदींनी या निवडणुकीत पुढील पंचसूत्राचा अवलंब केला. यामध्ये उद्योग क्षेत्राची मैत्री, आर्थिक स्वायत्तता, शेती आणि उद्योग या दोन क्षेत्रामध्ये समझोता,

विकासाचा पाझरणी सिद्धांत आणि ओबीसींची राजकीय भागिदारी या सूत्राचा अवलंब केला. यामुळे रा लो आ ला मोठ्या प्रमाणात यश आले.

१७ व्या लोकसभा निवडणुकीतही भाजपप्रणीत रा लो आ ला मोठा विजय मिळाला. या आघाडीला ३५३ जागा मिळाल्या. भा. ज. प. च्या जागा २१ ने वाढल्या. रा लो आ ला एकूण शेकडा ४४.६% मते मिळाली. २०१४ च्या निवडणुकीपेक्षा शेकडा सात टक्क्यांनी वाढली. रा लो आ ला उत्तर भारत व प. भारतात मोठा विजय मिळाला. त्या मानाने दक्षिण भारतात कर्नाटक वगळता पाठिंबा मिळाला नाही. रा लो आच्या यशाची कारणमीमांसा अभ्यासताना असे लक्षात येते की, बालाकोटवर अतिरेक्यांच्या तळावर भारताने जो हल्ला केला त्याचा फायदा झाला. या कालखंडात हिंदू-मुस्लीम ध्रुवीकरण झाले असले तरी काही मुस्लीम मतांचा पाठिंबा मिळाला. सरकारने सार्वजनिक योजनेपेक्षा व्यक्तिगत कल्याणकारी योजनेवर भर दिला. उज्ज्वला गॅस योजना, पंतप्रधान आवास योजना, स्वच्छ भारत योजना, पंतप्रधान जनआरोग्य योजना, ग्रामीण विद्युतीकरण अशा कल्याणकारी योजनांचा लाभ घेणाऱ्या मतदारांची संख्या वाढली. हिंदू व्होट बँकेच्या व्यतिरिक्त एक मोठा मतदार मिळवण्यासाठी भा. ज. प. यशस्वी झाला. त्या मानाने रा लो आच्या कालखंडातील विविध योजनांचे अपयश जनतेपुढे आणण्यास काँग्रेस अपयशी ठरली. प्रधानमंत्री फसल योजना, नोटाबंदी, जी. एस. टी. इत्यादी. योजना अपयशी ठरल्या आहेत.

१७ व्या लोकसभेनंतर एन.डी.ए.तील अनेक पक्ष एन.डी.ए. सोडून गेले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने नितीश कुमार, उद्धव बाळासाहेब ठाकरे सेना, अकाली दल इत्यादी पक्षांचा समावेश होतो. २०२४ मध्ये होणाऱ्या १८ व्या लोकसभेसाठी एन.डी.ए. ची पुनःबांधणी मोदी व शहा यांनी सुरू केली. त्यांनी त्यांच्या मित्रपक्षांची बैठक ऑगस्ट २०२३ मध्ये दिल्ली येथे घेतली व त्यांच्याशी २०२४ च्या लोकसभा निवडणुकी बाबत चर्चा केली. २०१९ ते २०२४ च्या कालखंडात मध्यमवर्गीय लोक शेतकरी, सुशिक्षीत बेरोजगार हे एन.डी.ए. च्या राज्यकारभारावर नाराज असल्याचे प्रसार माध्यमातून दिसून येते. या सर्व लोकांची नाराजी मोदी सरकार कोणत्या विकासातून दूर करतात यावर एन.डी.ए.चे यश अवलंबून आहे. तसेच विरोधी I.N.D.I.A. आघाडील २६ पक्षांनी मोठे आव्हान एन.डी.ए. पुढे उभा केले आहे ते आव्हान मोदी-शहांची जोडी कसे पेलते यावर त्यांचे यश अवलंबून आहे.

**स्वयंअध्ययन प्रश्न – १ :**

रिकाम्या जागा भरून पुन्हा लिहा.

१) राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे प्रथम पंतप्रधान ................ हे होते.

२) १६ व्या लोकसभेत भारतीय जनता पक्षाला ................ जागा मिळाल्या.

३) ................ साली राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार स्थापन झाले.

### ३.२.४ संयुक्त पुरोगामी आघाडी (United Progressive Alliance) :

स्वातंत्र्यानंतर देशावर काँग्रेस पक्षाची १९७७ सालापर्यंत एकपक्षीय राजवट होती. त्यानंतर १९७७ ते ८० हा कालखंड वगळता १९८९ पर्यंत काँग्रेस पक्षाचे वर्चस्व होते. १९८९ नंतर काँग्रेसचे वर्चस्व कमी झाले. १९९६ पासून काँग्रेसत्तर पक्षाचे सरकारे अस्तित्वात आले. १९९८ साली अटलबिहारी वाजपेयी यांनी रा लो आचे आघाडी सरकार यशस्वी करून दाखवले. त्यामुळे भारतीय राजकारणात आघाडी सरकारे स्थिर होऊ लागली.

काँग्रेस पक्षाचे सुरुवातीचे धोरण स्वत:च्या बळावर सरकार स्थापन करण्याचे होते. परंतु नंतरच्या काळात आघाडीच्या राजकारणाची अपरिहार्यता पक्षाच्या लक्षात आली. काँग्रेसस पक्षाने पंचमढी अधिवेशनात आघाडी करण्याचा पक्षाचा निर्णय झाला. २००३ नंतर विविध पक्षाच्या आघाड्या करून एन. डी. ए. ला शह देण्याचा निर्णय घेतला. २००४ साली सोनिया गांधी यांच्या नेतृत्त्वाखाली संयुक्त पुरोगामी आघाडीची स्थापना केली. यामध्ये काँग्रेसने समकक्ष विचारांच्या धर्मनिरपेक्ष पक्षांशी आघाडी केली. त्यामध्ये प्रामुख्याने तामिळनाडूत द्रमूक, तेलंगणा राष्ट्रसमिती, महाराष्ट्रात रिपब्लिकन पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, बिहारमध्ये राजद तर झारखंड मुक्ती मोर्चा, जम्मू काश्मीरमध्ये पी. डी. पी. शी काँग्रेस आघाडी झाली. या निवडणुकीत रा. लो. आतील अनेक नेत्यांनी सोनियांच्या हिंदी भाषणाची चेष्टा केली. त्यांच्यावर असभ्य भाषेत टिका केली. यामध्ये प्रामुख्याने नरेंद्र मोदी, विनय कटियार, प्रमोद महाजन, बाळासाहेब ठाकरे व उमा भारती हे नेते आघाडीवर होते. प्रसिद्ध माध्यमांनी भा. ज. प. चा प्रचार केला. जनमत चाचण्यांनी रा. लो. आ. ला सत्ता मिळेल असा अंदाज व्यक्त केला. याउलट काँग्रेसचा प्रचार शांतपणे चालू होता. बेरोजगारी, भ्रष्टाचार, अकार्यक्षमता, जातियवाद, जातीयदंगली आणि धर्मनिरपेक्षता या विषयाकडे लोकांचे लक्ष वेधले. फील गुड व इंडिया शायनिंग घोषणा कशा चुकीच्या आहेत हे सांगितले. यु. पी. ए. चे प्रमुख सोनिया गांधी मुख्य प्रचारक होत्या. त्यांनी या काळात ३०० मतदारसंघात ६४,००० किलोमीटर प्रवास केला.

या निवडणुकीचा निकाल सर्वांनाच धक्कादायक ठरला. त्यात रालोआचा मोठा पराभव झाला. यु. पी. ए. ला २१७ जागा मिळाल्या व डाव्या पक्षांना ६४ जागा मिळाल्या. डावपेच, समाजवादी पक्ष व बहुजन समाज पक्षाने यु. पी. ए. ला बाहेरून पाठिंबा दिला. डॉ. मनमोहन सिंग देशाचे पंतप्रधान झाले. चौदा राजकीय पक्षांचे संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार सत्तेवर आले. या निवडणूकीत काँग्रेसला जागांचा फारसा लाभ मिळाला नाही. फक्त पाच जागा जास्त मिळाल्या. त्यांचे संख्याबळ १४५ एवढे झाले. यु. पी. ए. ची संख्या ३२५ झाली. सोनिया गांधी यांनी या सरकारचे पंतप्रधान पद स्वीकारण्यास नकार दिला. रा. लो. आ. ने सोनिया गांधी यांना निवडणूक कालखंडात पंतप्रधानपदाबाबत मोठा विरोध केला. परंतु सोनिया गांधींच्या निर्णयाने त्यांचे लोकमत वाढले. मनमोहन सिंगांना हे सरकार चालवण्याचे मोठे आव्हान होते, अशा प्रकारे सरकार चालवण्याचा काँग्रेसचा पहिला अनुभव होता. आघाडी सरकार चालवण्यासाठी उदार मानसिकता व लवचिकता आणि अंतर्गत लोकशाही या बाबी असणे गरजेचे असते.

यु. पी. ए. सरकारच्या पुढे अनंत अडचणी होत्या. त्यामध्ये प्रमुख्याने भारताच्या परराष्ट्रधोरणावर अमेरिकेचा जो प्रभाव पडलेला होता तो कमी करून त्यांच्याशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवणे, जम्मू काश्मीर समस्या सोडविणे तसेच लालूप्रसाद यांच्या दबावामुळे काही गुन्हेगार मंत्रीमंडळात व संसदेत खासदार होते. त्यातून यु. पी. ए. सरकारने किमान समान कार्यक्रम तयार केला. तो पुढीलप्रमाणे आहेत –

१) सामाजिक एकात्मता संरक्षित करणे.

२) सर्वसाधारणपणे वार्षिक ७ ते ८ टक्के वृद्धीदर प्राप्त करून वाढत्या प्रमाणात रोजगार निर्माण करणे.

३) शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारणे.

४) स्त्रियांना सक्षम करणे.

५) मागासवर्गीय व दलितांची परिस्थिती सुधारणे.

६) अर्थव्यवस्थेतील सर्व उत्पादक शक्ती मुक्त करणे.

७) ग्रामीण भागात रोजगार हमी योजना राबविणे.

८) सार्वजनिक अन्नवितरण व्यवस्था राबविणे व भारतातील प्राथमिक शाळेत पौष्टिक आहार योजना सुरू करणे इत्यादी धोरणांचा समावेश केला.

अशा प्रकारच्या योजना यु. पी. ए. ने ठरविल्या त्या यशस्वी करण्यात डॉ. सिंग यशस्वी झाले.

यु. पी. ए. सरकारच्या १५ व्या लोकसभेच्या कालखंडाच्या विश्लेषणाचा विचार करता काही महत्त्वाची वैशिष्ट्ये अभ्यासता येतील. यु. पी. ए. सरकारच्या कालखंडात मोठ्या प्रमाणात जागतिक आर्थिक महामंदी आली होती. परंतु डॉ. मनमोहन सिंग यांनी आपल्या अभ्यासपूर्ण योजना विकासातून देशाची अर्थव्यवस्था स्थिर ठेवली. मनरेगा, शेतकऱ्यांची कर्जमाफी, आरोग्य योजना या सामान्य माणसाला आधार देणाऱ्या योजना यशस्वी झाल्या. या निवडणूकीत प्रादेशिक पक्षांच्या जागा कमी झाल्या. काँग्रेस पक्षाच्या जागा ४२% वाढल्या. यामध्ये काँग्रेसने विविध पक्षांशी अचूक आघाडी केली. ज्या ठिकाणी काँग्रेसची सत्ता होती, उदा. राजस्थान, दिल्ली, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, आसाम, झारखंड, जम्मू काश्मीर, हरियाणा या ठिकाणी काँग्रेसला यश मिळाले. काँग्रेसला देशभर दलित, आदिवासी आणि मुस्लीम व मागास जातीमधून मोठा पाठिंबा मिळाला. काँग्रेस पक्षापासून दूर गेलेला समूह काँग्रेस आपल्याकडे वळवण्यात यशस्वी झाली. त्यातून काँग्रेसला २०६ जागा मिळाल्या. सोळा राजकीय पक्षांचे संयुक्त पुरोगामी आघाडीचे सरकार डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्त्वाखाली सत्तेवर आले. अशा प्रकारे यु. पी. ए. सरकारने सलग दहा वर्ष आघाडी करून देशावर आपली सत्ता प्रस्थापित केली.

सोळाव्या लोकसभा निवडणूकीत यु. पी. ए. ची सूत्रे पक्षाध्यक्ष सोनिया गांधी आणि पक्षाचे नवीन महासचिव राहुल गांधी यांच्याकडे होती. यामध्ये राहुल गांधींचा निर्णयप्रक्रियेतील सहभाग मोठा होता. त्याचवेळी यु. पी. ए. सरकार विरोधी जनतेमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोषाची भावना वाढली होती. त्यामध्ये

भ्रष्टाचारविरोधी लोकभावना लक्षात घेऊन गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या व्यक्तींना निवडणुकीत उमेदवारी नाकारावी, हा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश निष्प्रभ ठरविणारा केंद्र सरकारचा वटहुकूम मागे घेण्यास भाग पाडले.

२०११ साली अण्णा हजारेंनी भ्रष्टाचारविरोधी आंदोलन सुरू केले आणि त्यास लोकांनी उत्स्फूर्त पाठिंबा दिला. त्यातच टूजी स्पेक्ट्रम घोटाळा, राष्ट्रकुल घोटाळा, कोळसा घोटाळा यासारखे अनेक घोटाळे यु. पी. ए. च्या काळात झाले. त्यामुळे सरकारची प्रतिमा मलीन झाली. मोदी लाट यशस्वी करण्यात प्रसार माध्यमांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. यु. पी. ए. सरकारच्या पाठीशी असलेला दलित, आदिवासी, मुस्लीम, मध्यमवर्गीय व आम आदमी दुरावला गेला. हिंदू धर्मामधील जातीचे हिंदुत्व एकसंघीकरण केले. त्यामुळे यु. पी. ए. ला या निवडणुकीत मोठे अपयश आले. काँग्रेसला फक्त ४४ जागा मिळाल्या. संपूर्ण यु. पी. ए. ला. ६० जागा मिळाल्या.

सतराव्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष राहुल गांधी झाले. त्यांना यु. पी. ए. घटक पक्षांमध्ये समन्वय साधता आला नाही. निवडणुकीपूर्वी वाढलेली बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, नोटाबंदीने निराश झालेला सामान्यवर्ग, जी. एस. टी. वर नाराज असलेला लघुउद्योजक व व्यापारी वर्ग हे मुद्दे जनतेपुढे मांडण्यात यु. पी. ए. अपयशी ठरली. मोदींच्या आक्रमक प्रचारापुढे यु. पी. ए. ची आक्रमक यंत्रणा नव्हती. राहुल गांधींनी एकाकी प्रचार केला. पक्षातील ज्येष्ठ नेत्यांनी साथ दिली नाही. राहुल गांधीने लाखो मैल प्रवास केला. १४२ सभा घेतल्या. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात 'चौकीदार चोर है।' हा प्रचार अपयशी ठरला. भा. ज. प. च्या राष्ट्रवादाविरुद्ध यु. पी. ए. ची राष्ट्रवादाची कल्पना लोकांपुढे मांडण्यात अपयश आले. काँग्रेसमधील गटबाजीचे राजकारण, घराणेशाही संघटनात्मक बांधणीचा अभाव, ढिसाळ प्रसार व प्रचार यंत्रणा यामुळे २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत यु. पी. ए. ला अपयश आले. काँग्रेसच्या जागा ४४ वरून ५२ झाल्या. यु. पी. ए. ला शेकडा २३% मते मिळाली. यु. पी. ए. ची मतांची टक्केवारी वाढली. त्याप्रमाणात जागांच्या संख्येत वाढ झाली नाही.

अशा प्रकारे यु. पी. ए. ला सोळाव्या व सतराव्या लोकसभेत मोठ्या प्रमाणात अपयश आले. त्यामुळे नव्याने पुनर्बांधणी करण्याचे आव्हान यु. पी. ए. आघाडीपुढे होते. यू.पी.ए. मधील राष्ट्रीय काँग्रेस हा प्रमुख पक्ष आहे. या पक्षाच्या पक्षीय अंतर्गत निवडणुका झाल्या. त्यामध्ये पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून मल्लीकार्जून खरगे यांची निवड झाली. राहूल गांधी यांनी कन्याकुमारी ते काश्मीर भारत जोडो यात्रा काढली. यामध्ये प्रत्येक राज्यात यू.पी.ए. चे अनेक पक्ष सामील झाले. या यात्रेमध्ये तरूण स्त्रिया, शेतकरी, कामगार, मध्यमवर्गीय असे सर्व घटकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. त्यामध्ये लोकांचे प्रश्न राहूल गांधी यांनी जाणून घेतले. त्यामुळे यू.पी.ए. च्या सर्व पक्षात उत्साह निर्माण झाला. यू.पी.ए. मध्ये आलेली मरगळ झटकून टाकण्याचे काम बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी केले. नितीश कुमार यांनी एन.डी.ए. बरोबरची आघाडी तोडली व बिहारमध्ये लालू प्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलाबरोबर युती केली व मुख्यमंत्री झाले. यू.पी.ए. आघाडीत सामील झाले. त्यांनी यू.पी.ए.ची पुनःबांधणी केली. देशातील भा.ज.प. विरोधी पक्षांच्या नेत्यांना भेटी दिल्या. त्यांच्याशी देशातील प्रमुख प्रश्नांवर चर्चा केली. व यू.पी.ए. ची बैठक पाटणा येथे घेतली. त्यामध्ये देशातील एकुण २६ पक्ष सामील झाले. त्यामध्ये प्रामुख्याने आम आदमी पक्ष,

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना, यासारखे नविन पक्ष सामील झाले. तद्नंतर यू.पी.ए. आघाडीची दुसरी बैठक झाली. त्यामध्ये भा.ज.प.च्या धोरणावर चर्चा झाली व यू.पी.ए. चे नाव बदलून I.N.D.I.A. आघाडी असे देण्यात आले.

I.N.D.I.A. आघाडीची तिसरी बैठक मुंबई येथे ऑगस्ट २०२३ रोजी झाली या बैठकीत १३ लोकांची समन्वय समिती स्थापन करण्यात आली. ही आघाडी भविष्यात कशा प्रकारे मोदी विरोधी प्रचान व प्रसारण करते यावर I.N.D.I.A. आघाडीचे यश अवलंबून आहे.

**स्वयंअध्ययन प्रश्न – २ :**

रिकाम्या जागा भरून पुन्हा लिहा.

१) १४ व्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला ............... जागा मिळाल्या.

२) १५ व्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला ................ जागा मिळाल्या.

३) यु. पी. ए. आघाडीची स्थापना ................ साली झाली.

## ३.३ पारिभाषिक शब्द :

१) रा. लो. आ. : राष्ट्रीय लोकशाही आघाडी

२) सं. पु. आ. : संयुक्त पुरोगामी आघाडी

३) आघाडी सरकार : सत्तेसाठी दोनपेक्षा अधिक पक्ष एकत्र येऊन सरकार तयार करणे.

## ३.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

स्वयंअध्ययन प्रश्न – १ :

उत्तरे : १) अटलबिहारी वाजपेयी २) २८२ ३) १९९८

स्वयंअध्ययन प्रश्न – २ :

उत्तरे : १) १४५ २) २०६ ३) २००४

## ३.५ सारांश :

सन १९८९ पासून केंद्रपातळीवर आघाड्यांची सरकारे सत्तेवर आली. अनेक राज्यांमध्ये एकापेक्षा अधिक पक्ष कधी निवडणूकीपूर्वी किंवा कधी निवडणुकांचे निकाल घोषित झाल्यावर आघाड्या करून सत्ता प्रस्थापित करतात. आघाड्यांचे राजकारण देशात स्थिरावले आहे. त्याची सुरुवात १९६७ च्या राज्यपातळीवर निवडणूकीनंतर झाली. आघाड्यांच्या राजकारणामुळे कार्यपालिकेचे कायदेमंडळाला असलेले उत्तरदायित्त्व आणि जबाबदारी अशक्य झाली आहे. कार्यकारी मंडळाला आपले काम कार्यक्षमपणे करणे कठीण झाले. कायदेमंडळातही प्रभावी कामकाजाचे प्रमाण कमी झाले आहे. या दोन शासनअंगाची

प्रभावक्षमता कमी झाल्यामुळे न्यायालयाचे पारडे जड झाले. त्यातून न्यायालयीन सक्रियतेच्या कक्षा विस्तारलेल्या दिसतात. १९८९ नंतर आघाड्याच्या सरकारमुळे राष्ट्रपतीची भारतीय राजकारणातील भूमिका अधिक महत्त्वाची ठरली. देशाच्या राजकारणात अटलबिहारी वाजपेयी यांनी स्थापन केलेली राष्ट्रीय लोकशाही आघाडी १९९८ च्या निवडणुकीत यशस्वी करून दाखविली. त्यांनी आपल्या सरकारचा कालखंड पूर्ण केला. आघाडी सरकारे चालवण्यासाठी समन्वय साधणारे, लवचिक, अनुभवी, मुत्सद्दी नेतृत्त्व असणे आवश्यक आहे. १९९८ नंतर देशाच्या राजकारणात राष्ट्रीय लोकशाही आघाडी व संयुक्त पुरोगामी आघाडी अशा दोन स्वतंत्र विचारांच्या आघाड्या स्थिरावलेल्या दिसतात. त्यातील अनेक प्रादेशिक पक्ष आपल्या हितसंबंधानुसार आघाडी बदलताना दिसतात. जेव्हा कोणत्याही पक्षाला बहुमत मिळणार नाही तेव्हा आघाडी सरकार हाच एकमेव पर्याय आहे.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय :

दिर्घोत्तरी प्रश्न –

१) राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे विश्लेषण करा.

२) संयुक्त पुरोगामी आघाडीची सविस्तर चर्चा करा.

३) भारतीय राजकारणातील तिसरी आघाडीचे विश्लेषण करा.

## ३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) भोळे भा. ल. : 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण', पिंपळापुरे प्रकाशन, बुक डिस्ट्रिब्युटर्स, नागपूर. (सप्टेंबर २०१२).

२) पळशीकर सुहास : 'राजकारणाचा ताळेबंद', भारतीय लोकशाहीची वाटचाल, साधना प्रकाशन, पुणे (२०१३).

३) व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास : 'भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार', डायमंड पब्लिकेशन, पुणे (२०१०).

४) चौसाळकर अशोक (संपा.): 'भारतीय राजकारण मर्म आणि वर्म', लोकवाङ्मय गृह, मुंबई (२०१५).

५) पळशीकर सुहास, कुलकर्णी सुहास : 'महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष', समकालीन प्रकाशन, पुणे (२०११).

६) प्रधान ग. प्र. : 'भारतीय राजकारणाचे दोन पैलू – लोकशाही आणि समाजवाद', साधना प्रकाशन, पुणे (२००८).

७) पवार प्रकाश : 'काँग्रेसपुढील आव्हाने आणि भाजपचा उदय', डायमंड पब्लिकेशन, पुणे (२०१६).

८) पाटील बी. बी. : 'भारतीय शासन आणि राजकारण', फडके प्रकाशन, कोल्हापूर (२०१६).

९) चौसाळकर अशोक (संपा.) : 'समाजप्रबोधन प्रत्रिका', अंक एप्रिल-जून २००९, जाने-मार्च २०१४. एप्रिल-जून २०१४, जाने-मार्च २०१५, एप्रिल-जून २०१६, जाने.-मार्च २०१९, प्रकाशन - सचिव समाज प्रबोधन संस्था, पुणे.

१०) आचार्य शांताराम गरूड (संपा.) कुलकर्णी प्रसाद (सह. संपा.): प्रबोधन प्रकाशन ज्योती, ऑक्टो-नोव्हें. २०१३, जून २०१४, फेब्रुवारी २०१९, मे २०१९, जून २०१९. समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी.

११) डॉ. सप्तर्षी कुमार (संपा.) : 'सत्याग्रही विचारधारा', अंक जून २०१९, जुलै २०१९, पुणे.

१२) शिरसाठ विनोद (संपा.) : 'साधना साप्ताहिक', ८ जून २०१९, पुणे.

❑❑❑

# घटक ४
# भारतीय जनता पार्टीची भारतातील एक पक्षीय व्यवस्था
## (BJP one Party System in India)

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

४.२.१ भारतीय जनता पक्षाचा उदय आणि विकास

४.२.२ भारतीय जनता पक्ष आणि सहयोगी पक्षांचा इतिहास (शिवसेना, अकाली दल)

४.२.३ सन २०१४ च्या नंतर भारतीय जनता पक्षाचा एकपक्षीय व्यवस्था म्हणून झालेला उदय

४.२.४ भारतीय जनता पक्षाचा राज्य पातळीवर होणारा प्रसार आणि विकास

४.३ पारिभाषिक शब्द

४.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ४.० उद्दिष्ट्ये :

भारताच्या लोकशाही प्रक्रियेध्ये राजकीय दबावगट आणि संसदबाह्य राजकीय संघटना यांना महत्त्वाचे स्थान आहे. या घटकामध्ये आपणाला भारतातील राजकीय पक्षांधील भारतीय जनता पार्टी या राजकीय पक्षाचा विशेष अभ्यास करावयाचा आहे.

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

- भारतातील पक्षपद्धतीचे स्वरूप समजेल व वैशिष्ट्ये सांगता येतील.
- भारतीय जनता पक्षाचा उदय, त्याची वाढ व त्यामध्ये झालेले विविध बदल याचा अभ्यास करता येईल.
- भाजपाला लाभलेले नेतृत्त्व आणि त्यांनी आपल्या प्रभावातून भाजपाला राष्ट्रीय राजकारणात सर्वात मोठा पक्ष म्हणून मिळवून दिलेली मान्यता यांची चर्चा करता येईल.

- भारतीय जनता पार्टीच्या नेत्याच्या नेतृत्त्वागुणाचा अभ्यास करता येईल.
- राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील सर्वात मोठा पक्ष म्हणून भाजपाची राहिलेली भूमिका अभ्यासता येईल.
- राष्ट्रीय राजकारणातील भारतीय जनता पार्टीच्या वाटचालीची माहिती घेता येईल.
- नरेंद्र मोदींच्या नेतृत्त्वाचा अभ्यास करता येईल.
- भाजपाच्या विचारधारेंचा आणि ध्येयधोरणाची माहिती घेता येईल.

## ४.१ प्रस्तावना :

भारतीय पक्षपद्धतीचे वर्गीकरण कोणत्याही विशिष्ट प्रकारात करणे ही अत्यंत अवघड बाब आहे. पाश्चिमात्त्य देशामध्ये आढळणाऱ्या कोणत्याच प्रकारच्या चौकटीमध्ये इथली पक्ष व्यवस्था बसू शकत नाही. पाश्चात्त्य राजकीय संस्था जरी भारतीय घटनाकारांनी स्वीकारल्या असल्या तरी त्या संस्थाच्या बरोबर त्या देशांध्ये विकसित झालेल्या परंपरा, पद्धती व संकेत ते इथे आणू शकले नाहीत. ब्रिटनमध्ये ज्या पद्धतीने सामाजिक वातावरण होते, त्या परिस्थितीत तिथे राजकीय पक्ष तयार झाले, परंतु भारतामध्ये तशा पद्धतीची समाज व्यवस्था अस्तित्वात नाही. ज्या पद्धतीने पाश्चिमात्त्य समाज एकधर्मीय, एकभाषिय आहे तसा भारतीय समाज वेगवेगळ्या धर्म, पंथ, भाषा, संस्कृती इत्यादीमध्ये विभागला गेला आहे. या सर्वांचा परिणाम भारतामधील पक्षरचनेवर झालेला आहे म्हणून भारतामध्ये बहुपक्ष पद्धती आढळते.

प्रस्तुत प्रकरणात आपण भारतामधील प्रमुख राजकीय पक्ष भारतीय जनता पार्टी या पक्षाच्या संदर्भात विस्तृत विवेचन करणार आहोत.

## ४.२ विषय विवरण :

### ४.२.१ भारतीय जनता पक्षाचा उदय आणि विकास (Origin and development of BJP) :

या पक्षाचे मुळ हे जनसंघ या पक्षात आढळते. जनसंघ या पक्षाचा आधुनिक अवतार म्हणजे भारतीय जनता पक्ष होय.

**जनसंघ :**

दि. ८ एप्रिल १०५० रोजी नेहरू-लीयाकत करार झाला. त्यान्वये ठरले की, पाकिस्तानातील अल्प संख्याकांबाबत भारत सरकार कोणताच ब्लफ सांगू शकणार नाही. सरकारची ही भूमिका न आवडून डॉ. श्यामप्रसाद मुखर्जींनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला आणि २१ ऑक्टोबर, १९५१ रोजी दिली येथे राज्याराज्यातून आलेल्या ५०० प्रतिनिधींसमोर त्यांनी जनसंघ या नव्या पक्षाची स्थापना जाहीर केली. या पक्षाची भूमिका स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, जनता पिडित आणि निराश असताना त्या जनतेच्या अडचणी सोडविणे तर दूरच त्या ऐकूनही घ्यायला काँग्रेस सरकार तयार नाही. काँग्रेस सरकारच्या हुकूमशाही वृत्तीवर अंकुश चालविणारा समर्थ विरोधी पक्ष आज अस्तित्वात नाही. काँग्रेसची धोरणे भारताला

विघटनाकडे नेत आहेत. आज अशा एका नव्या अखिल भारतीय राजकीय पक्षाची आवश्यकता आहे, जो देशाला एक नवीन कार्यक्रम, नवीन आदर्श व अधिक सामर्थ्याचा मंत्र देवू शकेल.

भारतीय जनसंघामध्ये श्यामप्रसाद मुखर्जी बरोबरच बलराज मघौक, दिनदयाल उपाध्याय, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी इत्यादी नेते सहभागी झाले होते. १९२५ मध्ये स्थापन झालेल्या राष्ट्रीय स्वयं सेवक संघ या संघटनेची राजकीय शाखा म्हणजे 'जनसंघ' हा राजकीय पक्ष असे म्हटले जात होते. आज जनसंघ या पक्षाची जागा भारतीय जनता पार्टी या पक्षाने घेतलेली आहे. म्हणजेच असे म्हणावे लागेल की, जनसंघ या राजकीय पक्षाचे रूपांतर भारतीय जनता पक्षात झालेले आहे. भारतीय जनता पक्षाने काँग्रेस विरोधी अशा राष्ट्रीय पक्षाचे स्वरूप प्राप्त केले आहे, जे स्वरूप श्यामप्रसाद मुखर्जींनी जनसंघाच्या स्थापनेवेळी बघितले होते. थोडक्यात असे म्हणावे लागेल की, भारतीय जनता पक्षाच्या रूपाने श्यामप्रसाद मुखर्जी यांचे अखिल भारतीय पातळीवर नेतृत्त्व करणारा एक पक्ष निर्माण करण्याचे स्वप्न पूर्ण झालेले आहे.

सन १९२५ नंतरच्या काळात हिंदूधर्म आणि संस्कृतीच्या प्रचारार्थ व प्रसारासाठी राष्ट्रीय स्वयं सेवक संघाचे जनसंघ या पक्षावर वर्चस्व होते. परंतु राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सदस्य हे मान्य करीत नाहीत. RSS ही मुळातच लढाऊ व धर्मनिष्ठ हिंदूंची संघटना असून ती अत्यंत पक्की बांधलेली व शिस्तबद्धच यंत्रणा आहे. १९४८ ते ५० या दरम्यान गांधी हत्येनंतर कराच्या आरोपावरून या संघटनेवर बंदी आणली होती. त्यावेळी काही संघ कार्यकर्त्यांना असे वाटले की, शासनात आपले प्रतिनिधित्व नसल्यामुळे अशी बंद शासन घालू शकते, आपली भूमिका स्पष्टपणे मांडण्यासाठी संसदेत प्रतिनिधी मिळायला हवे. ते मिळवण्यासाठी जनसंघाची स्थापना करण्यात आली, अस टिकाकारांचे म्हणणे आहे.

श्यामप्रसाद मुखर्जी यांच्या नंतर जनसंघ हा पक्ष RSS च्या प्रभावाखाली जावू लागला. परंतु जनसंघाच्या बहुसंख्य नेत्यांना हे मत मान्य नाही. RSS ही केवळ सांस्कृतिक संघटना असून तिचा राजकारणाशी मुळीच संबंध नाही, असे प्रतिपादन RSS मधील कार्यकर्ते करित असतात. जनसंघाच्या विघटनानंतर जनसंघामधील नेते जनता पक्षात सामील झाले आणि स्वातंत्र्यानंतर प्रथमच जनता पक्षाच्या रूपाने जनसंघामधील नेत्यांना मंत्रीमंडळात स्थान मिळाले. परंतु जनता पक्षाच्या विघटनानंतर अटल बिहारी वाजपेयी, लाल कृष्ण अडवाणी, भैरवसिंग शेखावत, सुषमा स्वराज, अरुण जेटली आदी नेत्यांनी एकत्रितरित्या येवून 'भारतीय जनता पार्टी' नावाच्या राजकीय पक्षाची स्थापना केली. जनसंघामधील बऱ्याच नेत्यांना आणीबाणीच्या कालावधीमध्ये तुरुंगवासाचा सामना करावा लागला, तुरुंगवास भोगावा लागला. जनसंघ हा पक्ष जोपर्यंत अस्तित्वात होता तोपर्यंत केवळ उत्तर भारत त्यामधील पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, राजस्थान, गुजरात इत्यादी राज्यातच प्रभाव निर्माण करू शकला.

**भारतीय जनता पक्ष स्थापना :**

मे १९८० जनसंघाचे नेते – कार्यकर्ते जनता पक्षातून बाहेर पडले आणि त्यांनी अटल बिहारी वाजपेयी यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय जनता पक्ष नावाचय राजकीय पक्षाची स्थापना केली. राष्ट्रवाद, राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही, भावात्मक धर्मनिरपेक्षता, गांधीवादी समाजवाद आणि मुल्याधिष्ठित राजकारण या

तत्त्वांशी नव्या पक्षाची बांधिलकी असल्याचे घोषीत करण्यात आले. केवळ सत्ता स्पर्धा न करता काही ठोस तत्त्वे आणि राष्ट्रीय ध्येय धोरण समोर ठेवून एक राष्ट्रव्यापी मतैक्य निर्माण करण्याची प्रतिज्ञा भाजपने केली.

**पक्षाची भूमिका :**

भावनात्मक धर्मनिरपेक्षता याचा अर्थ अल्पसंख्याकांच्या जीवित, वित्त इत्यादी अधिकारांना संरक्षण द्यायचे. परंतु काँग्रेस प्रमाणे अल्पसंख्यांक अनुनयाचे राजकारण करायचे नाही. निरनिराळ्या धर्माच्या शिकवणीतून, सांस्कृतिक, ऐतिहासिक अनुभवातून जी मूल्ये भारतीय राष्ट्रवादाची सतत अविभाज्य अंगे ठरली आहेत, ती रुजवणे हे भारतीय जनता पार्टीला अभिप्रेत असणाऱ्या धर्मनिरपेक्षतेचा खरा अर्थ होतो. गांधीवादी समाजवादातून भांडवलशाही आणि राज्यवाद यांना पर्याय म्हणून सर्व आर्थिक क्षेत्रांत सरकार आणि विश्वस्त भावना रूढ करणे या पक्षाला अभिप्रेत आहे. थोडक्यात, कल्याणकारी राज्यव्यवस्थेला या पक्षाने प्राधान्य दिले. वैचारिक राज्यव्यवस्थेला या पक्षाने प्राधान्य दिले. वैचारिक कार्यक्रम स्वीकारताना पक्षाने पुढील गोष्टींना प्राधान्य दिले. शेतीची पुनर्रचना, अन्त्योदयाच्या योजनेद्वारे दारिद्र्य निवारण, प्रौढ शिक्षण, ग्रामीण जनतेला पाण्याची सोय, कमी खर्चात घरे, प्राथमिक आरोग्य, कुटुंब नियोजन, व्यवसाय प्रधान शिक्षण, स्त्री-कल्याण, रोजगार हमी, आवश्यक तिथे सार्वजनिक क्षेत्राचा व लाभकारी तिथे खाजगी क्षेत्राचा विकास, असंलग्नतेच्या आचारे आंतरराष्ट्रीय शांतता व राष्ट्रीय हितपूर्ती.

भाजप हा जनसंघाचा नवा अविष्कार असल्यामुळे भाजपच्या स्थापनेध्ये दुहेरी सदस्यत्वाचा प्रश्नही निकालात निघाला. RSS चे सदस्यत्त्व पक्ष सदस्यत्वाच्या आड येणार नाही. कारण संघसदस्यांना पक्षाची विचारसरणी व कार्यक्रम मंजूर आहेत, असे पक्ष स्थापनेच्या ठरावात नमूद करण्यात आलेले होते.

**पक्षाची वैचारिक धरसोड :**

भारतीय जनता पक्ष स्थापनेच्या सुरवातीच्या काळामध्ये विशेष अशी प्रगती करू शकला नाही. त्याने लोकदल या पक्षाशी राजकीय आघाडी करून निवडणुकीच्या राजकारणात उतरण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या प्रयत्नाला अपेक्षित असे सहकार्य भारतीय जनता पार्टी या पक्षाला मिळू शकले नाही. लोकदल या पक्षाशी आघाडी केल्यामुळे हरियाणा, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, बिहार राज्यातील जाट व मुस्लीम मतदारांचा पाठिंबा वाढवण्यात जरी भाजप यशस्वी झाला तरी काँग्रेसला पर्यायी राष्ट्रीय पक्ष म्हणून उभे राहणे त्या पक्षाला जमले नाही.

६ ते ८ जानेवारी १९८४ रोजी इंदूर मुक्कामी पक्षाच्या राष्ट्रीय अधिवेशनात आपला पक्ष लोकदलाशी पूर्णपणे बांधिल नसल्याचे सांगण्यात आले. याच अधिवेशनात राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही, भावात्मक, धर्मनिरपेक्षता, गांधीवादी समाजवाद आणि मुल्याधिष्ठीत राजकारण या पंचतत्त्वांवर आपला विश्वास कायम असल्याचे या अधिवेशनात घोषित करण्यात आले. त्याबरोबर कल्याणकारी योजनांचे काम लोकांपर्यंत पोचावेत, असे आदेश अधिवेशनात देण्यात आले. अर्थव्यवस्था वाचवण्यासाठी १० कलमी सूचनाही मांडण्यात आल्या. राजकीय उठावात इंदिरा काँग्रेस सरकारच्या कारभारावर टीका आणि गैरसाम्यवादी विरोधी पक्षांना एकजुटीचे आवाहन करण्यात आले.

ऑक्टोबर १९८४ मध्ये पुणे येथील बैठकीत भाजपच्या राष्ट्रीय परिषदेने गांधीवादी समाजवादाला सोडचिठ्ठी देऊन दिनदयाळ उपाध्याय प्रणित 'एकात्म मानवतावादाचा' पक्षाचे मुलभूत तत्त्वज्ञान म्हणून अंगीकार केला. या बैठकीत गांधीवाद आणि समाजवाद मुलत अंतर्विरोधी आहेत. कारण एकाचा भर विकेंद्रीकरणावार तर दुसऱ्याचा भर केंद्रीकरणावर आहे. त्याचबरोबर मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, हिमाचल प्रदेश, गुजरात इत्यादी राज्यांत काँग्रेस पिछेहाटीचा फायदा किंवा सर्वाधिक लाभ भाजपला मिळाला होता. त्याचबरोबर पक्षाने आपला येत्या पाच वर्षाचा निवडणूक कार्यक्रमही घोषित केला.

त्यात शेतकरी, शेतमजूर व कागारांचे प्रश्न, ग्रामीण व शहरी भागात रचनात्मक कार्य, किसानांसाठी व कामगारांसाठी स्वतंत्र 'सेल' करणे, स्थानिक राज्य व देश पातळीवर भ्रष्टाचार, भाववाढ, कायदा सुव्यवस्था, दुर्बल घटकावरील अत्याचार, कामाचा हक्क, पर्यावरण इत्यादी प्रश्नांच्या आधारे आंदोलने उभी करणे आणि पक्ष संघटना, विचारसरणी व चळवळींबद्दल अभ्यासवर्ग चालविणे या गोष्टींना त्या कार्यक्रमात महत्त्व देण्यात आले.

पण डिसेंबर १९८४ च्या निवडणुकीत भाजपचा अभूतपूर्ण पराभव झाला. त्या पक्षाला लोकसभेत फक्त दोनच जागा मिळाल्या. मार्च १९८५ मध्ये झालेल्या राज्यविधान सभाच्या निवडणुकीत उत्तर प्रदेश (आधी ११ जागा होत्या त्या १६ मिळाल्या, राजस्थान (३२-३८), गुजरात (९-१०) , आंध्र प्रदेश (३-८) आणि ओरिसा (०-१) ही राज्ये वगळता मध्य प्रदेश (६०-५८), हिमाचल प्रदेश (२९-७), बिहार (२१-१२), कर्नाटक, (१८-२), महाराष्ट्र (१४-१३) या राज्यातील आमदारांची संख्या घटली असल्याचे दिसून येते.

**पक्षाच्या भूमिकेला नवे वळण :**

१९८४ च्या सार्वत्रिक निवडणुकानंतर पक्षाने उदारमतवादी स्वदेशीकडे मोर्चा वळवला. स्वदेशीचा उच्चार करत भाजपने काँग्रेसचा आर्थिक धोरणांना आत्मसात केले. १९८९ च्या निवडणुका त्याचबरोबर १९९० च्या निवडणुका पक्षाने लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्त्वाखाली यशस्वीपणे लढविल्या. १९९० साली पक्षाला लोकसभेत ११७ जागा मिळाल्या. १९९०, १९९१, १९९३ आणि १९९५ या काळातील विधानसभा निवडणुकांध्ये पक्षाला विजय मिळविता आला. उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश, मध्यप्रदेश, राजस्थान या राज्यांत भाजप सत्तेवर आला.

१९८५ मध्ये गुजरात आणि महाराष्ट्रात शिवसेनेला सोबत घेवून आपली सरकारे बनविली.

**जमातवादाचा आधार :**

१९८९ नंतरच्या रामजन्म भूी आंदोलनाने तणावपूर्ण जमातवादी वातावरण निर्माण केले गेले. या वातावरणाचा फायदा भाजपला आपला विस्तार करण्यासाठी झाला. त्याचबरोबर विश्वहिंदू परिषद आणि बजरंग दल या संघटनाचे सदस्य भाजपच्या तिकीटावर निवडणूक लढवत होते. अयोध्या प्रकरणी लालकृष्ण अडवाणी सारख्या आक्रमक चेहऱ्याला नेतृत्त्व करण्याची संधी मिळाल्यामुळे पक्षाच्या प्रसारामध्ये फार मोठ्या

प्रमाणात फायदा झाला. १९८९ च्या निकालांनी भाजप तिसऱ्या क्रमांकाचा मोठा पक्ष ठरल. लोकसभेत त्याला ८९ जागा मिळाल्या.

**रथयात्रा :**

सप्टेंबर १९९० मध्ये अडवाणींनी गुजरातेतील सोनाथ मंदिरापासून रथयात्रा सुरू केली आणि १०,००० कि. मी. पश्चिम व उत्तर भारतात प्रवास करून ती अयोध्येला जायची होती. पारंपारीक श्रद्धा, पद्धती, राजकीय संघर्ष, नेटके नियोजन या गोष्टीच्या एकत्रित परिणामातून संघपरिवार आणि भाजप यांनी रथयात्रा पूर्ण केली. स्त्रियांनी रथाला ओवाळले, साधूसंतांनी अडवाणींच्या कपाळावर तिलक लावला, सर्वत्र भगवी सजावट केली. अडवाणींच्या रथयात्रेला लोकांचा प्रचंड पाठिंबा मिळाला. या रथयात्रेचा मुख्य उद्देश हिंदुत्ववादी विचार व हिंदू मताचे लक्ष्य वेधने हा होता, या उद्देशाला भारतीय जनता पार्टी व संघ परिवार पूर्ण करण्यास यशस्वी ठरले.

ऑक्टोबर अखेर अडवानींना बिहारच्या जनता दल सरकारने अटक केली. या गोष्टीचे निमित्त साधून भाजपने व्ही. पी. सिंग सरकारचा पाठिंबा काढून घेतला. १९९१ च्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपने हिंदूत्व हाच आपल्या प्रचाराचा मध्यवर्ती मुद्दा बनवला. १९९१ च्या निवडणुकीचा प्रचार हा स्वतंत्र भारतामधील सर्वाधिक महागडा प्रचार होता. त्याचबरोबर त्या प्रचारामध्ये मोठ्या प्रमाणात आक्रमकपणा होता. पहिल्या प्रथमच स्वतंत्र भारताच्या निवडणुकांध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात हिंदूत्वाच्या विचारसरणीचा व हिंदू देव, देवता, प्रतिके यांचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आला.

१९९१ च्या निवडणुकीवेळी राजीव गांधींची तामीळनाडूत हत्या करण्यात आली आणि निवडणुका एक महिना स्थगित झाल्या. सहानुभूतीच्या लाटेवर काँग्रेसला सत्ता मिळाली. परंतु भाजपा सर्वांत मोठा दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला. त्याचे लोकसभेतील निवडून आलेल्या उमेदवारांचे संख्याबह १९९ वर गेले आणि मतांचे १९८९ साली ११.४ असलेले शेकडा प्रमाण १९.४ एवढे झाले.

**हिंदुत्वाच्या लाटेवर स्वार :**

६ डिसेंबर १९९२ रोजी दोन लाख कारसेवकांनी अयोध्या येथे एकत्र येवून बाबरी मशीद जमीनदोस्त केली. या घटनेनंतर कल्याणसिंग यांच्या नेतृत्त्वाखालील उत्तर प्रदेश सरकारने आपला राजीनामा दिला. अडवाणींनी लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपद सोडले. अटल बिहारी वाजपेयी यांनी बाबरी मशीद पाडल्यानंतर खंत व्यक्त केली. या घटनेनंतर आठवडाभरातच मध्यप्रदेश, हिमाचल प्रदेश, राजस्थान या राज्यातील भाजपा सरकारे बरखास्त करण्यात आली. काँग्रेस सरकारच्या या वृत्तीचा भारतीय जनता पक्षाला फायदाच झाला. बाबरी मशीद पाडल्यामुळे उसळलेली हिंदुत्वाची लाट भाजपचे राजकीय भवितव्य उजळणारी ठरली.

१९९६, १९९८ व १९९९ निवडणुकांध्ये भाजप सर्वाधिक सभासद संख्येचा पक्ष म्हणून निवडून आला. त्याचबरोबर १९९८ च्या बाराव्या लोकसभेत भारतीय जनता पक्षाला १८० जागा मिळाल्या. मतांचे प्रमाण २४.८५% होते. भारतीय जनता पक्षाचे नेते अटलबिहारी वाजपेयी यांनी मित्रपक्षांच्या सहकार्याने सरकार

बनविले. परंतु ते सरकार केवळ १३ महिनेच टिकले. १९९९ च्या १३ व्या लोकससभा निवडणुकीत भाजपला १८२ जागा मिळाल्या आणि इतर छोट्या-मोठ्या २३ राजकीय पक्षांचे सहकार्य घेवून सरकार बनवले. त्या मित्रपक्षाच्या आघाडीला राष्ट्रीय लोकशाही आघाडी असे नाव देण्यात आले. या आघाडीचे नेतृत्त्व भाजपकडे होते व या आघाडीचे प्रमुख अटलबिहारी वाजपेयी हे होते. भारतीय राजकीय इतिहासात प्रथमच इतक्या पक्षांचे सरकार बनविले गेले. या सरकारने आपला कार्यकाल पूर्ण न करताच सहा महिने अगोदर निवडणुकांची घोषणा केली. त्यानंतर झालेल्या १४ व्या लोकसभा निवडणुकीत भाजपला यश मिळेल असे अपेक्षित वातावरण असतानाही अनपेक्षितरित्या भाजपला म्हणजे राष्ट्रीय लोकशाही आघाडीला पराभवाचा सामना करावा लागला. काँग्रेसच्या नेतृत्त्वाखालील संयुक्त पुरोगामी दल या आघाडीला सरकार स्थापनेची संधी मिळाली.

त्यानंतर झालेल्या २००९ च्या निवडणुकीतही भारतीय जनता पार्टी प्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीला पराभवाचा सामना करावा लागला. २००९ च्या निवडणुका लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्त्वाखाली लढवण्यात आल्या होत्या. २०१४ मध्ये झालेल्या १६ व्या लोकससभा निवडणुका भारतीय जनता पार्टीने नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली लढवल्या आणि या निवडणुकामध्ये भाजपने स्वबळावर २८२ जागा मिळवल्या व नरेंद्र मोदींच्या नेतृत्त्वाखाली पहिल्या प्रथमच भाजपचे म्हणजेच राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार बनवले. २०१९ मध्ये झालेल्या १७ व्या लोकसभा निवडणुकात देखील भारतीय जनता पक्षाने राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या नेतृत्त्वाखाली निवडणुका लढवून यश मिळवले या निवडणुकीमध्ये भाजपने स्वबळावर ३०३ जागा मिळवल्या.

भारतीय राज्यघटनेध्ये भाजपने स्वत:चा एक अवकाश व्यापला आहे. १९९० दशकापूर्वी ज्या पद्धतीने स्थानिक स्तरापासून केंद्रीय स्तरापर्यंत काँग्रेसचे वर्चस्व होते तसे वर्चस्व सद्यकालीन परिस्थितीत भारतीय जनता पक्षाने प्राप्त केले आहे. हे यश मिळवत असताना आरएसएस या संघटनेचा मोठ्या प्रमाणावर सहकार्य भाजपला मिळाले.

**भाजपचे धोरण :**

१) राष्ट्रवाद आणि राष्ट्रीय एकात्मता, २) लोकशाही बांधीलकी, ३) सकारात्मक धर्मनिरपेक्षता म्हणजे विविध धर्मांधून उदयास आलेली किंवा ऐतिहासिक व सांस्कृतिक अनुभवातून उत्क्रांत झालेल्या सामाईक नैतिक मुल्यांचा अर्क, ४) मानवतावाद, ७) मूल्याधिष्ठीत राजाकरण.

भाजपच्या राजकीय कार्यक्रमाची भिस्त हिंदुत्वाच्या विचारसणीवर आणि सांस्कृतिक राष्ट्रवादावर आहे. त्यामुळे टिकाकार भारतीय जनता पक्षास स्थितीवादी, प्रतीगामी जमातवादी ठरवतात. त्याचबरोबर अयोध्या प्रकरणी सौम्य भूमिका आणि सर्वांसाठी समान नागरी कायद्याचा आग्रह या विषयीच्या पक्षाच्या भूमिका पक्षाने बाजूला ठेवल्या आहेत.

**भाजपच्या मर्यादा :**

राजकीय टिकाकार, भाष्यकार यांच्या मते, हिंदुत्वाच्या कचाट्यातून हा पक्ष मुक्त झालेला नाही. त्याचबरोबर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा पक्षावरील प्रभाव वाढत चालला आहे. म्हणजेच भाजपचे राजकीय धोरण RSS अनुकुल आहे. भारतीय जनता पक्षाची स्वच्छ, चारित्र्यवान पक्ष ही स्वनिर्मित प्रतिमा सत्तेपासून लांब होता तोपर्यंत जेवढी उजळ होती तेवढी आज राहिली नाही. (Party with difference).

२०१४ नंतर भारतीय जनता पार्टीचा आक्रमक चेहरा पुढे आलेला आहे. परंतु तरीसुद्धा या पक्षाला स्वत:चा असा नवीन आर्थिक कार्यक्रम राबवता आला नाही. त्याचबरोबर तत्त्ववैचारिक भूमिका तडजोडीची व धरसोडीची राहिलेली आहे.

### ४.२.२ भारतीय जनता पार्टी आणि सहयोगी पक्षांचा इतिहास :

### (History of BJP and its partners - Shivsena, Akali dal) :

**भारतीय जनता पार्टी :**

१९८० च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत जनता पक्षाचा पराभव झाल्यानंतर जनता पक्षाचे विघटन झाले. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी इत्यादी जनसंघाचे नेते जे १९७७ साली जनता पक्षात सामील झाले होते ते १९८० साली जनता पक्षातून बाहेर पडले. त्यांनी भारतीय जनता पक्षाची स्थापना केली. १९८४ च्या आठव्या लोकसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला केवळ दोन जागा मिळाल्या. १९८९ च्या ९ व्या लोकसभेत ८८ जागा मिळवून आपला प्रभाव वाढवण्याचे कार्य भाजपने केले.

लालकृष्ण अडवाणी यांच्याकडे भारतीय जनता पक्षाच्या अध्यक्ष पदाची सूत्रे आल्यानंतर पक्षाच्या ध्येय धोरणात व कार्यक्रम व लोकप्रियतेत फरक पडला. दिल्ली, हिमाचल प्रदेश, गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, महाराष्ट्र अशा राज्यात भारतीय जनता पक्षाच्या धोरण व राजकीय कार्यक्रमाला अनुकूल असा लोकांचा पाठिंबा मिळू लागला. १९८९ च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमानंतर भाजपाने व्ही. पी. सिंग सरकारचा पाठिंबा काढून घेतला. व्ही. पी. सिंग यांच्या मंत्रिमंडळात भाजप सामील झाला नाही. ११ महिन्यांच्या कारकीर्दीनंतर भारतीय जनता पक्षाने राष्ट्रीय मोर्चा सरकारचा पाठिंबा काढून घेतला. लालकृष्ण अडवाणी यांनी रथयात्रा काढल्यामुळे त्यामुळे मोठ्या प्रमाणात सामाजिक वातावरण ढवळून निघाले. रथयात्रा काढण्यामागे भाजपचा मुख्य उद्देश्य हिंदुत्वाच्या विचारांचा प्रसार करणे त्याचबरोबर आपल्या पक्षाचा सामाजिक जनाधार वाढवण्यासाठी प्रयत्न करणे असा होता. बिहारमध्ये रथयात्रा आल्यानंतर लालकृष्ण अडवाणी यांना अटक करण्यात आली. त्यांवेळी बिहारमध्ये जनता दलाचे सरकार होते. लालकृष्ण अडवाणी यांना अटक झाल्यानंतर भारतीय जनता पक्षाने राष्ट्रीय मोर्चा सरकारचा पाठिंबा काढून घेतला.

१९९१ च्या लोकसभा निवडणूकीनंतर भारतीय जनता पक्षाला १११ जागा मिळाल्या. लोकसभेतील विरोधी पक्षनेते पद भारतीय जनता पक्षाकडे आले. १९९६ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला १६१ जागा मिळाल्या. मतांचे प्रमाण २३.६४% होते. १९९८ च्या बाराव्या लोकसभा निवडणुकीत भाजपला १८० जागा

मिळाल्या. मतांचे प्रमाण २४.८५% होते. भारतीय जनता पक्षाचे नेते अटलबिहारी वाजपेयी यांनी मित्रपक्षांचे सहकार्य घेवून सरकार बनविले. पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार केवळ १३ महिने टिकले. १९९९ च्या १३ व्या लोकसभेत भाजपला १८२ जागा मिळाल्या. लोकसभा निवडणुकीपूर्वी भारतीय जनता पक्ष व त्यांचे सहकारी मित्र पक्ष यांची जी राष्ट्रीय लोकशाही आघाडी बनवली गेली होती त्या आघाडीने सरकार स्थापन केले. सरकार मध्ये छोट्या-मोठ्या २३ पेक्षा अधिक घटक पक्षांचा समावेश होता.

२००४ साली झालेल्या १४ व्या लोकसभा निवडणूकीत भाजपचा पराभव झाला. लालकृष्ण अडवाणी यांच्याकडे पुन्हा एकदा विरोधी पक्षनेत्या पदाची जबाबदारी आली. त्याचबरोबर २००९ च्या १५ व्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीनंतर पुन्हा एकदा भारतीय जनता पार्टीला पराभवाला सामोरे जावे लागले. सुषमा स्वराज यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड करण्यात आली. २०२४ ची १६ वी लोकसभा निवडणूक नरेंद्र मोदींच्या नेतृत्त्वाखाली लढवण्यात आली. त्या निवडणुकीमध्ये भाजपला २८२ जागा मिळाल्या व पूर्ण बहुताचे सरकार प्रथमच भारतीय जनता पार्टीने निर्माण केले. २०१९ व्या सतराव्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीत भारतीय जनता पक्षाला बहुत प्राप्त झाले. भाजपला या लोकसभा निवडणुकीत ३०३ जागा मिळाल्या. अशा तऱ्हेने भारतीय जनता पक्षाने काँग्रेसला पर्यायी राष्ट्रीय पक्ष म्हणून आपला विस्तार केला. लोकसभेच्या निवडणुकांबरोबरच १९८४ नंतर वेगवेगळ्या राज्यामध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीनंतर भारतीय जनता पक्षाने आपली राज्य सरकारे स्थापन केली. त्यामध्ये प्रामुख्याने राजस्थान, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगढ, झारखंड, पंजाब इत्यादी राज्यांचा समावेश होतो.

मध्यप्रदेश, गुजरात, छत्तीसगड या राज्यामध्ये भारतीय जनता पक्षाचे सरकार बऱ्याच वर्षापासून कार्यरत आहे. गुजरातमध्ये जवळजवळ १९९८ पासून भाजप सरकार कार्यरत आहे. १९९८ सलग तीन टर्म मध्यप्रदेश या राज्यात भाजपचे सरकार कार्यरत आहे. त्याचबरोबर छत्तीसगड या राज्यातही भाजपचे सरकार तीन पंचवार्षिक निवडणुकापर्यंत कार्यरत होते. १९९५ ते १९९९ महाराष्ट्रात शिवसेना या राजकीय पक्षाबरोबर भाजप सरकार कार्यरत होते.

**भारतीय जनता पक्षाचा जाहीरनामा :**

१) अयोध्येच्या वादग्रस्त बाबरी मशिदीच्या जागेवर राम मंदीर बांधणे.

२) जम्मू काश्मीरबाबतचे घटनेतील ३७० कलम रद्द करणे.

३) देशातील सर्व नागरिकांसाठी समान नागरी कायदा तयार करणे.

४) केंद्र व राज्य संबंधाच्या पुनर्बांधणीसाठी राज्यांना अधिक स्वायत्तता देणे, छोटी राज्य स्थापना करण्यासाठी राज्यपुनर्रचना आयोग स्थापन करणे.

५) धार्मिक अधिकारांसंबंधी घटनेतील कलम ३० सुधारणा करणे, तसेच गोहत्या बंदी करणे.

वरील बाबींपैकी राममंदीर बांधणे, घटनेतील कलम ३७० रद्द करणे आणि समान नागरी कायदा या बाबी भारतीय जनता पक्षाला प्रखर हिंदुत्ववादी गटांशी तडजोडी करून स्वीकाराव्या लागल्या. त्यामुळे

सरकार स्थापनेवेळी मित्रपक्षांशी तडजोड करताना भाजपला आपल्या बऱ्याच धोरणात्मक कार्यक्रमांना पूर्ण करण्यासाठी काही तडजोडी कराव्या लागल्या.

२०१४ च्या सार्वत्रिक निवडणूकानंतर भारतीय जनता पार्टी या पक्षाने सत्तेच्या बळावर राजकारणातील फार मोठा अवकाश व्यापला. त्यामुळे भारतीय जनता पार्टीच्या ध्येय-धोरणांना मुरड न घालता त्याची प्रभावी अंलबजावणी करण्याचे कार्य भारतीय जनता पार्टीने केले. त्यामुळे भारताची राजकीय वाटचाल एक पक्षपद्धतीकडे चालली असल्याचे राजकीय अभ्यासकांचे म्हणणे आहे. सद्यकालीन परिस्थितीत स्थानिक पातळीपासून केंद्रीय पातळीपर्यंत भाजपची सत्ता आहे. त्यामुळे भाजपने विरोध पक्षाचा राजकीय अवकाश बऱ्याच प्रमाणात कमी केलेला आहे. भाजपच्या राजकीय यशामध्ये प्रामुख्याने तरुण मतदार वर्गाची मोठी भूमिका आहे. त्याचबरोबर भाजपच्या या यशस्वितेचे श्रेय आर.एस.एस. या संघटनेलाही देणे गरजेचे आहे. आर.एस.एस. च्या शिस्तबद्ध प्रचारावरच भारतीय जनता पार्टीने बहु ताजवळ पोहचून सरकार बनवले.

**शिवसेना :**

१९ जून १९६६ रोजी बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेना या राजकीय पक्षाची स्थापना केली. मराठी माणसाच्या अस्मितेवर फुंकर घालून मुंबई महाराष्ट्राची, पण मुंबईत वाढणारे परप्रांतियांचे वर्चस्व रोखण्यासाठी घोषणा करून शिवसेना पक्षाची स्थापना केली. त्यावेळी मुंबईतील मराठी माणसाच्या बेकारीचा प्रश्न उचलून धरण्याचे कार्य शिवसेनेने केले. मराठी माणसांची हेतुत: केलेली आर्थिक कोंडी फोडण्यासाठी शिवसेनेची निर्मिती केली. पुढे बेकारांना नोकऱ्या मिळवून देण्यासाठी या संघटनेने मुंबईत स्थानिक लोकाधिकार समिती स्थापन केली. तसेच मुंबईतील कामगारवर्गासाठी भारतीय कामगार सेना, श्रमिक सेना अशा कामगार संघटना स्थापन करण्याचे कार्य शिवसेनेने केले. त्यामुळे शिवसेनेला मुंबई महानगरपालिकेत आपले वर्चस्व प्रस्थापित करणे अधिक सुलभ झाले.

१९७३ साली मुंबईच्या महापौरपदी सुधीर जोशी निवडून आले. तर १९८५ साली छगन भुजबळ यांची महापौरपदी निवड झाली. १९७४ साली ठाणे महानगरपालिकेवर भगवा ध्वज लावून शिवसेनेने आपला पहिला नगराध्यक्ष आणि पुढे १९८६ साली पाहिला महापौर निवडून दिला. १९८९ च्या लोकसभेच्या निवडणुकीत शिवसेनेने भाजपशी युती करून चार जागा मिळवून आपला भगवा ध्वज दिल्लीला पोहचविला. १९९० च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेने भाजपशी युती करून ५२ जागा मिळवल्या. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात प्रभावी विरोधी पक्ष म्हणून शिवसेनेला मान्यमा मिळाली. १९९५ च्या निवडणुकीत शिवसेना व भारतीय जनता पार्टी यांनी अपक्ष आमदारांच्या मदतीने महाराष्ट्रात प्रथमच सरकार स्थापन केले.

**भाजपबरोबर युती :**

१९८९ साली शिवसेनेने भाजपशी युती केली. लोकसभेच्या सहा जागा लढवल्या. चार जिंकल्या. १९९६ साली २० जागा लढवल्या आणि पंधरा जिंकल्या. १९९८ च्या निवडणुकीत शिवसेनेला फक्त सहा जागा मिळाल्या.

१९९९ ते २००४ मधील भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्त्वाखालील केंद्रसरकारमध्ये शिवसेनेचा सहभाग होता. २००९ च्या लोकसभा निवडणुकीत शिवसेनेला ११ जागा मिळाल्या. २०१४ च्या सोळव्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत शिवसेनेला १८ जागा मिळाल्या. २०१९ च्या सतराव्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीत शिवसेनेला १८ जागा मिळाल्या. २०१४ व २०१९ च्या लोकसभा निवडणूका शिवसेनेने भाजपशी आघाडी करून लढविल्या.

२०१४ च्या महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीपूर्वी शिवसेना आणि भारतीय जनता पार्टी यांच्यामधील युती तुटली गेली. १९८९ ते २०१४ जवळजवळ २८ वर्षे ही युती एकसंघ होती. २०१४ च्या विधानसभा शिवसेना स्वतंत्रपणे लढली आणि ६३ जागी आपले उमेदवार निवडून आणू शकली. २०१४ मध्ये महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणूकीनंतर शिवसेना भाजप बरोबर सत्तेमध्ये सहभागी झाली.

**संघटनात्मक बांधणी :**

१९९६ साली स्थापन शिवसेनेला अद्यापही घटना नाही. वॉर्डावॉर्डात तिच्या शाखा आहेत. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील प्रत्येक खेड्यात शिवसेनेची शाखा आहे. सेनेशी संलग्न संघटना बऱ्याच आहेत त्यांच्यामार्फत सेनेचे कामकाज चालते. भारतीय कामगार सेना, भारतीय किसन सेना, भारतीय विद्यार्थी सेना, महिला आघाडी ही त्याची उदाहरणे आहेत. शिवसेनेचे सर्वाधिकार पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडे आहेत. बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनानंतर शिवसेना पक्षप्रमुख हे पद निर्माण केले. बाळासाहेब ठाकरे हयात असताना शिवसेनेने उद्धव ठाकरे यांच्याकडे कार्यकारी अध्यक्ष म्हणून त्यांची निवड केलेली होती. सामना हे वृत्तपत्र शिवसेनेचे मुखपत्र आहे. निवडणुकीच्या कालावधीमध्ये बाळासाहेबांच्या भाषणांचा उपयोग शिवसेना प्रचारतंत्रासाठी करते.

**राजकारणाचे केंद्र शहर व मराठवाडा हा भाग :**

मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, कोकण, मराठवाडा या भागात शिवसेनेचा विशेष प्रभाव दिसून येतो. शिवसेना या राजकीय पक्षाचा विस्तार मुंबई, ठाणे व कोकण या पट्ट्यात मोठ्या प्रमाणात झाला. मुंबई, ठाणे सारख्या मोठ्या महानगरपालिका बऱ्याच वर्षापासून शिवसेनेच्या नेतृत्त्वाखाली काम करत आहेत. शिवसेना या राजकीय पक्षाचा महाराष्ट्रातील ग्रामीण भागापेक्षा शहरी भागामध्ये विशेष प्रभाव आढळतो. मराठवाड्यातील औरंगाबाद, परभणी, बुलढाणा या भागातील ग्रामीण भागात देखील शिवसेनेचा विशेष प्रभाव दिसून येतो. मुंबई, ठाणे, परभणी, औरंगाबाद, मालेगाव, ठाणे इत्यादी महानरगपालिका शिवसेनेच्या नेतृत्त्वाखाली बऱ्याच वर्षापासून कार्यरत आहेत.

**हिंदुत्त्ववादी पक्ष :**

१९८० नंतरच्या दशकात आपली प्रादेशिक पक्ष ही भूमिका किंवा प्रतिमा टाकून देवून हिंदुत्ववादी पक्षाची भूमिका शिवसेनेने स्वत:साठी निवडली. देशात सगळीकडे पसरलेल्या जमातवादी वातावरणाचा हा

परिणाम होता. मराठवाडा विद्यापिठाचा नामांतर विरोधी भूमिका शिवसेनेने घेतलेली होती. अयोध्येच्या बाबरी विध्वंसाचा शिवसेनेने पुरस्कार केला.

महाराष्ट्रातील मराठा, माळी, धनगर, आग्री, प्रभु इत्यादी समाजातील बहुसंख्य लोकांचा पाठिंबा शिवसेनेला निवडणुकामध्ये मिळू लागला. शिवसेनेने स्वत:चा एक मतदार वर्ग तयार करण्याचे कार्य केले आहे.

**शिवसेनेच्या मर्यादा :**

शिवसेना उदारमतवाद विरोधी आहे. आक्रमकतेला पुरुषार्थ मानते (स्त्रियांनाही तसा पुरुषार्थ ती करायला लावते. सदस्य स्थितीवर बोलताना शिवसेना परखड भाष्य करते. परंतु खऱ्या आंतरविर्रोधांना कधीच स्पर्श करत नाही. आधुनिकतावादी भूमिका घेत असताना सतत इतिहासातून तिला उदाहरणे घ्यावीशी वाटतात. आर्थिक विचारांचा असा कोणताही वैचारिक कार्यक्रम (धोरण) शिवसेनेकडे नाही. शिवसेनेची संघटनात्मक ताकद आहे. परंतु तिचे स्वत:चे कार्यक्रम नाही. नेत्याची लोकप्रियता मराठी अस्मिता व हिंदुत्ववादी विचार हेच शिवसेनेच्या लोकप्रियतेचे मार्ग आहेत.

**अकाली दल :**

शिरोणी अकाली दल हा पक्ष धार्मिक घटकांचा आचार घेवून निर्माण झालेला राजकीय पक्ष आहे. मास्टर तारासिंग यांच्या नेतृत्त्वाखाली हा पक्ष स्थापन झाला. पंजाब भाषिकांचे स्वतंत्र राज्य निर्माण करणे ही या पक्षाची प्रमुख मागणी होती. १९५६ साली राज्य पुनर्रचना समितीच्या शिफारशीनुसार पंजाब व हरियाणा यांचे मिळून राज्य निर्माण करण्यात आले. तेव्हा पंजाबी भाषिकांसाठी स्वतंत्र पंजाब राज्याची मागणी आणि गुरूमुखी लिपितील पंजाबी भाषा ही औपचारिक राज्यभाषा व्हावी, अशी मागणी या पक्षाने केली. त्यासाठी मास्टर तारासिंग १९६१ मध्ये आमरण उपोषण सुरू केले. परंतु स्वतंत्र पंजाबी राज्याची मागणी न मान्य करता सरकारने शिखांच्या प्रश्नाविषयी केवळ चौकशी आयोग नेण्याचे ठरविले. मास्टर तारासिंग यांनी उपोषण सोडल्यामुळे अकाली दलाला या मागणीच्या पूर्ततेत अपयश आले. अकाली दलाच्या दुसऱ्या गटाचे नेतृत्त्व करणाऱ्या संत फत्तेसिंग यांनी स्वतंत्र पंजाबी सुभ्यासाठी आमरण उपोषण केले आणि आत्मदहनाची धमकी दिली. परंतु पाकिस्तानच्या आक्रमणामुळे ही चळवळ मागे घेण्यात आली. १९६६ साली पंजाब व हरियाणा ही दोन स्वतंत्र राज्ये निर्माण करण्यात आली.

अकाली दल हा पंजाबमधील प्रभावी सत्ताधारी पक्ष असून या पक्षाने राज्यांना स्वायत्तता आणि जास्त अधिकार असावेत, आर्थिक न्याय, समता तत्त्वांवर समाजरचना करावी, शहरी संपत्तीवर मर्यादा घालावी, दलित आणि हरिजन वर्गाचा उद्धार करावा, व्यापारावर सरकारी नियंत्रण ठेवावे, साक्षरता प्रसार, ग्रामोद्योग व लघु उद्योग यांना चालना द्यावी इत्यादी ध्येय धोरणांचा स्वीकार केला.

**अकाली दलाची निवडणूक कामगिरी :**

अकाली दलाने जनता पक्षाशी (१९७७ साली) युती करून निवडणूक लढवली. त्यावेळी प्रकाशसिंग बादल यांच्या नेतृत्त्वाखाली मंत्रीमंडळ (अकाली-जनता) सत्तेवर आले. १९८०-८१ च्या निवडणुकीत अकाली दलाच्या बहुताला धक्का पोहोचला होता. परंतु १९८५ च्या विधानसभा निवडणुकीत अकाली दलाने ११७ पैकी ७३ जागा जिंकून स्पष्ट बहुत प्राप्त केले. १९९६ च्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत अकाली दल या पक्षास ८ जागा मिळाल्या. १९९८ साली लोकसभेत १० जागा मिळाल्या. १९९७ च्या फेब्रुवारी महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत अकाली दलाला ७५ जागा मिळाल्या. २०१२ च्या विधानसभा निवडणुकीत अकाली दलास ५६ जागा मिळाल्या. २०१७ च्या विधानसभा निवडणुकीत अकाली दलाचा पराभव झाला. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत अकाली दलाला ४ जागा मिळाल्या. २०१९ च्या निवडणुकीत अकाली दलास केवळ १ जागा मिळाली.

पंजाबमध्ये अकाली दल व भारतीय जनता पार्टी यांची दिर्घकालीन कालावधीपासून युती अस्तित्वात आहे. भाजपच्या रुपाने राष्ट्रीय राजकारणातील सत्ताधारी मित्रपक्ष अकाली दलाला मिळालेला आहे. २०१४ व २०१९ च्या निवडणुकीनंतर देशांध्ये अस्तित्वात आलेल्या केंद्र सरकारमध्ये अकाली दलास सहभाग मिळाला आहे.

### ४.२.३ २०१४ च्या निवडणुकीनंतर भारतीय जनता पक्षाचा एक पक्षी उदय व्यवस्था :

२०१४ च्या लोकसभा निवडणुकानंतर भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्त्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीची सत्ता केंद्रामध्ये स्थापन झाली. या लोकसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाला २८२ जागा म्हणजेच बहुताचा स्पष्ट आकडा मिळाला. भारतीय जनता पार्टीने हे यश नरेंद्र मोदींच्या नेतृत्त्वाखाली मिळविले. राजीव गांधीच्या १९८४ च्या केंद्रसरकारनंतर प्रथमच भारतामध्ये नरेंद्र मोदींच्या नेतृत्त्वाखाली बहुताचे सरकार निवडून आले. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीची तयारी भारतीय जनता पक्षाने अगोदर करण्यास सुरवात केली होती. २००९ ते २०१४ या कालावधीमध्ये काँग्रेसच्या नेतृत्त्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडीच्या सरकारने प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार, कुशासन इत्यादी वाईट गोष्टी केल्यामुळे काँग्रेस सरकारची प्रचंड प्रमाणात लोकप्रियता कमी झाली. या गोष्टीचा फायदा भारतीय जनता पार्टीने करून घेतला व २०१४ नंतर प्रथमच बहुताचे सरकार बनवले.

**२०१४ च्या निवडणुकीत भाजपने विजय मिळवण्याची कारणे पुढीलप्रमाणे :**

**१) आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर :**

२०१४ च्या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे भारतात प्रथमच सामाजिक प्रसार माध्यमांचा वापर करून निवडणुक लढविली गेली. (फेसबुक, व्हॉटस्अप, ट्विटर) इत्यादी. दूरसंचार क्षेत्रातील प्रगतीमुळे प्रचंड प्रमाणात मोबाईल वापरणारी एक नविन पिढी तयार झाली. या मोबाईलमुळे लोक एकमेकांच्या प्रचंड जवळ आले. त्यामुळे माहितीची देवाण-घेवाण प्रचंड प्रमाणात झाली. त्या माहितीच्या प्रभावामुळे लोकांची मते बनू

लागली. समाज माध्यमांचा वापर करून वेगवेगळे राजकीय पक्ष लोकांची मते आपल्या धोरणांना व विचारांना कशा प्रकारे अनुकूल बनतील याचा विचार करू लागले. समाज माध्यमांत त्यासाठी वेगवेगळे माहितीची देवाण-घेवाण करणारे (IT Cell) बनविले. त्या (IT Cell) च्या माध्यमातून लोकांच्या मनावर आपल्या ध्येय धोरण, विचारांचा सकारात्मक परिणाम होईल, असे संदेश जाणीव पूर्वक पाठविले गेले. ही समाजमाध्यम वापरणारी नविन पिढी या संदेशांनी प्रभावित होवून भाजप अनुकूल बनली. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत तरुण वर्गाचा मोठा पाठिंबा भारतीय जनता पक्षास मिळाला. या पक्षाची जनते धील स्वीकारार्हता वाढली.

**२) काँग्रेसच्या धोरणांना मिळालेले अपयश :**

२००४ ते २०१४ अशी दहा वर्षे डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्त्वाखाली काँग्रेस सरकार कार्यरत होते. पण या सरकारच्या धोरण, अभाव धोरण कारभारामुळे सर्वसामान्य जनतेचा प्रचंड प्रमाणात अपेक्षाभंग झाला. त्याचबरोबर नवनवीन उद्योग उभारण्यास आलेले अपयश, शेतीची दूरावस्था, आर्थिक मंदी इत्यादीमुळे काँग्रेस सरकारच्या धोरणात प्रगती व वेग नसल्यामुळे लोकांच्या मनामध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी निर्माण झाली. त्याचा फायदा भारतीय जनता पक्षास झाला.

**३) विकासाचे स्वप्न :**

नरेंद्र मोदींच्या नेतृत्त्वाखाली निवडणुक लढवताना भारतीय लोकांना मोदींनी विकासाची जी स्वप्ने दाखवली त्याचबरोबर काँग्रेसपेक्षा आपण कसा अधिक प्रमाणात देशाचा विकास करू हे लोकांना पटवण्यात मोदी यशस्वी ठरले. मोदींची विकास पुरुष प्रतिमा लोकांच्या मनात निर्माण झाली. त्यामुळे तरुण वर्ग, सामान्य जनता यांना मोदी म्हणजे जादूची कांडी असणारे व्यक्तिमत्त्व वाटू लागले. सामान्यांच्या प्रश्नांचे उत्तर देण्याचे काम व लोकांना विकासाची संधी मिळवून देण्याचे काम मोदीच करू शकतात, असा विश्वास लोकांच्यात निर्माण झाला. त्याचा परिणाम लोकसभा निवडणूकीत भाजपला झाला.

**४) गुजरात मॉडेल :**

१९४७ पासून ते २०१४ पर्यंत थोड्याफार प्रमाणात जवळ जवळ ५५ वर्षे काँग्रेसची सत्ता देशावर राहिली. या ५५ वर्षात काँग्रेसने कोणताच प्रभावी विकास कार्यक्रम व विकासाचे कोणतेही मॉडेल निर्माण केले नाही, असा समज भारतीय जनता पक्षाने सामान्य लोकांच्या मनामध्ये तयार केला. त्याचप्रमाणे २०१४ नंतरच भारताचा खरा विकास सुरू झाला, हे मत पटवण्यात मोदी सरकार यशस्वी ठरले.

त्याचबरोबर १९९८ पासून २०१४ पर्यंत नरेंद्र मोदी गुजरात राज्याचे मुख्यमंत्री होते. या दिर्घकालावधीमध्ये मोदींनी गुजरातचा प्रचंड प्रमाणात विकास केलेला होता. तेथे मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण झालेले होते. म्हणजेच मोदींनी गुजरातला विकासाचे मॉडेल बनवले होते. या गुजरात मॉडेलचा नरेंद्र मोदींची विकास पुरुष ही प्रतिमा निर्माण करण्यात मदत झाली. गुजरातचे विकासाचे मॉडेल

काँग्रेसपेक्षा कसे गुणकारी व सरस आहे, हे वेगवेगळ्या प्रसारमाध्यमांचा उपयोग करून लोकांच्या गळी उतरवण्यास भारतीय जनता पक्षाला यश आले.

**५) राष्ट्रवाद, हिंदुत्ववादी विचार :**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विशेष असा प्रभाव भारतीय जनता पार्टीच्या (पक्षाच्या) ध्येय धोरण व राजकीय कार्यक्रमांवर आहे. RSS चा भारतीय राष्ट्रवद व हिंदुत्ववादी विचार यांच्या प्रभावातूनच भाजपाची धोरणे व राजकीय कार्यक्रम आखले जातात. भाजपला मार्गदर्शन करण्याचे मुख्य काम RSS ही संघटना करते. त्याचबरोबर भाजपमधील बहुसंख्य नेते मंडळी ही संघशाखामधून आलेली असल्यामुळे त्यांच्यावर संघाचे संस्कार झालेले असतात. त्याचबरोबर निवडणुक व इतर काळात RSS ही संघटना भाजपला प्रचार कार्यात मदत करते. बऱ्याच मोठ्या प्रमाणात RSS चा जनसंपर्क असल्यामुळे त्याच्या विचार व संस्कारांना मानणारा वर्ग समाजात तयार झालेला आहे आणि हाच वर्ग भारतीय जनता पक्षाचा मतदार आहे.

**६) उद्योग व व्यावसायिक वर्गाचा पाठिंबा :**

२०१४ व २०१९ च्या लोकसभा निवडणुकात भारतामधील उद्योग व व्यवसायिकांचा विशेष पाठिंबा भारतीय जनता पक्षाला मिळाला. उद्योग, व्यवसायाकडून मिळालेल्या प्रचंड प्रमाणातील देणग्यामधून भारतीय जनता पार्टीने वेगवेगळ्या साधनांचा प्रचार तंत्रासाठी वापर केला. या उद्योग व्यावसायिक व्यक्तींच्या मालकीच्या असणाऱ्या सर्व प्रसार माध्यमांचा उपयोग भारतीय जनता पार्टीला प्रचार कार्यात झाला. उद्योगपती, व्यापारी या वर्गाचा भाजपास पाठिंबा असल्यामुळे लोकांच्या मनात या पक्षाबद्दल एक विशेष आपलेपणाची भावना निर्माण झाली. २०१४ च्या निवडणुकीत प्रथमच इतक्या व्यापक स्वरूपात व्यापार व उद्योग विश्वाचा पाठिंबा कोणत्यातरी एका पक्षास मिळाला. या अगोदर झालेल्या कोणत्याच सार्वत्रिक निवडणुकीत इतका व्यापक असा उद्योग जगताचा पाठिंबा मिळालेला नव्हता.

वरील सर्व कारणाबरोबरच विरोधी पक्षांचा म्हणजेच काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, अण्णा द्रमुक, द्रमुक, राष्ट्रीय जनता दल, बहुजन समाज पक्ष, समाजवादी पक्ष, साम्यवादी पक्ष यांच्या विचार व खोट्या धर्मनिरपेक्ष विचारांचा लोकांच्या मनातील राग या गोष्टीमुळे सुईचा भाजपास बहुत मिळवता आले. या पक्षांनी कशा प्रकारे धर्मनिरपेक्ष विचारांची झुल पांघरून मुस्लीम अनुनयाचे राजकारण केले, हे लोकांना मनी उतरवण्यास भाजप यशस्वी ठरला.

त्याचबरोबर काँग्रेस व काँग्रेसच्या मित्रपक्षांनी केवळ आपल्या कुटुंबातील नातेवाईक, सगे-सोयरे यांचेच कसे कल्याण केले, संपत्तीत कशी विशेष वाढ झाली हे सांगण्याचे कार्य भारतीय जनता पार्टीने केले. वेगवेगळ्या जाती-धर्मातील लोकांचा आपल्या वैयक्तिक फायद्यासाठी कसा वापर करून घेतला हा विचारही लोकांच्या मनात रुजवण्यात भारतीय जनता पार्टीला यश आले.

वरील सर्व कारणांळे २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षास प्रचंड प्रमाणात यश मिळाले. २०१४ नंतर झालेल्या जवळ जवळ सर्व विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीमध्ये

भाजपने यश मिळविले. त्याच बरोबर ईशान्य भारतातील आसाम, अरुणाचल प्रदेश, त्रिपुरा इत्यादी राज्यातही भाजपने निवडणुकीत यश मिळवले. ज्याप्रमाणे स्वातंत्र्यानंतर केंद्रापासून व स्थानिक पातळीपर्यंत देशभर काँग्रेसची सत्ता होती त्याच पद्धतीने भारतीय जनता पक्षाने २०१४ व २०१९ च्या लोकसभा निवडणुकांत तसेच वेगवेगळ्या राज्यांच्या स्थानिक तसेच विधानसभा निवडणुकीत यश मिळवले.

१९४७ ते १९८० पर्यंत काँग्रेस पक्षाचे राजकीय वर्चस्व भारतामध्ये होते. म्हणून या कालावधीस रजनी कोठारी यांच्यासारखे अभ्यासक काँग्रेस व्यवस्था असे म्हणतात. त्याचप्रमाणे २०१४ नंतर भारतीय जनता पक्षाने ज्या पद्धतीने भारतामध्ये स्थानिक पातळीपासून राष्ट्रीय पातळीपर्यंत जे वर्चस्व मिळवले आहे या कालावधीस आपण भारतीय जनता पक्षाचा एकपक्षीय वर्चस्व व्यवस्थेचा कालावधी म्हणू शकतो.

सद्यकालीन परिस्थितीत भारतीय जनता पार्टीने मिळवलेले यश हे असाधारण आहे. नरेंद्र मोदींच्या रूपात भारतीय जनता पार्टीला सर्वगुणसंपन्न नेतृत्त्व लाभले आहे. नरेंद्र मोदींच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव हा भारतीय जनता पक्षाच्या प्रतिभेपेक्षा मोठा पडलेला आहे. म्हणजेच सद्यकालीन परिस्थितीत नरेंद्र मोदी म्हणजे भारतीय जनता पार्टी असा विश्वास लोकांच्या मनात निर्माण झालेला आहे. कारण नरेंद्र मोदींच्या व्यक्तिमत्त्वाशी तुलना होईल असे कोणतेही नेतृत्त्व भारतीय जनता पक्षात सद्यकालीन परिस्थितीत नाही.

### ४.२.४ भारतीय जनता पक्षाचा राज्यपातळीवर होणारा प्रसार आणि विकास :

### (BJP's Development at State Level) :

२०१४ च्या लोकसभा निवडणुकानंतर भारतीय जनता पार्टीचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला. भारतीय जनता पार्टीच्या स्थापनेनंतर केवळ उत्तर भारतातील उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश, पंजाब, हिमाचल प्रदेश, गुजरात, बिहार या राज्यामध्ये भारतीय जनता पार्टी आपले वर्चस्व प्रस्थापित करू शकली. त्यामुळे या पक्षाला उत्तर भारतीयांचा पक्षच असे संबोधले जात होते. परंतु २००४ च्या नंतर भाजपाने बी. एस. येडीयुराप्पा यांच्या नेतृत्त्वाखाली कर्नाटक राज्यात प्रथमच सरकार बनवले. २०१४ लोकसभा निवडणुकानंतर झालेल्या सर्वच विधानसभा निवडणुकामध्ये भाजपास विजय मिळत गेला. अपवादात्मकपणे दिल्ली व बिहार राज्यामध्ये तेवढा फक्त भाजपास पराभवास सामोरे जावे लागले. यामध्ये दिल्ली विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षास केवळ तीन जागा मिळू शकल्या. तसेच बिहारमध्ये नंतर नितिशकुमारांनी राजद व काँग्रेसची साथ सोडून भाजपबरोबर सरकार स्थापन केले.

परंतु २०१७ मध्ये राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगढ या राज्यामध्ये झालेल्या सार्वत्रिक विधानसभा निवडणुकांध्ये भाजपास पराभवास सामोरे जावे लागले. २०१६ मध्ये झालेल्या गुजरात विधानसभा निवडणुकीत भाजपला काठावरचे बहुत प्राप्त झाले. परंतु २०१९ च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीस पुन्हा एकदा अभुतपूर्व विजय मिळवता आला. २०१४ पासून भारतीय जनता पक्षाने झालेल्या वेगवेगळ्या स्थानिक स्वराज्य संस्था पासून विधान सभा निवडणुकापर्यंत आपल्या यशाचा चढता आलेख राखला आहे. स्थानिक पातळीपासून केंद्रीय पातळीपर्यंत भाजपचे वर्चस्व निर्माण झालेले आहे.

**२०१४ पासून भाजपास मिळालेले राज्यवार निवडणुकीतील यश पुढीलप्रमाणे :**

१) लोकभावना

२) तरुण नेतृत्व

३) जनतेवर प्रभाव पडणाऱ्या योजना

४) जन अनकुल धोरण

**१) लोकभावना :**

२०१४ सालच्या भारतीय जनता पक्षाचे लोकप्रिय नेते नरेंद्र मोदी यांची भारताच्या पंतप्रधानपदी निवड झाली होती. त्यामुळे त्यांच्या प्रसिद्धीचा प्रभाव जनतेवर होता. त्यामुळे महाराष्ट्राच्या जनतेमध्ये एका प्रकारची युतीची अट झाल्याने भारतीय जनता देशाच्या कोणाशीही युती न करता २०१४ च्या विधान सभेमध्ये १२२ जागावरती विजय मिळवता आला. आणि प्रथमच भारतीय जनता पक्षाचा मुख्यमंत्री पदावर श्री. देवेंद्र फडणवीस यांची निवड झाली. त्यांना शिवसेना या महाराष्ट्रतील प्रादेशिक पक्षाचा पाठिंबा होतो.

**२) तरुण नेतृत्त्व :**

२०१४ च्या विधासभेच्या निकालानंतर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदी श्री. देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्रातील शरद पवार नंतर लागले. दुसरे मुख्यमंत्री व २१ व्या वर्षी नागपूरचे महापौर भूषवलेले व सलग तीन टर्म आमदार राहिलेने फडणवीस यांना संधी देण्यात आली. स्वत: वकील असणारे व कमी वयात राजकारणात प्रवेश करून कुशल संघटन कौशल्य व चतूर राजकीय नेता अशी ओळख निर्माण करून स्थानिक स्वतंत्र संस्थेमध्ये प्रचंड अशा प्रमाणात विजय मिळवता भारतीय जनता पक्षाने ग्रामीण भागातही पक्षाचा विस्तार केला. पहिली पक्षाची ओळख मर्यादित होती. पण आता पक्ष खंबीरपणे ग्रामीण भागातही पाय रोवू लागला.

भारतीय जनता पक्ष हा तरुणांना संधी देणारा पक्ष अशी पक्षाची ओळख आहे. बहुतांश करून पक्षाचे नेते युवा आहेत.

**३) जनतेवर प्रभाव पडणाऱ्या योजना :**

भारतीय जनता पार्टीत हुशार व तज्ज्ञ लोक असल्याने ते नेहमी जनतेवर छाप पडणाऱ्या योजना आणत असतात. तसेच ते दळणवळण, रस्ते, वाहतूक, महामार्ग यावर मोठ्या प्रमाणावर काम करतात. उदा. १) समृद्धी महामार्ग तसेच राष्ट्रीय महामार्गांना समांतर व त्यांना छेदणारे राज्य महामार्ग चारपदरी रस्ते. २) स्त्रीयांसाठी उज्ज्वल गॅस योजना सारख्या प्रभावी योजना, ३) कृषी पीक विमा योजना - याचे काम थेट ऑनलाईन पद्धतीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करणे, ४) कृषी सन्मान योजना - प्रत्येक शेतकऱ्याला वार्षिक ६००० रक्कम थेट बँक खात्यात जमा केली जाते, ५) कोवीडच्या काळात जन धन खात्यावर ५०० रुपये प्रत्येक स्त्रीयांच्या खात्यावर जमा तसेच मोफत धान्य वाटप.

### ४) जन अनकुल धोरण :

भारतीय जनता पक्ष हा उजव्या विचारसरणीचा पक्ष आहे. प्रखर राष्ट्रवाद, प्रखर हिंदुत्ववाद, राम मंदीर हे पक्षाचे महत्त्वाचे ध्येय-धोरण राहिले आहे. त्यानुसार भारतीय जनता पक्षाने ५ ऑगस्ट २०१९ ला ३७० कलम व ३५ए, २६ कलम आपल्या जाहीरनाम्यातील महत्त्वाचा मुद्दा पूर्ण केला आहे. याचा जनमतावर चांगला प्रभाव पडला. (जम्मू आणि काश्मीर). त्याचसोबत भारतीय जनता पक्षाने राम मंदिराचा प्रश्न देखील निकाली लावला आहे. त्यामुळे त्यांचा प्रखर हिंदुत्वाचा प्रभाव आणखीनच वाढला आहे. त्यामुळे जनतेमध्ये भारतीय जनता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या उदरातून जन्मलेला जनसंघ आणि जनसंघाच्या कुशीची उब आणि जनता पक्षातली धुसळण या दोहोंतून भाजपचा जन्म झाला. केवळ सामाजिक व सांस्कृतिक कार्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा जन्म २७ सप्टेंबर १९२४ रोजी झाला. १९५१ साली हिंदू महासभेचे श्यामाप्रसाद मुखर्जी यांना नवीन राजकीय पक्षाची गरज वाटू लागली आणि त्यातून जनसंघाचा उदय झाला. १९७५ ची आणीबाणी घोषित झाल्यानंतर अडवाणींचा जनसंघ जनता पक्षात विलीन झाला. आणीबाणीवर चिडल्याने जनतेने २९८ जागांसह पक्षास बहुमत बहाल केले. अंतर्गत धुसफूस व विचारधारेच्या अभावामुळे विविध पक्ष फुटून बाजूला निघाले आणि याच वेळी ६ एप्रिल १९८० रोजी लालकृष्ण अडवाणी यांनी भाजपची स्थापना केली. पक्षाला भाजप हे नाव अटलबिहारी वाजपेयी यांनी सुचवले व तेच भाजपचे प्रथम अध्यक्ष होते. २८ ते ३० डिसेंबर १९८० दरम्यान भाजपचे पहिले अधिवेशन भरले. या नवनिर्मित पक्षाचे वैशिष्ट्य म्हणजे या पक्षात राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व इतरही बाहेरच्या विचारधारांचे लोकनेते यांना समाविष्ट करून घेतले गेले.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांमध्ये १९८० सालापासून भाजपने भाग घ्यायला सुरुवात केली. त्या निवडणूकीत भाजपला १४ जागा मिळाल्या. १९८५ च्या निवडणुकीत केवळ २ जागांची भर पडून १६ जागांवर समाधान मानावे लागले. भाजपची महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणूकीच्या यशास खरी सुरुवात आठव्या विधानसभा निवडणूकीपासून झाली. भाजपने या निवडणूकीत प्रादेशिक पक्ष म्हणून नव्यानेच समाविष्ट झालेल्या शिवसेनेसोबत युती करून ४२ जागा मिळवल्या आणि याच निवडणूकीमुळे भाजपच्या महाराष्ट्रातील राजकारणाची दिशा देखील ठरली. भाजपने शिवसेना या समविचारी पक्षासोबत युती करून स्वत:ची राजकीय कक्षा रुंदावली, हे जरी खरे असले तरी त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणाचे व युतीचे नेतृत्त्व शिवसेनेकडे देऊन स्वत: लहान भावाची भूमिका घेतली. या निवडणूकीचा प्रभाव २०१४ च्या मोदी लाटेपर्यंत राहिला. तत्पूर्वीच्या निवडणूकांचा तपशील समजून घेणे येथे उचित ठरेल १९९५ च्या नवव्या विधानसभा निवडणूकीपूर्वी महाराष्ट्रासोबतच देशाचेही राजकारण एका ऐतिहासिक घडामोडीमुळे ढवळून निघाले होते. ती घडामोड म्हणजे हिंदुत्ववादी विचार प्रभावाखाली येऊन भाजपच्या नेतृत्त्वाखाली झालेला बाबरी मशिदीच्या पाडाव! ही घडामोड महाराष्ट्राच्या राजकारणातही हिंदुत्ववादी म्हणून गणल्या गेलेल्या भाजप व शिवसेना या दोन्ही पक्षांच्या राजकीय फायद्यात परावर्तीत झाली. १९९३ च्या घटनेनंतर लगेचच १९९५ साली झालेल्या विधानसभा निवडणूकांत भाजपच्या जागा वाढून ६५ झाल्या आणि अशाप्रकारे इतिहासात पहिल्यांदाच भाजप शिवसेनेसह सत्तेत सामील झाला.

दहावी विधानसभा निवडणूकीत (१९९९) भाजप व शिवसेनेस सत्ता टिकवण्यात अपयश आले. केंद्रात म्हणजेच लोकसभा निवडणूकांत मात्र भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा विजय झाला. २०१४ ला झालेल्या विधानसभा निवडणूकीत भाजपने ५४ जागा राखत मागील खेपेच्या तुलनेत २ जागा गमावल्या. बारावी विधानसभा निवडणूक लक्षणीय अशी भाजपचा नैसर्गिक मित्र असलेला शिवसेना पक्ष, काँग्रेस-राष्ट्रवादीच्या गोटात सामील झाला आणि मुख्यमंत्रीपदी उद्धव ठाकरे यांची वर्णी लागली. भाजप हा क्रमांक एकचा पक्ष सध्या राजकीय महत्त्वाकांक्षा मोठी करण्याच्या नादात विरोधी बाकावर जाऊन बसला.

अशा प्रकारे भाजपच्या निर्मितीपासून सध्यस्थितीतील महाराष्ट्रातील भाजपच्या वाटचालीबाबत भाष्य करता येईल.

म्हणजेच महाराष्ट्राच्या राजकारणाच्या बाबतीत विचार करता वादळापूर्वीची शांतता, असे तिचे वर्णन करावे, अशा स्वरूपाची राहिली. या निवडणूकीत काँग्रेस-राष्ट्रवादीने आपली सत्ता राखली मात्र पहिल्यांदाच भाजप आणि शिवसेना या दोन्ही पक्षांना समान म्हणजेच प्रत्येकी ४६ जागा मिळाल्या आणि महाराष्ट्राच्या राजकारणात 'लहान भाऊ' अशी भूमिका घेणारे भाजपचे धुरीण शिवसेना व भाजप दोन्ही पक्षांच्या गुणात्मक बैठकीबद्दल समानतेची भाषा बोलू लागले. त्यांच्या जागा कमी होण्यात नवनिर्मित महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा उदय कारणीभूत होता, हेही तितकेच खरे.

२०१४ ची तेरावी विधानसभा निवडणूक मोदी लाटेवर स्वार होऊन आली. या निवडणूकीत काँग्रेस-राष्ट्रवादीच्या कारभारावर कंटाळलेल्या लोकांनी आत्तापर्यंतचा 'मोठा भाऊ' असणाऱ्या शिवसेनेला डावलून भाजपवर विश्वास दाखवायला सुरुवात केली. जनमताची चाचणी घेण्याच्या आणि आपल्या पक्षाची ताकद आजमावण्याच्या हेतूने ही निवडणूक सर्वच प्रमुख पक्षांनी स्वबळावर लढवली. भाजपला त्याचा अपरिमित फायदा झाला आणि भाजपने स्वबळावर १२२ जागांवर विजय मिळवत आपणच देशासोबत महाराष्ट्राच्याही राजकारणातला क्रमांक एकचा पक्ष असल्याचे सिद्ध केले. देवेंद्र फडणवीस यांनी निवडणूक प्रचारासोबतच मुख्यमंत्रीपदाची धुराची संभाळली. सध्याची २०१९ ची चौदावी विधानसभा निवडणूक पुन्हा भाजपच क्रमांक एकच पक्ष असल्याचे सिद्ध करून गेली. भाजपने सर्वाधिक १०६ जागा मिळवल्या. मात्र भाजपला अतिआत्मविश्वास आणि गर्व यामुळे .....

| **पक्ष** | **जागा** | | |
|---|---|---|---|
| | **एकूण** | **विजय** | **आघाडी** |
| भाजप | १०५ | ९६ | ९ |
| शिवसेना | ५६ | ५५ | १ |
| राष्ट्रवादी काँग्रेस | ५४ | ४९ | ५ |
| काँग्रेस | ४४ | ३५ | ९ |
| मनसे | १ | १ | ० |

| Maharashtra Result Status | | | |
|---|---|---|---|
| Status Known for 288 out of 288 Constituencies | | | |
| **Party** | **Won** | **Leading** | **Total** |
| Bharatiya Janata Party | 122 | 0 | 122 |
| Communist Party of India (Marxist) | 1 | 0 | 1 |
| Indian National Congress | 42 | 0 | 42 |
| Nationalist Congress Party | 41 | 0 | 41 |
| Maharashtra Navnirman Sena | 1 | 0 | 1 |
| Shivsena | 63 | 0 | 63 |
| All India Majlis-E- Ittehadul Muslimeen | 2 | 0 | 2 |
| Bahujan Vikas Aaghadi | 3 | 0 | 3 |
| Bharipa Bahujan Mahasangh | 1 | 0 | 1 |
| Peasants And Workers Party of India | 3 | 0 | 3 |
| Rashtriya Samaj Paksha | 1 | 0 | 1 |
| Samajwadi Party | 1 | 0 | 1 |
| Independent | 7 | 0 | 7 |
| **Total** | **288** | **0** | **288** |

**Partywise Vote Share**

Please move your muse over the chart or legend to view more details.

Party (Votes %, Vote Count)

BJP (27.8%, 147094...)

SHS (19.3%, 102359...)

INC (18.0%, 9496144)

NCP (17.2%, 9122299)

IND (4.7%, 2494016)


MNS (3.1%, 1665033)

BSP (2.3%, 1191749)

PWPI (1.0%, 533309)

AIMIM (0.9%, 489614)

BBM (0.9%, 472925)



२०१४ मध्ये महाराष्ट्र विधान सभेच्या निवडणुकांत भारतीय जनता पक्षास सर्वाधिक १२२ जागा मिळाल्या. त्यानंतर भारतीय जनता पक्षाने शिवसेना व मित्रपक्ष यांना सोबत घेवून सरकार बनवले गेले. म्हणजे देवेंद्र फडणवीस भाजपचे महाराष्ट्रातील पहिले मुख्यमंत्री बनले. त्यानंतर महाराष्ट्रामध्ये झालेल्या वेगवेगळ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत (जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, महानगरपालिका) भारतीय जनता पक्षास प्रचंड मोठे यश मिळाले. मोठ्या प्रमाणात महानरगपालिकामध्ये सत्ता प्राप्त झाली. नागपूर, पुणे, पिंपरी चिंचवड, सांगली, सोलापूर इत्यादी महानगर पालिका भारतीय जनता पक्षाने जिंकून घेतल्या. त्याचबरोबर मुंबई महानगरपालिकेत शिवसेने खालोखाल जागा निवडून आणल्या. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र या भागातील वेगवेगळ्या जिल्हा परिषदा व नगर पालिकामध्ये अभूतपूर्व यश मिळविले. महाराष्ट्रात सर्वात जास्त जिल्हा परिषदा, सर्वांत जास्त नगराध्यक्ष व महापौर भाजपचे निवडून आले. तसेच राज्यातील वेगवेगळ्या भागातील ग्रामपंचायत निवडणुकामध्ये सुद्धा भाजपला यश मिळाले.

२०१४ पूर्वी भारतीय जनता पार्टीला महाराष्ट्रातील सर्व प्रदेशात आपले पाऊल ठेवता आले नव्हते. मात्र २०१४ नंतर महाराष्ट्रातील प्रत्येक भागात भाजपाने आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

हरियाणा या राज्यात देखील भाजपने मनोहरलाल खट्टर यांच्या नेतृत्त्वाखाली बहुताचे सरकार बनवले. हरियाणामध्ये झालेल्या स्थानिक निवडणुकांत सुद्धा भाजपाने विजय मिळविला. हरियाणाबरोबरच आसाम, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश या राज्यामध्ये देखील भाजपने विधानसभा निवडणुकांत यश मिळविले. ईशान्य भारतात प्रथमच भाजपच्या नेतृत्त्वाखालील राज्य सरकारे बनवली गेली. ईशान्य भारतात भारतीय जनता पक्षाने निवडणूक लढवताना तेथील प्रादेशिक पक्षाशी युती करून तसेच तत्कालीन भाजपविरोधी पक्षातील नेत्यांना आपल्या पक्षात घेवून भाजपने संघटना बांधणी करून राजकीय यश पदरात पाडून घेतले. त्रिपुरामधून डाव्या पक्षाचे सरकार भाजपने घालवले. त्याचबरोबर आसाम मधून काँग्रेसचा पराभव केला.

२०१४ नंतर झालेल्या जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकानंतर भारतीय जनता काश्मीर विधानसभा निवडणुकानंतर भारतीय जनता पक्षाने पिपल्स डेमोक्रेटीक पार्टी या महबुबा मुक्ती यांच्या पक्षाशी युती करून जम्मू काश्मीरमध्ये सरकार बनवले. झारखंड, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश या राज्यातील सार्वत्रिक विधानसभा निवडणुकात भारतीय जनता पक्षाने काँग्रेसचा पराभव करून सत्ता प्राप्त केली. म्हणजे असे म्हणावे लागेल की, २०१४ च्या लोकसभा निवडणुकानंतर भारतीय जनता पक्षाने उत्तर भारताबरोबर मध्यभारत, ईशान्य भारत व दक्षिणेकडील कर्नाटक इत्यादी राज्यात जे यश मिळवले त्यामुळे भारतातील जनता पार्टीस अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झाले. भारतामधील जवळ जवळ सर्वच राज्यांत भारतीय जनता पक्षाने आपला जनाधार वाढविला. दक्षिणेतील केरळ, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, तेलंगणा या राज्यांत भारतीय जनता पक्षाने निवडणुकीत मोठे यश मिळविले नसले तरी मतांची एकूण टक्केवारी वाढवण्यात भाजप यशस्वी झाला. दक्षिणेतील राज्यामध्ये स्वत:ची राजकीय जागा तयार करण्यास भाजप यशस्वी ठरला. २०१४ नंतर भाजपाला वेगवेगळ्या निवडणूकांत जे यश मिळत गेले, त्यामुळे वेगवेगळ्या राज्यांधील प्रादेशिक पक्षांना भाजपशी जुळवून घ्यावे किंवा त्याच्याशी संघर्ष करावा लागला. या निवडणुकांतील यशामुळे भारतीय जनता पक्षाचा आत्मविश्वास प्रचंड प्रमाणात वाढला व निवडणुकांत प्रादेशिक पक्षाशी युती करताना भारतीय जनता पक्ष

स्वत:च्या अटीवर इतर प्रादेशिक पक्षांशी युती करू लागला. महाराष्ट्रात भारतीय जनता पार्टीला मिळालेल्या यशामुळे शिवसेनेला भाजपच्या अटी मान्य करून युती करणे गरजेचे झाले.

त्याचबरोबर नितीश कुमारांचा जनता दल युनायटेड, अकाली दल या पक्षांना देखील भाजपच्या राजकीय वर्चस्वास व त्या-त्या राज्यामधील समान भागीदारी मान्य करावे लागले. निवडणुकीतील यशामुळे भाजपची राजकीय सौदाशक्ती वाढली आणि काँग्रेस बरोबर इतर प्रदेशिक पक्षांची राजकीय शक्ती व जनाधार मोठ्या प्रमाणावर कमी झाला. भारतीय जनता पक्ष भारतीय राजकारणात मुख्य राजकीय पक्ष बनला. भारतीय राजकीय पातळीवर होणाऱ्या राजकीय व्यवहारामध्ये भाजपला मुख्य स्थान मिळू लागले.

## ४.३ पारिभाषिक शब्द :

१) **भाजप :** भारतीय जनता पार्टी

२) **एन. डी. ए. :** राष्ट्रीय लोकशाही आघाडी (National Democratic Alliance)

३) **सबका साथ, सबका विकास :** सर्वांचा उत्कर्ष

४) **नमो :** नरेंद्र मोदी

५) **द्विव्यवलयांकित** (Charasmatic leader) : दैवी गुण देणगी असणार नेतृत्त्व

## ४.४ स्वयंअध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे :

**स्वयंअध्ययन – १**

**पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगा.**

१) भारतीय जनता पार्टीची स्थापना १९८० साली झाली.

२) कैमाजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी हे भारतीय जनता पार्टीचे पहिले अध्यक्ष होते.

३) भारतीय जनता पार्टी १९९९ साली प्रथम केंद्रात सत्ताधारी पक्ष झाला.

४) भारतीय जनता पार्टीचे सध्याचे अध्यक्ष मा. अमित शहा हे आहेत.

५) भारतीय जनता पार्टीने २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत २८२ जागा जिंकल्या.

**उत्तरे :** १) बरोबर २) बरोबर ३) चूक ४) चूक ५) बरोबर

**स्वयंअध्ययन – २**

**रिकाम्या जागा भरा.**

१) १९८४ साली झालेल्या लोकसभा निवडणूकीत भाजपाला ............... जागा जिंकता आल्या.

(अ) २ (ब) ५ (क) ७ (ड) ९

२) भारतीय जनता पार्टीचे पहिले पंतप्रधान .............. हे होते.

(अ) लालकृष्ण अडवाणी (ब) अटलबिहारी वाजपेयी

(क) नरेंद्र मोदी (ड) राजनाथसिंह

३) राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील प्रमुख पक्ष म्हणून .............. पक्ष ओळखला जातो.

(अ) भाजप (ब) शिवसेना (क) राष्ट्रीय जनता दल (ड) अण्णा डी.एम.के.

४) २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने .............. जागा जिंकल्या.

(अ) ३०१ (ब) ३०२ (क) ३०३ (ड) ३०४

**उत्तरे :** १) (अ) २) (ब) ३) (अ) ४) (ब)

## ४.५ सरावासाठी स्वाध्याय :

**(अ) पुढील प्रश्नांची सविस्तरपणे उतरे लिहा.**

१) भारतीय जनता पार्टीचा उदय, विस्तार स्पष्ट करा.

२) भारतीय जनता पार्टीच्या ध्येयधोरण कार्यक्रम यांचा आढावा घ्या.

३) राष्ट्रीय राजकारणातील भारतीय जनता पार्टीच्या वाटचालीचा आढावा घ्या.

**(आ) टीपा लिहा.**

१) राष्ट्रीय लोकशाही आघाडी

२) १६ वी लोकसभा निवडणूक आणि भाजप.

## ४.६ सारांश :

भारतातील पक्षपद्धतीचा उगम हा स्वातंत्र्यपूर्व काळापासून आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीच्या अग्रणी असलेल्या काँग्रेस पक्षापासून इतर बहुतेक पक्ष निर्माण झाले आहेत, याला भारतीय जनता पार्टी हा पक्ष ही अवाद नाही. भारतातील पक्षपद्धती अनेक स्थित्यंतरांधून वाटचाल करताना दिसते. १९५२ च्या पहिल्या सार्वजनिक निवडणुकीपासून ते १९७७ च्या निवडणुकीपर्यंत काँग्रेस पक्षाचा प्रभाव राहिला. त्यामुळे भारतात एक प्रबळ पक्षपद्धती प्रस्थापित झाली. परंतु १९७७ च्या सार्वजनिक निवडणूकीत काँग्रेस पक्षाचा दारुण पराभव झाला आणि भारतातील एक प्रबळ पक्ष पद्धती व्यवस्थेला ब्रेक लागला आणि उत्तरोत्तर काँग्रेस पक्षाचा प्रभाव हळूहळू कमी होत गेला. तसा भारतात पक्षीय आघाड्याच्या राजकारणाला सुरवात झाली. प्रादेशिक पक्षांचा काही घटक राज्यांत प्रभाव वाढला. त्यामुळे त्यांच्या मदतीशिवाय राष्ट्रीय राजकारणात सत्ता

मिळविणे राष्ट्रीय पक्षांना अशक्य होऊ लागले. १९८४ च्या लोकसभा निवडणूकीत फक्त दोन जागा जिंकणाऱ्या भाजपने भारताच्या राष्ट्रीय राजकारण विस्तारण्यास सुरवात केली. काही प्रादेशिक पक्षांशी युती करून राज्याच्या राजकारणात सत्तेवर आला तर गुजरात, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेशसारख्या राज्यात एक हाती सत्ता मिळवून दिर्घकाळ सत्तेवर राहिला. त्याचा फायदा राष्ट्रीय राजकारणात भाजपाला उत्तरोत्तर होत जाऊन १९९६ च्या लोकसभा निवडणूकीत ६१ जागा जिंकत अल्पकाळासाठी सत्तेवर आला. १९९८ च्या लोकसभा निवडणूकीत पुन्हा १७९ जागा जिंकत अल्पकाळासाठीच सत्तेवर आला तर १९९९ च्या लोकसभा निवडणूकीत ...... जागा जिंकत राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील घटक पक्षाच्या मदतीने पुन्हा भाजप सत्तेवर आला. पाच वर्षे कार्यकाल याय सरकारने पूर्ण केला. परंतु २००४ च्या लोकसभा निवडणूकीत पुन्हा दारुण पराभव झाला. २००९ च्या लोकसभा निवडणूकीतही सत्तेपासून दूरच राहावे लागले. परंतु २०१४ च्या लोकसभा निवडणूकीत मा. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली जोरदार मुसंडी मारत तब्बल २८२ जागा जिंकत भाजप सत्तेवर आला. हाच यशाचा आलेख पुढं उंचावत विविध घटक राज्यामध्ये भाजपने सत्ता प्राप्त केली आणि २०१९ च्या लोकसभा निवडणूकीत तर ३०३ जागा जिंकत स्पष्ट बहुत प्राप्त करत एक प्रबळ पक्ष म्हणून पुढे आला. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर देश पुन्हा एक पक्ष प्रबळ पद्धतीकउे वाटचाल करीत आहे, असे दिसू लागले आहे.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) (संपा.) प्रकाश बाळ, किशोर बेडकीहाळ : 'भारतीय राजकीय व्यवस्था – प्रक्रिया आणि स्वरूप' आंबेडकर अकादमी, सातारा (२००२)

२) भा. ल. भोळे आणि किशोर बेडकीहाळ : 'बदलता महाराष्ट्र', आंबेडकर अकादमी, सातारा (२००३)

३) अशोक चौसाळकर (संपा.): 'समाज प्रबोधन पत्रिका', अंक २०५-२०६, (जानेवारी ते जून २०१४)

४) (संपा.) सुहास पळशीकर, नितिन बिश्मल : 'महाराष्ट्राचे राजकारण राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ', प्रतिमा प्रकाशन, पुणे (२००४)

५) प्रा. बी. बी. पाटील : 'लोकशाही निवडणुका व सुशासन', फडके प्रकशन, कोल्हापूर (२०१७)

६) (संपा.) तुकाराम जाधव व अभय कांता : 'महाराष्ट्राचे राजकारण नव्या वळणावर', द युनिक अॅकॅडमी, पुणे (२०१५)

७) डॉ. य. दि. फडके : 'लोकसभा निवडणूका', अक्षर प्रकाशन, मुंबई (१९९९).

८) (अनु.) अभय दातार, विवेक घोटाळे : 'स्वातंत्र्यापासूनचे भारताचे राजकारण', राज्य मराठी विकास संस्था मुंबई (२०१४).

९) (संपा.) डॉ. भा. भोळे : 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण',पिंपळापुरे बुक डिस्ट्रिब्युटर्स, नागपूर (२०१०)

१०) पळशीकर सुहास : ‘महाराष्ट्राचे बदलते राजकारण (काँग्रेस वर्चस्वाची जडण, घडण आणि पडझड)’ आंबेडकर अकादमी, सातारा (२००३)

११) प्रकाश पवार : ‘भाजपा एक वर्चस्व समाज प्रबोधन पत्रिका’

१२) Rajini Kothari : 'Design of Alternative seminar 216' Aujust 1977 pp.15.

१३) Rajini Kothari : 'Politic in India', Boston Little Brown & Co. (1970).

❑❑❑